सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

**!! जाहीर सूचना !!**

सोलापूर तरुण भारत जाहिराती तसेच सर्व विभागांसाठी ऑनलाईन रिसीट ॲप वापरण्यास सुरुवात केली आहे. ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा, कोणतेही पैसे जमा करताना ऑनलाईन रिसीटची मागणी करावी. ऑनलाईन रिसीट शेअर करण्याची देखील सोय केली आहे. आमच्या प्रतिनिधीकडून याची माहिती घ्यावी. ऑनलाईन रिसीटची मागणी हक्काने करावी.

सहकार्याबद्दल धन्यवाद.

सोलापूर | गुरुवार, २२ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३९ वे अंक २९२ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## ▶▶ महत्त्वाचे...

### नराधमाचे वकीलपत्र घेण्यासाठी वकील पुढे येईना!

**ठाणे :** बदलापुरातील नराधम अक्षय शिंदेचे आरोपपत्र घेण्यास कल्याण कोर्टातील वकिलांनी नकार दिला आहे तसेच बदलापूर रेल्वे पोलिसांनी अटक केलेल्या आंदोलकांवर दाखल करण्यात आलेल्या अजामीनपात्र गुन्ह्यांविरोधात वकील आक्रमक झाले आहेत. आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. आम्ही जी भूमिका परवा घेतली तीच आज आणि उद्या असणार आहोत. बदलापूरातील कृत्य निंदनीय आहे. जनावरांनाही लाजवणारे कृत्य आहे. साडेतीन वर्षाच्या मुलीवर अतिप्रसंग करणारा आरोपी समाजाला घातक असल्याने त्याचे वकिलपत्र घेऊ नये असा निर्णय आमच्या संघटनेने घेतल्याचे वकिलांनी सांगितले.

### गोविंद मोहन स्वीकारणार गृहसचिव पदाची सूत्रे

**नवी दिल्ली :** वरिष्ठ आयएएस अधिकारी गोविंद मोहन गुरुवारी अजय कुमार भल्ला यांच्याकडून नवीन केंद्रीय गृहसचिव म्हणून पदभार स्वीकारतील, असे अधिकृत सूत्रांनी सांगितले. बनारस हिंदू विद्यापीठातून बीटेक आणि आयआयएम, अहमदाबादमधून पीजी डिप्लोमा केलेले गोविंद मोहन पूर्वी केंद्रीय सांस्कृतिक सचिव म्हणून कार्यरत होते. सिक्कीम कॅडरचे १९८९ च्या तुकडीचे आयएएस अधिकारी गोविंद मोहन यापूर्वी केंद्रीय गृह मंत्रालयात विशेष कर्तव्य अधिकारी म्हणून रुजू झाले आहेत.

### ॲपल भारतात आयफोन १६ चे प्रो-मॉडेल बनवणार

**नवी दिल्ली :** ॲपल लाँच झाल्यानंतर लवकरच भारतात आयफोन १६ मालिकेचे प्रो-मॉडेलची जुळवणी करेल. त्याच्या जुळवणीसाठी 'नवीन उत्पादन परिचय'ची प्रक्रिया लवकरच फॉक्सकॉनच्या श्रीपेरुंबदूर, तामिळनाडू येथील प्रकल्पात सुरू होईल. ॲपलने आयफोन १६ प्रो आणि प्रो मॅक्सच्या उत्पादनासाठी येथील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासही सुरुवात केली आहे. या फोनच्या जागतिक लाँचनंतर त्यांची जुळवणी भारतात सुरू होईल.

# आता लाडका शेतकरी योजना राबवणार

## मुख्यमंत्री शिंदेंची कृषी महोत्सवात घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**बीड, २१ ऑगस्ट**

विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्याने सर्वच राजकीय पक्ष जोरदार कामाला लागले आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात नेत्यांचे दौरे वाढले आहेत. या दौऱ्यांच्या माध्यमातून आगामी निवडणुकीची रणनीती आखली जात आहे. यातच काही दिवसांपूर्वी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणली. राज्यात या योजनेची मोठी चर्चा सुरु आहे. या लाडकी बहीण योजनेवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपही सुरु आहेत. अशातच आज बीडमध्ये राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं



होतं. या कृषी महोत्सवात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठी घोषणा केली आहे. लाडकी बहीण योजनेनंतर आता लाडका शेतकरी योजना राबवणार, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कृषी महोत्सवात केली.

महायुती सरकारचं काम म्हणजे शेतकऱ्यांच्या पिकाला थेट मार्केट उपलब्ध करुन देणं होय. आमच्याकडे पॅकेट नाही तर शेतकऱ्यांना थेट मार्केट देण्याचं काम आहे. कष्टकरी, वारकरी आणि सुखी शेतकरी हेच आमच्या सरकारचं धोरण आहे. मी आज एवढंच सांगतो, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणली. त्यानंतर अन्नपूर्णा योजना आणली. त्यानंतर लाडका भाऊ योजना आणली. आता आम्ही लाडका शेतकरी योजना राबवणार आहोत. सर्व भाऊ लाडके झाले, सर्व बहीणी लाडक्या झाल्या, आता शेतकरही लाडका होणार, असं मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलं आहे.

### सोयाबीन आणि कापसासाठी हेक्टरी ५ हजारांची घोषणा

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याकडेही आम्ही मागणी करणार आहोत की, आमच्या शेतकऱ्यांच्या पिकाला सोयाबीन आणि कापसाला चांगला भाव मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांचंही कल्याण झालं पाहिजे. आज आपण सोयाबीनला ५ हजार रुपये हेक्टरी आणि कापसालाही ५ हजार रुपये हेक्टरी देण्याचा निर्णय घेत आहोत. ही मर्यादा २ हेक्टरपर्यंत असणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री शिंदे यांनी केली.आता आपण ते ई-पीक पाहणी वैगेरे बाजूला ठेवणार आहोत. ज्या शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यांवर सोयाबीन आणि कापसाची नोंद आहे. त्या शेतकऱ्यांना आपण ५ हजार रुपये हेक्टरी पैसे देण्याचा निर्णय घेत आहोत. एवढंच नाही तर शेतकऱ्यांच्या शेतीपंपाची वीज बिलही माफ करत आहोत. विरोधक म्हणाले की, मग मागच्या वीज बिलाचं काय? आम्ही शेतकऱ्यांचं येणारं वीज बिल घेत नाही तर मग थकलेलं कसं घेणार? मागेल त्याला शेततळं आणि मागेल त्याला सोलर, अशा अनेक योजना सरकारने सुरु केल्या आहेत, असंही मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले.

# बदलापुरातील आंदोलन राजकीयदृष्ट्या प्रेरित

## मुख्यमंत्री शिंदे यांचा आरोप

## बहुतांश आंदोलनकर्ते बाहेरील

### ४० आंदोलक अटकेत, ३०० जणांवर गुन्हे

बदलापुरात इंटरनेट बंद करण्यात आले असून अद्याप जमावबंदी लागू आहे. आता या घटनेत ३०० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, तर पोलिसांनी ४० हून अधिक जणांना अटक केली आहे.

**वृत्तसंस्था,**
**मुंबई, २१ ऑगस्ट**

ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे दोन चिमुरड्या मुलींच्या कथित लैंगिक शोषणाच्या निषेधार्थ मंगळवारी झालेले आंदोलन राजकीयदृष्ट्या प्रेरित होते तसेच राज्य सरकारला बदनाम करण्याचा उद्देश त्यामागे होता, असा खळबळजनक आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यानी बुधवारी केला. बदलापुरातील शाळेवर प्रशासक नेमल्याचे त्यांनी सांगितले.

यात सहभागी असलेले बहुतांश बाहेरून आले होते. या मुद्यावर राजकारण करणाऱ्यांना लाज वाटली पाहिजे, असे येथे पत्रकारांसोबत चर्चा करताना शिंदे विरोधकांवर बरसले. बदलापुरात झालेली घटना दुर्दैवी आहे. यातील आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, याचा निर्देश देण्यात आला आहे. पालकांच्या भावनांचा आदर करून तातडीने सर्वस्तरावर कारवाई करण्यात आली आहे, असे ते म्हणाले.

येथे आंदोलन करणारे स्थानिक नव्हते, त्यामुळे हे आंदोलन राजकीयदृष्ट्या प्रेरित होते. या आंदोलनात बोटांवर मोजता येतील इतकेच स्थानिक होते. मंत्री गिरीश महाजन यांनी आंदोलकांच्या सर्व मागण्या पूर्ण केल्या, तरी ते हटायला तयार नव्हते. याचा अर्थ त्यांना केवळ सरकारची बदनामी करायची होती, असे शिंदे म्हणाले. काही आंदोलकांच्या हाती लाडकी बहीण योजनेचा उल्लेख असलेले फलक होते. आम्हाला १५०० रुपये नको, मुलींना संरक्षण द्या, असे त्यावर लिहिले होते. आंदोलकांनी रेल्वेमार्ग रोखून धरल्याने बदलापूर ते अंबरनाथ रेल्वेसेवा १० तासांपेक्षा जास्त वेळ ठप्प होती.

# सीबीएसई शाळांना नव्याने मान्यता घ्यावी लागणार

**वर्धा :** महाराष्ट्र शासनाचा नवा निर्णय खासगी संस्थाचालकांच्या पोटात गोळा निर्माण करणारा ठरत आहे. सीबीएसई (सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्यूकेशन) अर्थात केंद्रीय शिक्षण मंडळाच्या शाळांना दीड लाख रुपये भरून नव्याने मान्यता घ्यावी लागणार आहे. त्यामुळे संस्थाचालकांमध्ये नाराजी पसरली आहे.

महाराष्ट्र शासनाने सीबीएसई म्हणजेच केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मान्यता दिल्या जाणाऱ्या शाळांसाठी नवा आदेश लागू केला आहे. त्यानुसार या केंद्रीय मंडळाच्या शाळांना दर तीन वर्षांनी नव्याने मान्यता घ्यावी लागणार. तसेच या मान्यतेसाठी शासनाकडे दीड लाख रुपयांचे मान्यता शुल्क भरावे लागणार आहे. यापूर्वी एकदा मान्यता मिळाल्यानंतर ती पुन्हा घेण्याची गरज नव्हती. नव्याने मान्यता घेण्याचा दंडक संस्थेची आर्थिक पिळवणूक करणारा असून त्यामुळे नाहक आर्थिक भुर्दंड शाळांना बसणार आहे. या निर्णयास शासनाने स्थगिती द्यावी, अशी मागणी होत आहे.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची आज बैठक

## दोन परीक्षा एकाच दिवशीचा घोळ

**वृत्तसंस्था,**
**पुणे, २१ ऑगस्ट**

आयबीपीएस परीक्षा आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची राज्य सेवा संयुक्त पूर्व परीक्षा या दोन्ही परीक्षा एकाच दिवशी ठेवण्यात आल्याने निर्माण झालेली समस्या सोडविण्याची मागणी देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची बैठक गुरुवारी होत आहे.

या आंदोलनाचे राजकीय पडसादही उमटत आहेत. भाजपा आमदार अभिमन्यू पवार यांनी या प्रश्नावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत याबाबतचे निवेदन दिले. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी आयोगाच्या अध्यक्षांना विनंती केली. त्यानुसार, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची बैठक गुरुवार, २२ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता आयोजिण्यात आली आहे, अशी माहिती आयोगाकडून देण्यात आली आहे. बैठकीतून काही फलनिष्पत्ती होते का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आयबीपीएस परीक्षा आणि एमपीएससीची राज्य सेवा संयुक्त पूर्व परीक्षा या दोन्ही २५ ऑगस्ट रोजी एकाच दिवशी आल्या आहेत. तसेच कृषी विभागाच्या २५८ जागांचा समावेश राज्य सेवा पूर्व परीक्षेत झालेला नाही. या दोन्ही कारणांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजी आहे. त्यामुळे याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती मी एमपीएससीच्या अध्यक्षांना केली आहे.

# पंतप्रधान मोदी पोलंडमध्ये दाखल

## युक्रेनमध्ये शांततेसाठी उत्सुक; पंतप्रधानांची पहिलीच भेट

**वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, २१ ऑगस्ट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी पोलंड आणि युक्रेनच्या तीन दिवसीय दौऱ्यासाठी पोलंडची राजधानी वॉर्सा येथे दाखल झाले. २१ आणि २२ ऑगस्टला मोदी पोलंडमध्ये असतील आणि त्यानंतर ते २३ ऑगस्टला युद्धग्रस्त युक्रेनची राजधानी कीवला भेट देतील.

तत्पूर्वी, पंतप्रधान कार्यालयाने त्यांच्या भेटीची अधिकृत माहिती देणारे निवेदन जारी केले आहे. पत्रात पंतप्रधानांच्या हवाल्याने म्हटले आहे की, माझी पोलंडची भेट अशा वेळी आली आहे जेव्हा आम्ही आमच्या राजनैतिक संबंधांना ७० वर्षे पूर्ण करत आहोत. पोलंड हा मध्य युरोपमधील प्रमुख आर्थिक भागीदार आहे. आमचे संबंध अधिक दृढ करण्यासाठी माझे मित्र पंतप्रधान डोनाल्ड टस्क



आणि राष्ट्राध्यक्ष आंद्रेज डुडा यांच्या भेटीसाठी उत्सुक आहे.

या पत्रात पंतप्रधानांच्या युक्रेन दौऱ्याचाही उल्लेख करण्यात आला आहे. पंतप्रधान मोदी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांच्या निमंत्रणावरून युक्रेनला भेट देत असल्याचे पंतप्रधान कार्यालयाने म्हटले आहे. भारतीय पंतप्रधानांचा हा पहिलाच युक्रेन दौरा असेल.

या दौऱ्यावर जाण्यापूर्वी, पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर युक्रेन भेटीची माहिती दिली. ते म्हणाले, मी राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्या निमंत्रणावरून युक्रेनला जात आहे. आम्ही सध्या सुरू असलेल्या युक्रेन संघर्षाच्या शांततापूर्ण निराकरणासाठी विचार सामायिक करून येथे शांतता आणि स्थिरता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करू.

# काँग्रेसचे दिग्गज वकील अतिरेक्याची केस घेतात

## ॲड. उज्ज्वल निकम यांची तिखट शब्दांत टीका

**मुंबई, २१ ऑगस्ट**

मी निवडणूक लढलो आहे हे मान्य आहे. राजकीय पक्षाकडून निवडणूक लढलो आहे. काँग्रेसच्या पक्षाचे दिग्गज वकील अतिरेक्यांचे वकीलपत्र घेतात. १९९३ चा खटला मी चालवत होतो, त्यावेळी काँग्रेस पक्षाचे नेते कुणाला वाचवण्यासाठी आटापिटा करत होते, कोणत्या अभिनेत्याला वाचवण्याचा प्रयत्न झाला हे मला आणि महाराष्ट्राला माहीत आहे. माझ्याकडे अशा बऱ्याच गोष्टी आहेत. असे म्हणत उज्ज्वल निकम यांनी विरोधकांना उत्तर दिले आहे.



बदलापूर या ठिकाणी दोन मुलींवर अत्याचार झाला. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. अशात या प्रकरणाची विशेष सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात येईल असं सरकारतर्फे सांगण्यात आले. ज्यानंतर विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी उज्ज्वल निकम यांना हे प्रकरण देऊ नये असे म्हटले होते. तसेच संजय राऊत आणि सुषमा अंधारे या दोघांनीही या प्रकरणात उज्ज्वल निकम यांची नियुक्ती नको ते आता भाजपाचे झाले आहेत असे म्हणत टीका केली. त्यावर आता उज्ज्वल निकम यांनी उत्तर दिले आहे. उज्जवल निकम यांनी जर हे प्रकरण हाती घेतले तर पीडितेला न्याय मिळणार नाही असा आरोप विरोधकांनी केला आहे. मात्र विरोधकांच्या आरोपांना निकम यांनी उत्तर दिले आहे.

# कार्यकर्त्यांनो, पक्षाला ७० दिवस द्या

## राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश यांचे आवाहन




कार्यक्रमात बोलताना डॉ. उपेंद्र कोठेकर. सोबत राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल व मान्यवर

**अकोला, २१ ऑगस्ट**

महाराष्ट्रातील महायुती सरकारने सर्वसामान्यांसाठी १०५ योजना लागू करून मातृ शक्ती, ज्येष्ठ नागरिक, युवाशक्ती व शेतकऱ्यांचा सन्मान केला आहे. महाराष्ट्राला महाशक्तिशाली करण्यासाठी भाजपा, शिवसेना व राकाँ या महायुतीच्या उमेदवाराला विजयी करण्यासाठी भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता कार्यरत आहे. हे सरकार मजबूत करण्यासाठी पक्षाला ७० दिवस द्या, असे आवाहन भाजपा राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश यांनी केले.

अकोला व बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील विस्तारक, आघाडी प्रमुख, मंडळ प्रभारी, मंडळ संयोजक, विधानसभा संयोजक कार्यकर्त्यांना आज बुधवारी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. व्यासपीठावर मध्य प्रदेशचे युवा कल्याण मंत्री कैलास सारंग, बऱ्हाणपूरचे खासदार ज्ञानेश्वर पाटील, भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, आमदार डॉ. संजय कुटे, खासदार अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल, संघटनमंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, आमदार हरीश पिंपळे, आमदार आकाश फुंडकर, आमदार श्वेता महाले, चैनसुख संचेती आदी उपस्थित होते.

लाडकी बहीण, युवाशक्तीसाठी योजना, ज्येष्ठ नागरिकांसाठी योजना, मुलींना उच्च शिक्षणासाठी निःशुल्क सोय, एक रुपयात शेतकऱ्यांना पीकविमा तसेच विविध योजना सरकारने सुरू करून महिलांना ५० टक्के एसटी सवलत देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. महायुती सरकारला विजयी करण्यासाठी उमेदवारापेक्षा महाराष्ट्राचा विकास हे एकमेव लक्ष ठेवून कार्य करा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी भाजपातर्फे मान्यवरांचा श्रीफळ, शाल देऊन स्वागत करण्यात आले. संचालन डॉ. उपेंद्र कोठेकर यांनी तर प्रास्ताविक रणधीर सावरकर यांनी केले. यावेळी विस्तारक पदाधिकारी उपस्थित होते.



## वडिलांकडून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**सातारा :** श्रावणी सोमवारनिमित्त शिखर शिंगणापूरला (ता. माण) शंभू महादेवाच्या दर्शनासाठी आल्यावर आपल्याच अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग केल्याने शिखर शिंगणापूरसह परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी माळशिरस तालुक्यातील इस्लामपूर गावच्या एकाला पोलिसांनी अटक केली आहे.

शिंगणापूर मार्डी रस्त्यावर असलेल्या पेट्रोल पंपावर पेट्रोल टाकण्याच्या बहाण्याने मुलीस घेऊन गेला. सोबत आणलेल्या पत्नीस व दोन मुलांस त्याने आईस्क्रीम खायला देऊन शिखर शिंगणापूरमध्येच थांबवले. पेट्रोल टाकण्यासाठी मुलीसह गेलेले वडील पेट्रोल पंपावर गेलेच नाहीत. शिंगणापूर मार्डी रस्त्यावर असलेल्या मक्याच्या शेतात आपल्या दहा वर्षांच्या मुलीला नेऊन तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न करत असतानाच मुलगी ओरडल्याने आसपासच्या लोकांनी त्याला मुलीपासून वेगळे केले. त्याच्या विरोधात मुलीच्या आईने दहिवडी (ता. खटाव) पोलीस ठाण्यात बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सहायक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक चांदणी मोटे यांनी तत्काळ आरोपीस अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी मिळाली आहे.

# मविआचा शनिवारी महाराष्ट्र बंद : पटोले

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २१ ऑगस्ट-**

बदलापूरमध्ये दोन चिमुकल्यांवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेने महाराष्ट्राच्या प्रतिमेला काळीमा फासला गेला आहे. बदलापूरमधील ज्या शाळेत अत्यंत गंभीर व मन सुन्न करणारी घटना घडली ती शाळा भाजपा आरएसएसशी संबंधित आहे. त्यामुळे हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला जात आहे. शाळेतील सीसीटीव्ही फुटेज गायब आहे. या प्रकरणी महाभ्रष्ट युती सरकारविरोधात महाविकास आघाडीने २४ तारखेला महाराष्ट्र बंदची हाक दिली असून जनतेने मोठ्या संख्येने या बंदमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले आहे.

बदलापूरच्या अत्याचाराच्या घटनेने राज्यातील महिला मुलींच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. त्यामुळे आज महाविकास आघाडीच्या बैठकीत जागावाटपावर होणारी चर्चा रद्द करून राज्यातील महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटना आणि महिला सुरक्षेवर चर्चा करण्यात आली. या बैठकीला काँग्रेसचे विधीमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात,विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खा. वर्षा गायकवाड, राष्ट्रवादीचे नेते व माजी गृहमंत्री अनिल देशमुख, जितेंद्र आव्हाड, शिवसेना नेते खा. संजय राऊत, माजी मंत्री अस्लम शेख आदी उपस्थित होते. बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, भाजपा युती सरकारला सत्तेची गुर्मी चढली आहे. लाडकी बहिण म्हणून १५०० रुपये देण्यासाठी मोठ मोठे इव्हेंट केले जात आहेत पण बहिणींची सुरक्षा केली जात नाही. राज्य सरकार, गृहखाते, शासन आहे की नाही अशी परिस्थिती आहे. बदलापूरच्या घटनेत पोलीसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तक्रार दाखल करण्यास गेलेल्या पीडित मुलीच्या आईला तासनसात पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवण्यात आले. पोलीस कोणाच्या दबावाखाली काम करत आहेत, सरकार कोणाला वाचवण्याचा प्रयत्न करत आहे, अशी विचारणा करत जयंत पाटील म्हणाले की,दोषींवर कठोर कारवाई करावी यासाठी बदलापूरमध्ये लोकांनी मोठे जनआंदोलन केले पण ते आंदोलनही दडपण्याचा प्रयत्न केला. राज्यात बाल अत्याचारांच्या घटनाही वाढल्या आहेत. भाजपा युती सरकारला जागे करण्यासाठी २४ तारखेला महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### मार्डी येथील यमाईदेवी आश्रमशाळेत झाडांना राखी बांधून संवर्धनाचा संकल्प

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**
संत रविदास शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर संचलित मार्डी येथील यमाईदेवी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांनी झाडांना राखी बांधून संवर्धनाचा संकल्प केला. यावेळी विवेक विचार मंचच्या अध्यक्षा अश्विनी चव्हाण, तेजस्वी महिला मंडळच्या अध्यक्षा माधुरी डहाळे, ओबीसी महिला आघाडी प्रदेशाध्यक्षा डॉ. माधुरी पारपल्लिवार, माधवी पोतदार, पद्मश्री, टकले, रोहित डहाळे, एसबीआय बँकेचे झोनल अधिकारी विक्रांत राठोड, गणेश कोंडा, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष शिवाजीराव उपरे, सिद्धिविनायक योग ग्रुपचे अध्यक्ष दत्तात्रय कुरविनकोप, दीपाली कोरविनकोप, संत रविदास शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूरचे संस्थापक अशोक लांबतुरे, अध्यक्षा सुरेखा लांबतुरे, सचिव मधुकर गवळी, मुख्याध्यापिका रुक्मिणी लांबतुरे उपस्थित होते. सूत्रसंचालन नानासाहेब लोखंडे यांनी केले तर आभार तानाजी तानगावडे यांनी मानले. कार्यक्रमासाठी संगीता व्हनकोळे-जाधव, विद्या हराळे, अशोक देशमुख, विनोद कोळेकर, अमोल गुरव, बसवराज तुळजापुरे, संदीप चव्हाण यांनी परिश्रम घेतले.



### दोड्डी येथे क्रीडा स्पर्धांचे बक्षीस वितरण

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**
दक्षिण सोलापूर तालुक्यातील दोड्डी येथील न्यू इंग्लिश स्कूल येथे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पावसाळी क्रीडा स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा विभागाच्या माध्यमातून करण्यात आल होते. त्याचे पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष गणेश नीळ, संजय जाधव, मुख्याध्यापक गणेश डोके, निवृत्त पोलीस उपनिरीक्षक दगडू राठोड, डॉ. शिवाजी राठोड, क्रीडा शिक्षक उमेश भोयटे, देविदास गवारी व यल्लप्पा जनगे उपस्थित होते. डॉ. शिवाजी राठोड यांनी मनोगत व्यक्त केले. यात ४५ शाळांनी सहभाग नोंदविला. शिक्षक उमेश भोयटे, विशाल गुंड, जालिंधर पौळ, देवादास गवारी, यल्लापा जनगे, आनंद पाटील, चंद्रकांत माळी, निकिता पाटील, अंजली जोशी, ज्योती काळे यांनी परिश्रम घेतले. यावेळी डॉ. शिवाजी राठोड, दगडू राठोड यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

**विजेत्या शाळांची नावे**

१४ वर्षाखालील मुले- पंचाक्षरी कन्नड प्रशाला टाकळी-विजेता, १७ वर्षाखालील मुले-लोकसेवा प्रशाला मंद्रुप-विजेत, १९ वर्षाखालील मुले-इंडियन पब्लिक स्कूल कंदलगाव-विजेता, १४ वर्षे खालील मुली-बसवेश्वर प्रशाला निंबर्गी-विजेता, १७ वर्षाखालील मुली-बसवेश्वर प्रशाला निंबर्गी-विजेता, १९ वर्षाखालील मुली- पंचलिंगेश्वर प्रशाला आहेरवाडी-विजेता.



### अक्कलकोट आगारात सोयीसुविधा देण्याची मागणी

**अक्कलकोट, दि.२१ ऑगस्ट-**
अक्कलकोट येथील तात्पुरते बस स्टँड प्रवाशांना डोकेदुखी बनले आहे. बस स्टँडमध्ये प्रवाशांना सोयीसुविधा द्या, नाहीतर पदमुक्त व्हा? अन्यथा उपोषण करण्याचे निवेदन एसटी महामंडळ अक्कलकोट आगार प्रमुख जयसिंग चव्हाण यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष राम जाधव यांनी दिले आहे. नव्याने बांधण्यात येत असलेल्या बसस्थानक शेजारी तात्पुरते स्वरूपात बांधण्यात आलेल्या बसस्थानकात कोणत्याही प्रकारच्या प्रवाशांना सोयीसुविधा उपलब्ध नाहीत. श्री स्वामी समर्थांच्या पावन नगरीत हजारो भक्त रोज येतात. त्यांना जीव मुठीत धरून चालावे लागते. बसस्टँडमधील रस्ते चिखलंमय बनला आहे. येथे साधा पिण्याच्या पाण्याची सोय नाही. संडास बाथरूमला चिखलातून जावे लागते. प्रवाशांना बसण्याची सोय नाही. या सर्व प्रकारच्या अडचणी मार्गी लावण्यात याव्यात अन्यथा आपल्या विरोधात उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष राम जाधव, स्वामीनाथ हेगडे, शंकर वाघमारे, शहर उपाध्यक्ष गणेश कांबळे, श्रीकांत जाधव, शहानवाज नदाफ, राहुल मजगे, समीर नदाफ व विद्यार्थी उपस्थित होते.



### आयुष व्यसनमुक्ती केंद्रात रक्षाबंधन साजरा

**बार्शी, दि. २१ ऑगस्ट-**
बार्शी तालुक्यातील जामगांव (आ) येथील आयुष व्यसनमुक्ती केंद्रात उपचार घेत असलेल्या रुग्णांना आपल्या बहिणीची कमतरता भासू नये यासाठी लायन्स क्लब बार्शी टाऊन तेजस्विनीच्या महिला व केंद्रातील सर्व महिला कर्मचारी यांनी व्यसनमुक्ती रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन केले. केंद्राचे संचालक डॉ.संदीप तांबारे यांनी रक्षाबंधनाचे महत्त्व सांगितले. यावेळी आयुष्यभर निर्व्यसनी राहण्याचा निर्धार केंद्रातील रुग्णांनी केला. या कार्यक्रमाला उपस्थित लायन्स क्लब बार्शी टाऊन तेजस्विनीच्या अध्यक्षा विद्या काळे, खजिनदार कविता अंधारे, सचिव प्राची जमदाडे व डॉ. गौरी गायकवाड उपस्थित होते. यावेळी राखी वर व्यसनमुक्तीशी बंधन व्यसनापासून रक्षण असा व्यसनमुक्तीचा संदेश देण्यात आला.

# बार्शीतील विकासकामांसाठी ११ कोटी निधी मंजूर

## आ. राजेंद्र राऊत : तीर्थक्षेत्र पर्यटन विकासाचा ध्यास

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ ऑगस्ट-**
बार्शी तालुक्याचे आमदार राजेंद्र राऊत यांच्या विशेष प्रयत्नातून तालुक्यातील तीर्थक्षेत्राचा पर्यटन विकास करण्यासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत ३ कोटी व (लेखाशीर्ष २५१५ १२३८) या योजनेंतर्गत विविध गावातील सभामंडप बांधणे व रस्ता करणे यासाठी ८ कोटी निधी मंजूर झाल्याचे आ. राऊत यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.



> राज्यात शिंदे-फडणवीस-पवार सरकार स्थापन झाल्यानंतर सरकारच्या विकासाच्या धोरणामुळे तीर्थक्षेत्रासाठी निधी वितरित केला जात आहे. या निधीतून बार्शी मतदारसंघातील विविध मंदिरांची कामे करता येणार आहेत. यामुळे भाविकांची सोयही होणार आहे.
> **- आ. राजेंद्र राऊत**

मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या सहकार्याने प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत धामणगाव येथील श्री क्षेत्र बोधले महाराज मंदिर परिसरधमध्ये सभामंडप बांधणे यासाठी २० लाख, लाडोळे येथील श्रीक्षेत्र सदानंद महाराज देवस्थान येथे सभा मंडप बांधणे यासाठी १० लाख, सासुरे येथील श्रीक्षेत्र महंकालेश्वर मंदिर परिसरमध्ये सभामंडप बांधणे २० लाख, भातंबरे येथील श्रीक्षेत्र जगदंबा मंदिर यात्री निवास बांधणे व वाहनतळ करणे यासाठी १० लाख., कुसळंब येथील श्रीक्षेत्र दत्त मंदिर परिसर सुधारणा व सुशोभीकरण करणे यासाठी २० लाख ६) दडशिंगे येथील श्रीक्षेत्र बाळ पीर देवस्थान परिसरमध्ये सभामंडप बांधणे यासाठी १५ लाख, कोरेगांव श्रीक्षेत्र शामनाथ मंदिर परिसरमध्ये सभामंडप बांधणे यासाठी २० लाख, पानगांव येथील श्रीक्षेत्र काळभैरवनाथ मंदिर परिसरमध्ये सभामंडप बांधण्यासाठी २० लाख, हळदुगे येथील श्री क्षेत्र बाळराजे देवस्थान संरक्षण भिंत व परिसर सुधारणा करणे यासाठी २० लाख, साकत येथील श्रीक्षेत्र ज्योतिलिंग मंदिर परिसरमध्ये सभामंडप बांधणे व परिसर सुधारणा करणे यासाठी २५ लाख, मळेगाव येथील श्रीक्षेत्र नर्मदेश्वर मंदिर परिसर सुधारणा करणे यासाठी २० लाख, घोळवेवाडी येथील श्रीक्षेत्र दत्त मंदिर परिसर सुधारणा करणे यासाठी १० लाख, धानोरे येथील श्रीक्षेत्र येमाईदेवी मंदिर परिसर सुधारणा करणे यासाठी १० लाख, झरेगांव येथील श्रीक्षेत्र रुपादेवी मंदिर परिसरमध्ये सभामंडप बांधणे यासाठी २० लाख, काटेगांव येथील श्रीक्षेत्र हजरत दर्गा सय्यद अल्ली उद्दीन दर्गा परिसर सुधारणा करणे यासाठी २० लाख, गुळपोळी येथील श्रीक्षेत्र भैरवनाथ मंदिर परिसरमध्ये सभामंडप बांधणे व सुशोभीकरण करणे यासाठी २० लाख, तडवळे येथील श्रीक्षेत्र भगवतीदेवी मंदिर पोहच रस्ता व सुशोभीकरण करणे यासाठी २० लाख मंजूर करण्यात आले आहेत.

तालुक्यातील ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे (लेखाशीर्ष २५१५ १२३८) या योजनेंतर्गत बावी (आ) येथे आण्णाभाऊ साठेनगरमध्ये समाज मंदिर बांधणे २० लाख, हात्तीज येथे दलित वस्तीमध्ये समाज मंदिर बांधणे यासाठी २० लाख, पुरी येथे हनुमान मंदिर येथे सभामंडप बांधणे यासाठी २० लाख, वानेवाडी येथे बाळुमामा मंदिर येथे सभामंडप बांधणे यासाठी २० लाख, भोयरे येथे खंडोबा मंदिर येथे सभामंडप बांधणे यासाठी २० लाख, तावडी येथे विठ्ठल-रुक्मिणी मंदिर येथे सभामंडप बांधणे यासाठी २० लाख, नारी येथे खंडोबा मंदिर येथे सभामंडप बांधणे यासाठी २० लाख, वांगरवाडी येथे विठ्ठल-रुक्मिणी मंदिर येथे सभामंडप बांधणे यासाठी २० लाख. ९) बेलगाव येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे सभामंडप बांधणे २० लाख, पांढरी येथे दलित वस्तीमध्ये समाज मंदिर बांधणे २० लाख, रातंजन येथे बिरोबा मंदिर येथे सभामंडप बांधणे २० लाख, रऊळगाव येथे खंडोबा मंदिर येथे सभामंडप बांधणे २० लाख, मानेगाव येथे हनुमान मंदीर येथे सभामंडप बांधणे २० लाख, आळजापूर येथे बिरोबा मंदिर येथे सभामंडप बांधणे २० लाख, गोडसेवाडी येथे हनुमान मंदिर येथे सभामंडप बांधणे २० लाख, घारी येथे धनगर वस्तीमध्ये सभामंडप बांधणे २० लाख, ढोराळे येथे बिरोबा मंदिर येथे सभामंडप बांधणे २० लाख, तुर्क पिंपरी येथे विठ्ठल-बिरुदेव मंदिर येथे सभामंडप बांधणे २० लाख, शेलगांव (मा) येथे विठ्ठल-बिरुदेव मंदिर येथे सभामंडप बांधणे २० लाख. २०) भनसाळे येथे मारुती मंदीर येथे सभामंडप बांधणे १५ लाख, सर्जापूर येथे हनुमान मंदिर येथे सभामंडप बांधणे १० लाख, रुई येथे संत सावता माळी मंदिर येथे सभामंडप बांधणे २० लाख, चुंब येथे भगवान बाबा मंदिर येथे सभामंडप बांधणे २० लाख, बोरगाव झाडी येथे विठ्ठल-बिरुदेव मंदिर येथे सभामंडप बांधणे १५ लाख, उंबरगे येथे सभागृह बांधणे २० लाख, राळेरास येथे दलित वस्तीमध्ये सभागृह बांधणे २० लाख, तडवळे येथे तडवळे ते धानोरे रस्ता करणे २० लाख, ममदापूर ते बुवासाहेब वस्तीकडे जाणारा रस्ता करणे २० लाख, तुर्कपिंपरी येथे तुर्कपिंपरी ते धुमाळ वस्तीकडे जाणारा रस्ता करणे २० लाख, मानेगाव येथे मानेगाव ते लाडोळे रस्ता करणे २० लाख, शिराळे येथे शिराळे ते घारी रस्ता करणे २० लाख, घाणेगाव हनुमान मंदिरसमोर सभामंडप बांधणे २० लाख, धोत्रे येथे समाज मंदिर बांधणे २० लाख, खामगाव सभामंडप बांधणे ३० लाख, उपळे दु. संत सावता माळी मंदिर येथे सभामंडप बांधणे २० लाख, पांगरी समाज मंदिर बांधणे २५ लाख, कांदलगाव येथे मारुती मंदिरसमोर सभामंडप बांधणे २५ लाख, ज्योतिबाचीवाडी रामगिरी महाराज येथे सभामंडप बांधणे २५ लाख, दहिटणे तुकाई येथे सभामंडप बांधणे १२ लाख, खामगाव दलित वस्तीमध्ये समाज मंदिर बांधणे १२ लाख, ज्योतिबाचीवाडी हनुमान मंदिर समोर सभामंडप बांधणे ११ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

# निष्काम कर्मयोग हेच मोठ्या मालकांचे जीवन

## इंद्रजीत देशमुख : श्रद्धेय सुधाकरपंत परिचारक यांच्या पुण्यस्मरणदिनानिमित्त व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २१ ऑगस्ट-**
सुधाकरपंत परिचारक अर्थात मोठ्या मालकांचे जीवन हे समाजातील सर्व घटकांच्या विकासासाठी व्यतीत केले होते. त्यांनी उभे आयुष्य समाजातील सर्व घटकांना व त्यांच्या समस्येला प्राधान्य देऊन काम केले. त्यांनी कोणताही स्वार्थ न बघता जनतेच्या समस्या सोडविल्या. मोठे मालक हे खर्या अर्थाने आधुनिक काळातील संत असून निष्काम कर्मयोग हेच त्यांचे जीवन होते असे मत प्रसिद्ध व्याख्याते इंद्रजीत देशमुख यांनी व्यक्त केले.

श्रद्धेय सुधाकरपंत परिचारक यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण दिना निमित्त १७ ऑगस्ट रोजी कर्मयोगी इंस्टीट्यूट ऑफ टेक्नोलॉजी (अभियांत्रिकी) महाविद्यालय शेळवे येथे आयोजित केलेल्या व्याख्यानामद्धे आयुष्य घडविताना... या विषयावर ते बोलत होते. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी बोलताना इंद्रजीत देशमुख यांनी मोठ्या मालकांच्या ठायी असणार्या विविध गुणांवर प्रकाशझोत टाकला. तसेच आयुष्य घडविताना आवश्यक असणारी नीतीमुल्ये, आयुष्यातील आई वडिलांचे स्थान, तरुणपिढीचा मोबाइलचा अतिरिक्त वापर, वाचनाचे महत्व अश्या अनेक विषयावर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



### अपेक्षा अन् स्वार्थाविना केली कामे

कर्मयोगी या शब्दाचा अर्थ म्हणजे कोणतीही अपेक्षा न ठेवता कर्म करणे होय आणि त्याचप्रमाणे मोठ्या मालकांनीही समाजसेवा करताना कोणत्याही प्रकारची अपेक्षा किंवा स्वार्थ न ठेवता जनतेची कामे केली, म्हणूनच त्यांना कर्मयोगी म्हटले जाते असे रोहन परिचारक यांनी सांगत त्यांनी मोठ्या मालकांप्रती आदरांजली वाहिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी प्रा. जगदीश मुडेगावकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. रोहन परिचारक यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे इंद्रजीत देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील, प्राचार्य डॉ. ए. बी. कणसे, प्राचार्य प्रा. गुरुराज कुलकर्णी उपप्राचार्य प्रा. जे. एल. मुडेगावकर, रजीस्ट्रार गणेश वाळके उपस्थित होते. प्रा. सुशील कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. जगदीश मुडेगावकर यांनी आभार मानले.

# नातेपुते येथे रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी, भीम आर्मीतर्फे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २१ ऑगस्ट-**
अनुसूचित जाती व जमाती अ, ब, क, ड वर्गीकरण करून त्याला क्रिमिलेअरची अट लावून समस्त एससी व एसटी वर्गाचे आरक्षण संपवून या वर्गाला देशोधडीला लावणाऱ्या न्यायालयाच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठी विविध पुरोगामी विचारांच्या संघटनांमार्फत भारत बंदचे आवाहन करण्यात आले होते.

नातेपुते शहरात रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदेचे तालुकाध्यक्ष सुचित साळवे यांच्या नेतृत्वाखाली व भीम आर्मी संघटनेतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे शासनास निवेदन देण्यात आले. यावेळी मंडल अधिकारी लोखंडे, तलाठी उन्हाळे, पी. एस. आय डिगे यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी बशीर काझी, सुचित साळवे, शशिकांत कांबळे, आकाश नलवडे, गणेश सोरटे, मयूर सावंत, मानव सोरटे, किसन कोळेकर, युवराज सोरटे, शिवाजी सावंत, गोरख ढोबळे, अमीर बागवान, मारुती लाळगे, आनंद गायकवाड, विकास गायकवाड, प्रफुल्ल गायकवाड, प्रशांत गायकवाड, रंणजीत गायकवाड यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रावणमास प्रवचनमाला - १६

### मन प्रसन्न असलेल्याचे जीवन प्रसन्न असते

**● डॉ. जयवंत बोधले महाराज ●**



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ ऑगस्ट-**
संतश्रेष्ठ शांतीब्रह्म श्रीएकनाथ महाराजांचे मन अखंड प्रसन्न आहे. नाथांच्या चेहऱ्यावर प्रचंड तेज आहे.

**मन करा रे प्रसन्न। सर्व सिध्दिचे कारण।।**

ज्याचे मन प्रसन्न आहे आणि ज्याच्याजवळ सर्व सिध्दी आहेत, असे नाथ महाराज आहेत. ज्याचे मन प्रसन्न असते, त्याचा चेहरा सुध्दा प्रसन्न असतो. 'मन प्रसन्न असलेल्याचे जीवन प्रसन्न असते,' असे डॉ.श्रीगुरु जयवंत महाराज बोधले यांनी मार्गदर्शन केले. ते आज प्रवचनाच्या १६ व्या दिवशीचे निरुपण करीत होते.

ज्यांच्या संसारामध्ये दुःखाला सुध्दा प्रवेश करता येत नाही. ज्यांचे चित्त अखंडित प्रसन्नतेने युक्त आहे. ज्या चित्तामध्ये दुःखाला जागाच नाही, असा महात्मा म्हणजे संत एकनाथ होय. दुःखाची जाणीव प्रपंचात होत नाही, असे संत एकनाथ! तुकोबारायांनाही प्रपंचात अनेक प्रकारे त्रास झाला. अनेक दुःखी प्रसंगाला त्यांना सामोरे जावे लागले. तरीही त्यांचे चित्त न डगमगता स्थिर होते. तसेच, संत ज्ञानेश्वर महाराजांनाही दुःख सहन करावे लागले. ज्यांना भक्तीचे सामर्थ्य प्राप्त होते, असे पुरुष 'महात्मा' म्हणूनच ओळखले जात असतात. म्हणजेच संत एकनाथ महाराज प्रपंचातील सुख-दुःखाच्या पलिकडे गेलेले आहेत.

पुढे डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज मुक्ती म्हणजे काय? हे विशद करताना बोलतात, जन्म-मरणाच्या फे-यातून मुक्त होणे म्हणजे मुक्ती. तुकोबाराय भगवंताला विनंती करतात, देवा आम्हाला मुक्ती नको. आत्तापर्यंत जे जे जन्माला आले, त्यांची फजिती झालेली आहे. आम्हाला मुक्ती नको! असे एवढ्या धाडसाने देवाला म्हणणारे संत तुकाराम महाराज हे एकमेव संत आहेत. यावरुन संत तुकाराम महाराजांचे सामर्थ्य लक्षात येऊ शकते. जी वस्तू पूर्वीपासून जवळ असते; ती आम्हाला सतत नकोशी वाटत असते. भक्ती ही दुःखाचा नाश करते. घटना दुःखाची आहे. पण, तिची जाणीव होऊ न देणे, हे भक्तीचे मुख्य लक्षण आहे.

या ठिकाणी डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज भागवतातील दृष्टांत देतात. अखंडित प्रसन्नता येण्यासाठी देवा काय करावे लागेल, असे अर्जुनाने भगवंताला विचारल्यावर भगवान परमात्मा म्हणतात, 'हे चित्त भगवत् स्वरुप होईल तेव्हा प्रसन्नता प्राप्त होते.' मनुष्याला रजोगुण हा त्याच्या चित्ताला स्थिर राहू देत नाही. इंद्रियाची ओढा-ओढ करणारे हे चित्त मनुष्याला स्थिर राहू देत नाही. चित्त हे बहु चंचल आहे. म्हणून, हे अर्जुना, हे चित्त जर स्थिर होत नसेल तर; एक क्षण तरी तू माझ्या चरणाशी समर्पित कर. म्हणजे, एक क्षण चित्त तू मला दिले की, तूला त्या चित्तामधून येणारा अनुभव हा सुखाचा येईल. तो सुखाचा अनुभव घेण्यासाठी 'आणखी एक क्षण, आणखी एक क्षण,....' असे देत देत संपूर्ण चित्त नाहीसे होत जाईल आणि तू सुखी होशील.

उदाहरणार्थ, जसे शरद ऋतू आल्यानंतर नदीचे पाणी हळूहळू कमी-कमी होत जाते आणि शेवटी 'एक दिवस ती नदी कोरडी पडते.' तसा चित्तामध्ये प्रपंच राहत नाही. पौर्णिमेनंतर चंद्र लहान-लहान होत जातो आणि अमावस्येच्या दिवशी शेवटी चंद्र नाहीसा होतो. तसे, चित्त हळूहळू नाहीसे होईल. या सर्व भोगातून हे चित्त, चित्त न राहता ते 'चिदरुप होऊन जाते. 'तेव्हा, देखे अखंडित प्रसन्नता!

एके दिवशी नाथबाबाच्या कीर्तनात एक योगी पुरुष येऊन बसला. कीर्तन संपल्यानंतर तो नाथांशी वाद-विवाद रुपी चर्चा करण्याची मागणी करु लागला. मी तुमच्यापेक्षा श्रेष्ठ आहे, असे सर्व पैठणकरांना सांगा; मागणी करु लागला. नाथांनी लगेच होकार दिला. त्यांची झोपण्याची व्यवस्थाही केली. त्यांनी जवळील देवताच्या मूर्ती काढून ठेवल्या. पहाटे हा योगी उठून त्या मूर्तीची पूजा करावी म्हणून, पाहतो तर त्या मूर्ती तिथे नव्हत्या. बाहेर पाहतो तर त्या रिद्धी- सिध्दीच्या मूर्त्या नाथांच्या अंगणात झाड-झूड, सडासंमार्जन, रांगोळी काढत होत्या. तो योगी आव्वाक् झाला. शेवटी हा योगी नाथांच्या चरणी नतमस्तक झाला. असे नाथांचे हे अद्भूत चरित्र आहे.



### करमाळ्यात नरेंद्र दाभोळकरांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २१ ऑगस्ट-**
करमाळ्यातील महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखेच्या वतीने डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचा स्मृतिदिन व राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिन म्हणून संभाजी ब्रिगेड कार्यालय येथे डॉ. दाभोळकर यांना अभिवादन करण्यात आले.


अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य नागेश माने होते. अनिल माने, राजेंद्र साने, बाळासाहेब दुधे यांनी अभिवादन गीत गायिले. यावेळी यश कल्याणी ग्रामीण सेवाभावी संस्थेचे व अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे तालुकाध्यक्ष गणेश भाऊ करे-पाटील, प्रा. शिवाजी दळवी, प्राचार्य नागेश माने यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मोरेश्वर पवार, संतोष माने, श्रेयस साने, ओंकार माने, मनोज लटके, सुनील गायकवाड, रामचंद्र बोधे, डॉ. आप्पासाहेब लांडगे, केशव घाडगे, प्रथमेश माने, आनंदीताई घिगे-पाटील, विष्णू शिंदे, महेश जगताप उपस्थित होते.

# ३७ हजार शेतकऱ्यांना १६८ कोटी प्रोत्साहन अनुदान

## कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचे साडेतीन कोटी पडून; आधार प्रमाणिकरणाला ७ सप्टेंबरपर्यंतची मुदत

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २१ ऑगस्ट-**
महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेतून जिल्ह्यातील ३७ हजार ६१४ शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये १६८ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत.

नियमित पीककर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि इतर बँकांकडून जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना विनाव्याज ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. त्यानुसार जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये अनुदान जमा करण्यात आले आहे.दरम्यान सन २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० या आर्थिक वर्षात नियमित पिककर्ज परतफेड केलेल्या ६९९ खातेदारांचे अद्यापही आधार प्रमाणीकरण केले नसल्याने ३कोटी ४९ लाख ५०हजार रूपये पडून आहेत. त्यामुळे त्यांच्या खात्यावर प्रोत्साहनपर अनुदान जमा करण्यात आले नाही.




> शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत ३७ हजारांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये प्रोत्साहनपर अनुदान जमा झाले आहे. या योजनेत पात्र ठरलेल्या परंतु अद्यापपर्यंत खात्यावर पैसे जमा न झालेल्या शेतकऱ्यांनी बँकेशी (पीक कर्ज असलेल्या) संपर्क साधावा. बँकेत, आपले सरकार सेवा केंद्रात किंवा महा-ई-सेवा केंद्रात तत्काळ संपर्क साधून आधार प्रमाणिकरण करून घ्यावे.
> **- किरण गायकवाड,** जिल्हा उपनिबंधक, सोलापूर

कर्ज थकलेल्या शेतकऱ्यांना शासन कर्जमाफी देते. परंतु नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना शासन काहीच देत नसल्याची ओरड होत होती. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही शासनाच्या महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतून प्रत्येकी पन्नास हजारांचा लाभ देण्यात आला आहे. या शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण करून घेण्यासाठी शासनाने आता ७ सप्टेंबरची मुदत दिली आहे. प्रोत्साहनपर अनुदानासाठी जिल्ह्यातील ३९ हजार ४८७ जणांना विशिष्ट क्रमांक प्राप्त झाला होता. त्यापैकी ३८ हजार ९९३ खात्यांचे आधार प्रमाणिकरण झाले आहे. ६९९ खात्यांचे आधार प्रमाणिकरण बाकी असून त्यामध्ये सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील १६१ तर इतर बँकेतील ५३८ खात्यांचा समावेश आहे. या योजनेतून ३७ हजार ६१४ खातेदारांना १६८ कोटी रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्यात आले आहे.

### पंढरपूर, सांगोल्यात सर्वाधिक शेतकरी

प्रोत्साहनपर अनुदानाच्या लाभापासून वंचित राहिलेल्या ६९९ शेतकऱ्यांमध्ये सर्वाधिक १२२ शेतकरी पंढरपूर तालुक्यातील आहेत. त्या खालोखाल सांगोल्यातील ११२, माळशिरसमधील ८८, बार्शीतील ७२, दक्षिण सोलापूरमधील ६८, मढ्यातील ६६, मोहोळमधील ४७, अक्कलकोटमधील ३८, करमाळ्यातील ३७, मंगळवेढ्यातील २५, उत्तर सोलापूर तालुक्यातील १४, सोलापूर शहरातील १० शेतकऱ्यांचा समावेश आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# शाळेची बदनामी होण्याच्या भीतीने डॉक्टरांनी 'त्या' चिमुकल्यांवर उपचारास दिला होता नकार!

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२१ ऑगस्ट :**

बदलापुरातील आदर्श विद्यालय नामांकित शाळा असल्याने त्या ठिकाणी अत्याचार झालेल्या बालिकांवर उपचार केल्यास शाळेची व संस्थाचालकाची बदनामी होईल, या भीतीने डॉक्टरांनी चक्क त्या चिमुरड्यावर उपचार करण्यास नकार दिला होता अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे . संबंधित घटना १२ ऑगस्टला घडूनही शालेय संस्थेने हे प्रकरण दडपडून ठेवले होते या मुलीवर उपचार झाले नाहीत. कोणतेही उपचार न झाल्याने ती अनेक तास पोलीस ठाण्यात बाकडावर पडून होती. तर तिची आई पोलिसाकडे तक्रार नोंदवून घेण्यासाठी विनवणी करत धक्कादायक बाब समोर आली आहे.

शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी त्याची कबुली दिली असून संबंधित डॉक्टर रावर कारवाई करण्याचा असल्याचे सांगितले त्याचबरोबर अहवाल आल्यानंतर शाळेतील विश्वस्तांची हकालपट्टी करून प्रशासक नेमण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. देशभरात महिलांवरील अत्याचाराच्या



घटना ताज्या असताना बदलापूरमध्ये अवघ्या चार आणि सहा वर्षांच्या दोन चिमुकल्या मुलींवर शाळेच्या स्वच्छतागृहात अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. त्यानंतर बदलापूरसह संपूर्ण महाराष्ट्रातून संताप व्यक्त केला गेला. शाळेंच्या संस्था चालकांना उद्या हटवण्यात येणार आहे. या शाळेचा कारभार पाहण्यासाठी संबंधित शाळेवर प्रशासक नेमण्यात येणार आहे.

शिक्षण विभागाला आज रात्री बदलापूर प्रकरणातील प्राथमिक अहवाल प्राप्त होणार आहे. संस्था चालकांसोबतच या विभागात असणारे शिक्षणाधिकारी यांच्यावर देखील कारवाईचे संकेत शिक्षण विभागाने दिले आहेत. लैंगिक अत्याचार प्रकरणात शिक्षणाधिकारी यांच्याकडून देखील दुर्लक्ष करण्यात आल्याने त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात येणार असल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले. शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर म्हणाले, मी बदलापूरला जाऊन आलो आहे. विद्यालयाचे ट्रस्टी, मुख्यध्यापक, तसेच ज्या संस्थेने वेळोवेळी तक्रारी केल्या होत्या. या सर्वांना भेटून आलो आहे. मी आंदोलकांना देखील भेटणार होतो, त्यामुळे तिथं झालेला लाठीचार्ज झाला नसता. सदर घटना १२ तारखेला घडली होती. मात्र शाळेने ही घटना दाबली होती. तिथं असणाऱ्या पोलीस निरीक्षकांनी देखील यांनी देखील कारवाईमध्ये दिरंगाई केली आहे. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई होईल.

संबंधित संस्था चालकांनी अपली बदनामी होईल म्हणून प्रकरण दाबून ठेवलं आहे. ज्या डॉक्टरांनी सबंधित मुलीवर उपचार करायला नकार दिला त्यांच्यावर देखील कारवाई होईल. या मुलीवर उपचार झाले नाहीत. कोणतेही उपचार न होता ही मुलगी पोलीस ठाण्यात बाकडावर पडून राहते ही महाराष्ट्रासाठी शरमेची बाब आहे, असंही दीपक केसरकर यांनी सांगितलं.



### आरोपी अक्षय शिंदेला २६ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी

बालिकावर अत्याचार करणाऱ्या मुख्य आरोपी अक्षय शिंदेला (वय २५) आज कल्याण येथील न्यायालयात हजर करण्यात आले असता त्याच्या पोलीस कोठडी २६ ऑगस्ट पर्यंत वाढविण्यात आली. दरम्यान त्याच्या दुष्कृत्यामुळे संताप झालेल्या नागरिकांनी आज त्याच्या बदलापुरातील घराची मोडतोड केली. घरातील सदस्यांना बाहेर काढून सर्व साहित्य फोडून टाकून जमाव घोषणाबाजी करत निघून गेला.

## संक्षिप्त वृत्त



### 'लाडक्या बहिणीपेक्षा सुरक्षित बहिण हवी' ठाकरे गटाची डीजीपीकडे मागणी

**मुंबई, दि.२१ ऑगस्ट-**

बदलापूर येथील अल्पवयीन मुलींवर करण्यात आलेल्या लैंगिक अत्याचारामुळे राज्यात मोठया प्रमाणात असुरक्षिततेची भावना समाजात व विशेषतः महिला वर्गात निर्माण झाली आहे. त्यामुळे राज्यात लाडकी बहिणी योजनेपेक्षा सुरक्षित बहिण हवी या मागणीसाठी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या व युवासेना कार्यकारीणी सदस्या यांनी पोलीस महासंचालक डॉ.रश्मी शुक्ला यांची भेट घेतली. राज्यांच्या महिला सुरक्षिततेसाठी लाडक्या बहिणीचा प्रतिकात्मक चेक महासंचालक यांना विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी देऊ केला मात्र त्यांनी तो स्वीकारण्यास नकार दिला. बदलापूर घटनेतील आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी व या घटनेत दिरंगाई करणाऱ्या पोलीस, शाळा व्यवस्थापनावर कारवाई व्हावी अशा मागणीचे निवेदन पोलीस महासंचालक यांना दानवे यांनी दिले. काही दिवसांपूर्वी उरण, कोपरखैरणे या ठिकाणी अशाच घटना घडल्या. अत्याचाराच्या घटना या सरकार उघड्या डोळ्याने बघत आहे. या घटना रोखण्यास पोलीस दल कुचकामी ठरलं आहे. तसेच या घटना रोखण्यास महायुतीचे सरकार देखील अपयशी ठरल्याचा आरोप अंबादास दानवे यांनी केला आहे. तसेच या घटनेवरून राजकारण सुरू आहे, असं म्हणणाऱ्या सत्ताधाऱ्यांना जनता उत्तर देण्यास सक्षम आहे, अशी प्रतिक्रिया दानवे यांनी मुख्यमंत्री यांनी केलेल्या टिकेवर व्यक्त केली. यावेळी ठाकरे गटाच्या आमदार ऋतुजा लटके, उपनेत्या विशाखा राऊत, माजी महापौर किशोरी पेडणेकर, ज्योती ठाकरे, राजुल पटेल, शीतल देवरुखकर - शेठ, रंजना नेवाळकर, प्रवक्त्या संजना घाडी, ऍड. गुरशीन कौर सहानी, धनश्री कोलगे, अश्विनी पवार, राजोल पाटील, दिक्षा कारकर, धनश्री विचारे आदी उपस्थित होत्या.




### कोलकाता, बदलापूर अमानवी घटनेच्या निषेधार्थ जनवादी महिला संघटनेची निदर्शने

**सोलापूर, दि.२१ ऑगस्ट-**

जिल्हा परिषद पूनम गेट येथे अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या वतीने कोलकाता आणि बदलापूर येथील अमानवी घटनेच्या निषेधार्थ तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी माकपचे ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ.नरसय्या आडम मास्तर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. चिमुकल्या बालकांवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला पाठीशी घालणाऱ्या शिक्षण संस्थेचा निषेध असो, कोलकाता बदलापूर अमानवी घटनेचा निषेध असो, लाडकी बहिण योजना नको सुरक्षित बहीण योजना लागू करा, आशा विविध घोषणांनी परिसर दणाणून सोडले होते. एकीकडे राज्य शासन महिलांना सबलीकरण करण्यासाठी लाडकी बहिण योजना लागू केली पण सुरक्षेचं काय असा सवाल संघटनेचे राज्य अध्यक्ष माजी नगरसेविका नसीमा शेख यांनी केला. दरम्यान माजी आमदार नरसय्या आडम मास्तर म्हणाले की, या देशात दररोज महिलांवर बलात्कार,अत्याचार होतात याबाबत केंद्र सरकार ची यंत्रणा काय करते? कुचकामी पोलीस प्रशासन काय कामाचे? सरकारच्या दिरंगाई मुळे देशाचे अतोनात नुकसान होत आहे. पीडितांना न्याय मिळत नाही विलंब कशासाठी ? या नराधमांना फाशी का देत नाही?असे अनेक जनतेच्या मनातील प्रश्न उपस्थित करून सरकारला धारेवर धरले. यानंतर सिटू चे राज्य महासचिव ॲड.एम.एच.शेख यांनी या घटनेचा निषेध व्यक्त केले. यावेळी व्यापीठावर माजी आमदार नरसय्या आडम मास्तर, एम.एच.शेख, युसुफ मेजर , शेवंता देशमुख,सुनंदा बल्ला,फातिमा बेग, ॲड. अनिल वासम, दत्ता चव्हाण,अशोक बल्ला शकुंतला पाणीभाते , सुनंदा सुर्यवंशी, गंगुबाई कणकी, अफसाना बेग विल्यम ससाणे विक्रम कलबुर्गी, दाऊद शेख, दीपक निकंबे, बापू साबळे, अकील शेख, किशोर मेहता आदींची उपस्थिती होती.




### राष्ट्रीय गुरव समाज महासंघाचे जिल्हा कारागृहात रक्षाबंधन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

राष्ट्रीय गुरव समाज महासंघाच्या वतीने सोलापूर जिल्हा कारागृहातील कैद्यांना राखी बांधून रक्षाबंधनांचा राष्ट्रीय सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमांच्या सुरूवातीला राष्ट्रीय गुरव समाज महासंघाचे कार्याध्यक्ष मल्लिकार्जुन गुरव यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे उपअधिक्षक प्रदीप बाबर साहेब यांनी कैद्यांना बहिणींची उणीव न भासू देता राष्ट्रीय गुरव समाज महासंघातील महिलांनी कारागृहात येऊन कैद्यांना राखी बांधले. या उपक्रमाबद्दल महासंघाचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारागृह अधीक्षक भाऊसाहेब आगावणे होते. कार्यक्रमात महिला भगिणींच्या वतीने सोलापूर शहर अध्यक्ष वैशाली मेलगिरी यांनी कैद्यांना मार्गदर्शन केले व सर्व महिला मिळून कारागृहातील ४५० कैद्यांना राखी बांधून तोंड गोड केले. त्यावेळी अनेक कैदी बांधवांचे अश्रू थांबले नाही. कैद्यांच्या वतीने पुन्हा कुठल्याही प्रकारचा गुन्हा न करण्याचा आश्वासनांची ओवाळणी सर्व उपस्थित राखी बांधलेल्या महिलांना दिले. जिल्हाध्यक्ष निंगराज विंचुरे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ज्ञानेश्वर पाटील, चिन्नय्या स्वामी, शशिकांत जिड्डीमनी, चंद्रकांत गुरव यांनी सहकार्य केले.

# सत्ता दिल्यास शासन कसे चालवितात ते दाखवितो!

- राज ठाकरे यांचे आव्हान
- गोंदियात मनसेचा मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**गोंदिया, २१ ऑगस्ट**



प्रशासनावर दबावतंत्राचा वापर केला जात आहे. निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य अधिकाऱ्यांना नाही. पोलिसांनाही वाटते की काही कमी-जास्त झालं तर बळी आपलाच जाणार. एकदा माझ्या हातात सत्ता द्या, शासन, प्रशासन कसे चालवितात ते दाखवितो. निगरगट्ट शासनामुळे देशात महाराष्ट्राची बदनामी होत आहे. मात्र, राज्यकर्त्यांना याचं काहीही सोयरसुतक नाही, असे वक्तव्य महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केले. ते येथे आज बुधवारी मनसेच्या पदाधिकारी मेळाव्यात बोलत होते.

ठाकरे म्हणाले, राज्याला छत्रपती शिवाजी महाराजांच्या शासन व्यवस्थेची गरज आहे. महाराज असताना बदलापूर, अकोला, पुणे, कोलकातासारख्या घटना घडल्या असत्या तर गुन्हेगारांच्या पायाखालचे चौरंग काढून घेतले असते. मळात आज प्रशासनाचा धाकच गुन्हेगारांना राहिलेला नाही, असे राज ठाकरे म्हणाले. व्यासपीठावर अमित ठाकरे, जिल्हा संघटक रितेश गर्ग, जिल्हाध्यक्ष मनीष चौरागडे, मन्नू लिल्हारे, मुकेश मिश्रा आदी उपस्थित होते.

**पदाधिकाऱ्यांच्या कानपिचक्या :** महायुती, महाविकास आघाडीचे शासन जनतेने पाहिले आहे आणि आज जनता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडे आशेचा किरण म्हणून बघत आहे. स्वातंत्र्यानंतर देशात काँग्रेस पक्ष होता. त्याविरुद्ध लढूनच इतर पक्षांनी वाटचाल केली आणि बळकट झाले. आपल्यालाही प्रस्थापितांविरुद्ध लढूनच पुढे यावे लागणार आहे. शेवटच्या घटकापर्यंत तुम्ही गेल्याचे दिसल्यास जिल्ह्यातील चारही विधानसभा लढू, नाही तर इतर पक्षांकडून सेटिंग करून पैसे कमवायला मी निवडणुकीची तिकिटं देणार नसल्याचे राज ठाकरे म्हणाले.

**मनसे सैनिकांना दिला कानमंत्र :** मनसेचे विचार तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रत्येक मनसैनिकाने आतापासूनच सज्ज व्हावे. येत्या १५ नोव्हेंबरपर्यंत विधानसभा निवडणूक होणे अपेक्षित आहे. या वेळेतच अधिक गतिमान होऊन कामे करावी लागणार आहेत, असेही राज ठाकरे म्हणाले.

# महाविद्यालयांमध्ये महिलांना मिळणार स्व-संरक्षणाचे धडे

- मंगल प्रभात लोढा

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २१ ऑगस्ट-**



बदलापुरातील चिमुरड्या मुलींवर झालेल्या अत्याचारनतर उमटलेल्या जनअक्रोशामुळे सरकारही आता जागे झाले आहे. महिला व बालकांवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी मुंबई उपनगरातील विविध शाळा, महाविद्यालय आणि शासकीय वसतिगृह येथे महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक संस्थानी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था व मुंबई उपनगरमधील प्रत्येक महाविद्यालयांमध्ये सप्टेंबरपासून स्व-संरक्षणाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे, माहिती देण्यात आली आहे.

कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा त्याबाबत माहिती देताना ते म्हणाले.की, राज्यात महिला व बालकांवरील अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ त्याचप्रमाणे शासकीय व खासगी आस्थापना यांनी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून काटेकोरपणे उपाययोजना कराव्यात. शाळा व महाविद्यालयाने आणि विविध संस्थांनी आपल्याकडे नियुक्त केलेल्या कर्मचारी वर्गाची देखील खात्रीपूर्वक तपासणी करावी, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सर्वांनी खबरदारी घ्यावी अशा सूचना त्यांनी केल्या.

# सोलापुरात धार्मिक तेढ निर्माण करणारे बॅनर

- जेलरोड पोलिस ठाण्यात दोन गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट -**

पद्मशाली समाजाचे कुलदैवत श्री मार्कंडेय महामुनींच्या रथोत्सवानिमित्त विनापरवाना आणि धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या मजकुराचा बॅनर लावल्याप्रकरणी जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत.

श्री जीएफएक्सचे प्रोप्रायटर शुभम कडदास (रा. विजय नगर, कुंभारी रोड), अंबादास गोरंटला (रा. सोलापूर) आणि कॉन्ट्रॅक्टर जावेद मंडपचे मालक अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. पोलिस शिपाई विशाल चव्हाण यांनी फिर्याद दाखल केली आहे. सर्वांनी मिळून १९ ऑगस्ट रोजी दत्त नगरातील दाजी गणपती मंदिरासमोर विनापरवाना रस्त्यालगत १० बाय २० लांबी रुंदीचे डिजीटल बॅनर लावून जो हिंदुत्वाचा वारसदार तोच शहर मध्यचा आमदार असा प्रक्षोभक मजकुराचा बॅनर विनापरवाना लावल्याने पोलीस शिपाई विशाल चव्हाण यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. याप्रकरणी तिघांविरुध्द मालमत्तेचे विद्रुपीकरण कायदा प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून पोलीस उपनिरीक्षक मोरे या गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

दुसऱ्या गुन्ह्यात अजय संगा, गणेश अडकूल, सचिन कामूनी (रा. सोलापूर), माऊली मेडीकलचे मालक, बॅनर छापनारे प्रिंटरचे मालक, कॉट्रॅक्टर जावेद मंडपचे मालक यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. यांनी दत्त नगर येथील दाजी गणपती मंदीरासमोर श्री मार्कंडेय महामुनी रथोत्सव व नारळी पौर्णिमा रक्षाबंधन निमित्त हार्दिक शुभेच्छा, या मजकूराचा बॅनर विनापरवाना लावला. पोलिस उपनिरीक्षक डेरे पुढील तपास करीत आहेत.

# बदलापूरप्रकरणी काँग्रेसचा मंत्रालयावर धडक मोर्चा

- उज्वल निकम यांच्या नियुक्तीवर आक्षेप

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २१ ऑगस्ट-**

बदलापुरातील बालिकेवरील अत्याचाराच्या घटनेचे राजकीय पडसाद ओम राज्यभरात आहेत या घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीचे वतीने येत्या २४ ऑगस्टला महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे तर मुंबई काँग्रेसच्या वतीने मंत्रालयावर तर ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने बदलापुरात शाळेवर धडक मोर्चा काढण्यात आला. तर विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची भेट घेऊन याबाबत निवेदन दिले

काँग्रेसने मंत्रालयावर काढलेला मोर्चा महात्मा गांधीच्या पुतळ्याजवळ अडविण्याता आला.यावेळी पत्रकारांशी बोलताना वडेट्टीवार म्हणाले , हे एसआयटी सरकार आहे. कोणतीही घटना झाली की लगेच एसआयटीची घोषणा केली जाते. परंतु कारवाई केली जात नाही. महायुतीची एसआयटी म्हणजे कारवाईचा फार्स आहे. बदलापूर प्रकरणात एसआयटी नेमली तरी न्याय मिळेल का? असा संतप्त करत या प्रकरणी सरकारने विशेष सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांच्या नेमणूकीलाही आक्षेप घेण्यात आला.

बदलापूर येथील चिमुकलीवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ काँग्रेस पक्षाने मंत्रालयावर धडक मोर्चा काढला. पोलिसांनी मोर्चा अडविल्यानंतर महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ महायुती सरकार विरोधात आंदोलनकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी आंदोलनाचे नेतृत्व वडेट्टीवार, मुंबई काँग्रेस अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड, आमदार अस्लम शेख, काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत यांनी केले. यावेळी वडेट्टीवार म्हणाले की, बदलापूर येथील शिक्षण संस्था एका पक्षाशी संबंधित आहे.



त्याच पक्षाच्या संबंधित वकिलाची विशेष वकील म्हणून नेमणूक केली आहे.

या वकिलाने त्याच पक्षाकडून निवडणूक लढविली आहे. उद्या हे प्रकरण दाबले गेले तर त्याला जबाबदार कोण? याचे उत्तर सरकारला द्यावे लागेल. सरकार म्हणते विरोधक राजकारण करत आहेत. तुम्हाला लाज वाटत नाही का सरकार म्हणून? कलकत्ता इथे अत्याचाराच्या घटना झाल्यावर भाजप आंदोलन करते तेव्हा राजकारण नसते का? आम्ही आंदोलन केले की राजकारण होते का? असे खडे बोल वडेट्टीवार यांनी सुनावले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात अशा घटना घडत आहेत. जिल्ह्यात ५७% टक्के गुन्ह्यात वाढ झाली आहे.पण मुख्यमंत्र्यांचे त्याकडे लक्ष नसल्याचा आरोप केला आहे.

# अत्याचाऱ्याला फाशी देणारा शक्ती कायदा तीन वर्षापासून केंद्राकडे पडून

- मंजुरीकडे सरकारचे दुर्लक्ष अनिल देशमुखांनी केला आरोप

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. २१ऑगस्ट:**

राज्यात महिला व तरुणीवर होणारा अत्याचाराला लगाम घालण्यासाठी आंधप्रदेशाच्या धर्तीवर महाराष्ट्रात शक्ती कायदा आनण्यासाठी मी गृहमंत्री असतांना प्रयत्न केले. या कायद्यात अत्याचाऱ्याला थेट फाशीच्या शिक्षेची तरतुद करण्यात आली आहे. यानंतर या कायद्याला विधानपरिषद व विधानसभेची मंजुरी करुन अंतीम मंजुरीसाठी ३ वर्षापुर्वी केंद्र सरकारला पाठविण्यात आला. परंतु अद्यापही त्या कायद्याला अंतीम मंजुरी मिळाली नाही. अत्याचाऱ्याला फाशी देणारा हा शक्ती कायदा महाराष्ट्रात कधी अंमलात आणणार ?असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते व माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी बुधवारी केला आहे.

बदलापुरातील दोन चिमुकलीवर अत्याचार प्रकरणानंतर महाराष्ट्रातील महिला व तरुणीच्या सुरक्षेच्या प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अशा घटनानंतर आरोपीला फाशी देण्याची मागणी होत असते. परंतु सध्या राज्यात अत्याचाऱ्याच्या संदर्भात जो कायदा आहे, त्यात फाशीची तरतुदच नाही. याबाबत देशमुख म्हणाले,' राज्यातील महिला व तरुणीवर होत असलेले अत्याचार कमी करण्यासाठी आंधप्रदेशने जो कायदा आणला होता.त्याच धर्तीवर महाराष्ट्रात सुध्दा कडक कायदा करण्यासाठी गृहमंत्री असतांना मी वरिष्ठ अधिकाऱ्यांना घेवून आंधप्रदेशला गेलो होतो. तेथील कायदाचा अभ्यास



करुन शक्ती कायदाचा मसुदा तयार करण्यासाठी सर्वपक्षीय व वरिष्ठ अधिकऱ्यांचा समावेश असलेल्या २१ सदस्यांची समिती बनवली होती .या समितीने मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथे बैठका घेवून महिलांविषयी काम करणाऱ्या अनेक संघटनाशी चर्चा करुन या कायद्यात काय तरतुदी असव्यात यावर सविस्तर मंथन करण्यात आले. यानंतर कायदाचा मसुदा तयार करुन तो महाराष्ट्रच्या विधानपरिषद व विधानसभेत मंजुर करण्यात आला.

परंतु गेल्या ३ वर्षापासुन अंतिम मंजुरीसाठी हा कायदा केंद्र सरकारकडे धुळखात पडुन आहे. 'लाडक्या खुर्ची'साठी काम करणाऱ्या राज्यातील भाजपाप्रणित सरकारने लाडकी बहिण आणि लाडक्या मुलीवरील अत्याचाराच्या घटना कमी करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करुन हा शक्ती कायदा महाराष्ट्रात लवकरात लवकर अंमलात आणावा, अशी मागणी देशमुख यांनी केली.

### पोलिसांवर कोणाचा दबाव?

बदलापुर प्रकरणात कारवाई करण्यासाठी विलंब केल्याप्रकरणी बदलापुरचे वरिष्ट पोलिस निरीक्षकासह दोन कर्मचाऱ्यांना निलंबित केले. परंतु हे प्रकरण दडपण्यासाठी वरिष्ट निरीक्षकावर कुणाचा दबाव होता, याची सुध्दा चौकशी होण्याची आवश्यकता आहे. पोलिस अधिकाऱ्यांवर दबाव असल्याशिवाय ते एवढया गंभीर प्रकरणात कारवाईसाठी विलंब करुच शकत नाही, असेही देशमुख यांनी सांगितले.

## अग्रलेख...

# अन्यायाविरोधात दाद मागणारा दुजाभाव

बदलापुरात सफाई कर्मचाऱ्याने दोन चिमुकल्या मुलींवर केलेल्या अत्याचाराच्या मन हेलावून टाकणाऱ्या घटनेनंतर उभ्या झालेल्या जनआक्रोशामुळे सरकारने तीन पोलिसांना निलंबित केले असून या प्रकरणाची जलद गती न्यायालयात सुनावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. अतिशय दुर्दैवी, निंदनीय आणि मन हेलावून टाकणाऱ्या या प्रकरणात वरिष्ठ आयपीएस अधिकारी आरती सिंह यांच्या अध्यक्षतेत एसआयटी गठित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सोबतच या खटल्यासाठी विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पण एवढ्यानेच न्याय मिळाला, असे म्हणता येणार नाही. संबंधित आरोपीला कठोरात कठोर शिक्षा लवकरात लवकर होण्यासाठी शक्य त्या सर्व उपाययोजना केल्या जायला हव्यात. बदलापूरच्या घटनेचा तीव्र निषेध व्हायलाच हवा आणि तो लोकांनी व्यक्त केलादेखील. कोणत्याही सभ्य समाजात अशा घटना कायदा आणि सुव्यवस्थेचा धाक नसल्यामुळे अथवा कसेही वागा, कोणीही आपले काहीही वाकडे करू शकत नाही, अशा निर्ढावलेल्या वृत्तीमुळेच होऊ शकतात. अशा गंभीर घटनांमध्ये राजकीय पोळी शेकण्याचा विरोधकांचा सुरू असलेला प्रयत्न दुर्दैवीच म्हणायला हवा. एकीकडे बदलापूरच्या घटनेत एकतेची वज्रमूठ दाखवणारे विरोधक कोलकात्यामध्ये एका प्रशिक्षणार्थी डॉक्टर तरुणीची बलात्कार करून हत्या करण्याच्या हैवानी प्रकाराबाबत चकार शब्द काढायला तयार नाही. एरवी छोट्या-मोठ्या अन्यायाविरुद्ध दाद मागण्यासाठी की कॅमेरापुढे चमकोगिरी करण्यासाठी विभिन्न राज्यांमधील घटनास्थळी धाव घेणारे राहुल गांधी, प्रियांका वढेरांसह इंडिया आघाडीच्या नेत्यांना ना अयोध्येत धाव घ्यावीशी वाटली ना कोलकात्यातील अत्याचाराची दखल घेण्याची उपरती झाली. या नृशंस घटनेबद्दल ट्विट करण्याची वा समाजमाध्यमांद्वारे जनजागृती करण्याचीदेखील त्यांना गरज भासली नाही. कोलकात्याच्या रस्त्यांवर गोंधळ घालण्यासाठी उतरलेल्या हजारो समाजकंटकांवर कारवाई व्हावी, घटना घडली त्या इस्पितळातील तोडफोडीचा निषेध व्हावा, यासाठीही पुढाकार घेण्यात त्यांनी स्वारस्य दाखविले नाही. या घटनांचा निषेध करताना त्यांची जीभ मात्र कचरली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुप्रिया सुळे कोलकात्याच्या दुर्घटनेबद्दल बोलताना म्हणाल्या, देशात अशा खूप साऱ्या घटना होतात; त्यांचा आम्ही निषेध करतो. ममता बॅनर्जी अतिशय संवेदनशील नेत्या असून त्या या प्रकरणात लवकरात लवकर कारवाई करतील, असा मला विश्वास आहे. आपल्या मित्र पक्षाचे सरकार पश्चिम बंगालमध्ये आहे म्हणून त्याबद्दल सावध प्रतिक्रिया द्यायची आणि महाराष्ट्रातील बदलापूरमध्ये शेकडो लोकांना गोळा करून उपद्रव करायचा, हे म्हणजे 'पीक अँड चूज' प्रकारातले म्हणायला हवे.

खरोखरीच विरोधकांना न्यायाची चाड असेल तर आरोपी बदलापूरचे असोत की हैदराबाद, अयोध्या, कोलकात्याचे... न्यायासाठी एकतेची वज्रमूठ बांधावी. रस्त्यावर उतरावे. संबंधित संस्थांमध्ये धुडगूस घालावा. त्या संस्थांच्या मालमत्तेचे नुकसान करावे. त्या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या प्रामाणिकतेबाबत संशय उपस्थित करावा. पोलिसांच्या तपासातील फोलपणा उघड करावा. पण नाही भाजपाशासित राज्यात होणाऱ्या बलात्काराच्या घटना अमानवीय, तेथील सरकार अकार्यक्षम, यंत्रणा गुन्हेगारांना संरक्षण देणारी, प्रशासन गोरगरिबांच्या न्यायाकडे दुर्लक्ष करणारे, दलितांबाबत कणव नसणारे, मागासवर्गीयांबद्दल असंवेदनशील आणि अल्पसंख्यकांची चिंता न करणारे असे दोषारोपण करून विरोधक मोकळे होत आहेत. बदलापुरात १० तास लोकलची वाहतूक रोखून धरणाऱ्यांनी कोलकात्यात असा पुढाकार का घेतला नाही, असा प्रश्न उपस्थित झाला तर यांच्याजवळ काय उत्तर आहे. उलट ममता बॅनर्जी यांच्यासाठी संवेदनशील नेत्या आहेत. त्यांची संवेदनशीलता संदेशखालीमध्येही दिसून आली नाही. आपल्याच पक्षाचा नेता संदेशखालीतील असहाय्य महिलांवर अत्याचार करतो, त्यांच्याकडून खंडणी वसुली करतो, त्यांना धमकावतो, त्यांचे भूखंड बळकावतो, तेव्हा कुठे जाते ममतांची संवेदनशीलता? त्यांना प्रत्येक गोष्टीत राजकारण करायचे आहे. बदलापूरमध्ये माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलेले राजकारण साऱ्यांनी उघड्या डोळ्यांनी बघितले. इतक्या जबाबदार पदावर राहिलेल्या व्यक्तीला इतक्या खालच्या थराचे राजकारण करणे शोभले का, असा प्रश्न विचारला जाऊ लागला तर तुम्ही जनतेला दोष देणार का? अशा प्रकरणात पीडितांना तत्परतेने न्याय कसा मिळवून देता येईल, याचा प्रयत्न व्हायला हवा होता. कायदा आणि सुव्यवस्था राखणे आणि मुलींना न्याय देणे हे केवळ सरकारचेच कर्तव्य नसते. विरोधकांनाही सरकारला साथ द्यायची असते. मात्र, सध्या विरोधक देशात अराजकता कशी माजेल, याच्या तयारीत आहेत. संसदेत बिनबुडाची भाषणे करणे, आरडाओरड करणे, मोदींना दोष देणे हा एककलमी कार्यक्रम त्यांनी हाती घेतला आहे. आता महाराष्ट्रात त्यांच्या डोळ्यात देवेंद्र फडणवीस खुपून राहिले आहेत. त्यांना काही माध्यमांचीही साथ मिळाली आहे. देशात गुन्हेगारी प्रचंड वाढली आहे. देशात केवळ चोऱ्यामाऱ्या, बलात्कार, खंडणीखोरी, फसवणुकीचेच प्रकार होत आहेत, असा जनतेचा समज करून देण्याचा यांनी विडा उचलला आहे. फडणवीसांचा मराठा आंदोलनाला कसा विरोध आहे, हे सिद्ध करण्यासाठी मनोज जरांगे यांना पुढे केले आहे. दुसरीकडे भाजपा, शिंदेंची शिवसेना आणि अजित पवार यांच्या पक्षांच्या डोळ्यातील कुसळ काढण्याची जबाबदारी सकाळी नऊच्या भोंग्याने स्वीकारली आहे. बाळासाहेबांच्या विचारांचे या पाईकांनी आता हिरव्या बावट्यांपुढे शरणागती पत्करली आहे. असो.

बदलापूर घटनेच्या निमित्ताने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. देशातील प्रत्येक अत्याचाराविरुद्ध न्याय मिळविण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधकांची वज्रमूठ बांधली जायला हवी का? विरोधकांना पीडित परिवाराला न्याय मिळवून देण्यात रस आहे की त्यांना निव्वळ गोंधळ घालून देशात गृहयुद्ध भडकवायचे आहे? प्रत्येक वेळी मुख्यमंत्री, गृहमंत्री अथवा संबंधित मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्याने काही साध्य होणार आहे का? बदलापूरमध्ये एका हाकेसरशी गोळा झालेल्या लोकांमध्ये पालकांची संख्या किती होती? गुन्हा करणाऱ्या व्यक्तीच्या दोषासाठी शाळेची मान्यता रद्द करण्याची मागणी कितपत योग्य आहे? एरवी आंदोलनांचे श्रेय घेण्यासाठी पुढे पुढे करणारे पुढारी या आंदोलनात नेमके कुठे दिसेनासे झाले? लोकसभेत फटका बसल्यामुळे त्यापासून धडा घेत सावरण्यासाठी सत्ताधारी पक्षाने एकापाठोपाठ एक घेतलेल्या निर्णयांमुळे घाबरलेल्या विरोधकांनी बदलापूरच्या निमित्ताने वचपा तर काढला नाही? आम्हाला लाडकी बहीण नको, आम्हाला लाडक्या बहिणींच्या चिमुकल्यांसाठी न्याय हवा, ही आंदोलनकर्त्या महिलांची मागणी, या घटनेवरून केल्या गेलेल्या राजकारणाकडे अंगुलिनिर्देश करते की नाही? मुळात मुद्दा असा आहे की, घटना झाल्यानंतर आपल्याला जाग येते. त्या घडू नये यासाठी काही प्रयत्न केले जायला हवेत की नको? दिल्लीच्या निर्भया प्रकरणात सारा भारत एकवटूनही न्यायाला किती विलंब लागला, हे आपण साऱ्यांनी बघितले आहे. या पृष्ठभूमीवर मुलींच्या सुरक्षिततेबाबत अधिक जागरूकता आणण्याची गरज आहे. मुलांनाही वर्तणुकीचे धडे सातत्याने दिले जायला हवे. सर्वत्र बोकाळलेल्या स्वैराचारावर निर्बंध आणायला हवेत. बहुतांश गुन्ह्यांमध्ये दारू हा महत्त्वाचा घटक असतो. त्यामुळे दारू प्राशनाचे कायदे अधिक कठोर करण्याची गरज आहे. इंटरनेटमुळे पोर्नोग्राफीचाही सुळसुळाट झाला आहे; तो आटोक्यात आणण्याची गरज आहे. सत्ताधाऱ्यांनीही केवळ विरोधकांच्या भूमिकेबाबत संशय घेण्याऐवजी आपल्या जबाबदारीचे योग्य प्रकारे निर्वहन करण्याची अपेक्षा व्यक्त करताना विरोधक अन्यायाविरोधात दाद मागताना दुजाभाव करीत आहेत, ही बाबही अधोरेखित केली जायला हवी.

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# वक्फ कायद्यात नियंत्रणात्मक सुधारणा

८ ऑगस्ट २०२४ रोजी 'एकीकृत वक्फ प्रबंधन सशक्तीकरण दक्षता आणि विकास अधिनियम १९९५' लोकसभेच्या पटलावर ठेवण्यात आले. बिल पटलावर ठेवताना कोणत्याही प्रकारे मुसलमानांच्या धार्मिक बाबतीत हस्तक्षेप न करता, त्यांचे धार्मिक स्वातंत्र्य कायम राखत लोकाभिमुखता आणण्याचा हा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन केंद्रीय अल्पसंख्यक मंत्री किरण रिजिजू यांनी केले. फाळणीच्या पृष्ठभूमीवर भारतातून पाकिस्तानात गेलेल्या अनेक मुस्लिम कुटुंबांनी जाताना घाईघाईने आपली संपत्ती वक्फ केली. या मागील कारस्थान असे की, पाकिस्तानात जाऊन तिथे बहुसंख्य मुस्लिम असल्याने ती जमीन दार-उल-इस्लाम करायची. म्हणजे तेथील सगळे कायदे आणि व्यवस्था इस्लामप्रमाणे प्रस्थापित करायची. या इस्लामिक व्यवस्थेचा फायदा घेऊन हिंदूंना तेथून पळवून लावून त्यांची तेथील जमीन व संपत्ती हडप करायची. त्याच वेळी येथील मुसलमानांची संपत्ती व जमीन हिंदूंना ताब्यात घेता येऊ नये म्हणून वक्फ करायची. त्यायोगे हिंदुस्थानातील मुस्लिम संपत्ती आणि जमीन इस्लामिक लोकांच्याच हातात राहून त्याचा फायदा फक्त मुसलमानांनाच मिळेल. म्हणजे पाकिस्तान तर घेतलाच आहे; पण भारतातील मुसलमानांची जमीन व संपत्तीवरदेखील इस्लामचाच ताबा ठेवायचा. हे कटकारस्थान लक्षात येऊनही तेव्हा सत्तेवर असलेल्या जवाहरलाल नेहरू आणि काँग्रेस यांनी १९५४ मध्ये मुस्लिम धर्मातील विविध संकल्पनांना अनुसरून वक्फ कायदा पारित करीत वक्फ बोर्डाची स्थापना केली. या कायद्याच्या व बोर्डाच्या स्थापनेमागे जरी वरपांगी उद्देश वक्फ म्हणजे मुस्लिम धर्मदाय संस्था व त्यांच्या संपत्ती व जमिनीचे आगणन आणि नियंत्रण करणे असा सांगितला गेला तरी मुळ उद्देश पाकिस्तानात निघून गेलेल्या मुसलमानांची संपत्ती हिंदूंनी ताब्यात घेऊ नये हाच होता, असेच काँग्रेस पक्षाने या कायद्यात १९९५ मध्ये नरसिंह राव आणि २०१३ मध्ये मनमोहनसिंग यांच्या काळात केलेले बदल पाहता म्हणावे लागते. वक्फ बोर्डाचा पदसिद्ध अध्यक्ष हा भारताचा अल्पसंख्यक मंत्री असतो. (स्मृती इराणी आणि विद्यमान किरण रिजिजू यांचा अपवाद वगळता जे सगळे मुस्लिमच होते.) या वक्फ बोर्डावर नेमण्यात येणाऱ्या सर्व व्यक्ती मुस्लिमच असायला हव्यात. कोणत्याही संपत्तीबद्दल काहीही विवाद असेल तर तो वक्फ बोर्ड ट्रॅब्यूनल समोरच प्रथम मांडण्यात यावा. वक्फ सर्वे कमिशनने एखादी संपत्ती वक्फची म्हणून जाहीर केली व त्यावर कोणीही आक्षेप न नोंदविला तर ती संपत्ती वक्फच्या मालकीची समजावी. अशी अतार्किक पण मुस्लिमधार्जिणी प्रावधाने या कायद्यात काँग्रेसच्या सत्ता काळात केली गेली. परिणामी वक्फ बोर्डाचे एका लोकशाही विरोधी, हिंदू विरोधी अशा कायदेशीर संस्थेत रूपांतर झाले. या वक्फ कायद्यात आणि त्यायोगे वक्फ बोर्डाच्या अधिकारांना लगाम घालणे आवश्यक होऊन बसले होते. मोदी सरकारने वक्फ कायद्याने वक्फ बोर्डाला दिलेल्या अमर्यादित अधिकारांना नियंत्रित करून या बोर्डाला अधिक पारदर्शक, लोकाभिमुख व उत्तरदायी बनवण्याचा प्रयत्न केलेला आहे. मोदी सरकारने वक्फच्या कायद्यात काही बदल करण्याची शिफारस केलेली आहे. हे बदल सर्व समाजाने आणि त्यातही हिंदू समाजाने समजून घेतले पाहिजेत.

**१.** पहिला महत्त्वाचा बदल म्हणजे तोंडी वक्फ तयार करता येणार नाही. म्हणजे आता वक्फ तयार करण्यासाठी 'वक्फ डीड' असणे आवश्यक राहील. याचा अर्थ कोणीही कोणाच्याही जवळ फक्त संपत्ती वक्फ करण्याची इच्छा व्यक्त केली म्हणून संपत्ती वक्फ होणार नाही. कायदा लागू झाल्यापासून वक्फ करण्यात आलेल्या सर्व संपत्तींची नोंदणीकृत कागदपत्रे आवश्यक होतील. आधीच्या कायद्यात असलेले तोंडी वक्फ करण्याचे प्रावधान निरस्त करण्याची शिफारस करण्यात आली आहे. म्हणजे जर वक्फ बोर्डाने एखादी संपत्ती आपल्या मालकीची आहे, असा दावा केला तर तो दावा त्यांना नोंदणीकृत कागदपत्रांच्या आधारे सिद्ध करावा लागेल. **२.** दुसरा महत्त्वपूर्ण बदल म्हणजे वक्फ बोर्डावर दोन मुस्लिम महिला व दोन गैरमुस्लिम व्यक्तींची नेमणूक करावी लागेल. म्हणजे अध्यक्ष अधिक १० सभासद (१+१०=११) अशा बोर्डाच्या रचनेत दोन मुस्लिम स्त्रिया व दोन गैरमुस्लिम व्यक्ती असणे आवश्यक राहील. यामुळे वक्फच्या नावाखाली इतर समाजांच्या विरोधात होणारी कारस्थाने वा लांड्यालबाड्यांवर मर्यादा येतील. **३.** याशिवाय या बोर्डावर अहमदिया, बोहरी, आगाखानी, सुन्नी व शिया पंथांच्या व्यक्तींना प्रतिनिधित्व देणे अनिवार्य केले आहे. आतापर्यंत या देशातील बहुसंख्य असलेल्या सुन्नी पंथीय व्यक्तींचीच नेमणूक या बोर्डावर करण्यात येत असे. या नवीन प्रावधानामुळे विविध इस्लामिक पंथांना व जातींना वक्फ बोर्डावर प्रतिनिधित्व मिळून ते अधिक लोकाभिमुख होणार आहे. मुस्लिम समाजातील माघारलेल्या जाती-जमातींतील तसेच खालच्या स्तरातील लोकांनादेखील प्रतिनिधित्व मिळेल. उदाहरणार्थ पसमंदा मुस्लिम तसेच यामुळे या बोर्डाद्वारे पसरविण्यात येणाऱ्या कट्टरतेला आळा बसेल, असे म्हणायला जागा आहे. **४.** या आधीच्या प्रावधानांनुसार कोणत्याही संपत्तीच्या मालकी हक्कासंबंधी कोणताही विवाद हा फक्त 'वक्फ न्यायाधीकरणाच्या (ट्रॅब्यूनल)' समोर मांडणे आवश्यक होते. या वक्फ न्यायाधीकरणावरील सर्व नेमणुका वक्फ बोर्ड करीत असे. त्यामुळे वकिलांपासून पीठासीन अधिकाऱ्यांपर्यंत सगळे मुस्लिमच असत. यामुळे बहुतेक वेळा विवाद जर गैरमुस्लिम पक्षाशी असेल तर निर्णय हे वक्फ बोर्डाच्या किंवा मुस्लिम पक्षाच्या बाजूनेच लागत असत. शिवाय जाणूनबुजून अनेक विवादांमध्ये निर्णय येण्यासाठी बराच कालावधी लावला जात असे. तसेच त्या विवादाचा निर्णय लागेपर्यंत विवादित संपत्ती ही वक्फची संपत्ती मानली जात असे. देशभरामध्ये वक्फशी संबंधित संपत्तीचे ५८ हजार खटले वक्फ न्यायाधीकरणाकडे आज प्रलंबित आहेत. न्यायाधीकरणाच्या निर्णयानंतर मग उच्च न्यायालय, त्यानंतर सर्वोच्च न्यायालय अशी प्रक्रिया पूर्ण करावी लागते. आता नवीन प्रावधानानुसार वक्फशी संबंधित जमिनीचे विवाद वक्फ न्यायाधीकरणाच्या न्याय कक्षेत न राहता सामान्य जमिनीच्या विवादांप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांच्या किंवा कोणत्याही दिवाणी न्यायालयाच्या न्याय क्षेत्रात येतील. तसेच जोपर्यंत जिल्हाधिकारी विवादावरील अहवाल सरकारला देत नाही तोपर्यंत ती संपत्ती वक्फ बोर्डाची संपत्ती मानली जाणार नाही. या आधी वक्फ बोर्डाने एखाद्या संपत्तीवर आपला मालकी हक्क सांगितला की त्याच्या विरोधात निर्णय येईपर्यंत ती वक्फ बोर्डाची संपत्ती समजली जात होती. हा एक महत्त्वपूर्ण बदल या संशोधित बिलाने होणार आहे. या संशोधनाचा परिणाम पक्षकारांना वेगवान तसेच कमी खर्चात योग्य न्याय मिळण्यात होईल, हे निश्चित. **५.** या आधी वक्फच्या 'मुत्तावली'ना काही विशेष अधिकार प्रदान करण्यात आले होते. या सुधारित बिलाने मुत्तावलीच्या अधिकारांना बऱ्याच मोठ्या प्रमाणात लगाम घालण्याचा प्रयत्न आहे. आता कोणत्याही संपत्तीचा विवाद सोडवणुकीसाठी मुत्तावली, मिटिंग करण्यासाठी खर्च, कोणताही चार्ज वा खर्च पक्षकार तसेच वक्फ बोर्डाला लावू शकणार नाही. या प्रावधानामुळे अकारण विवाद निर्माण करीत गावोगावी होणाऱ्या प्रत्येक जमिनीच्या व्यवहारातून हिंदूंकडून काही पैसा उकळण्याचा मुत्तावलींच्या गोरख धंद्याला चाप बसेल. **६.** सरकारमधील जॉईंट सेक्रेटरी दर्जाच्या अधिकाऱ्याचीच बोर्डाचा कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त करता येईल. यामुळे वक्फ बोर्डाच्या सर्वसाधारण प्रशासकीय दर्जामध्ये वाढ होऊन कार्यालयीन शिस्त वाढेल, असे समजायला हरकत नाही. त्याचवेळी...

याचा अर्थ आज जरी बहुसंख्य हिंदू वक्फ कायदा निरस्त करण्याची मागणी करीत असले आणि असदुद्दीन ओवैसींसारखे मुस्लिम वा काही विरोधी पक्षातील नेते हे बिल म्हणजे मुसलमानांचे धर्म स्वातंत्र्य हिरावून घेणे म्हणत असले, तरी केंद्र सरकारने वक्फ बोर्डाला आधीच्या कायद्यांनी दिलेले अमर्यादित अधिकार फक्त नियंत्रित करण्याचे हे प्रयत्न आहेत, असेच म्हणावे लागते.

९८८१२४२२२४

## वेध

**नीलेश जोशी**

# मानसिक विकृती

देशात आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नऊ दिवस दुर्गोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मातृपूजनाची संस्कृती असलेल्या आमच्या देशाची ही सांस्कृतिक परंपरा. त्यातही दुर्गोत्सवासाठी विशेष ओळख आहे, ती पश्चिम बंगालची. नवरात्रीतील नऊ दिवसांसह वर्षभर परमेश्वराची आराधना करीत असताना 'मातृरुपेणं संस्थिता' असे मागणे त्या जगन्नियंत्याकडे आपण मागत असतो. ही आनंददायी आणि अभिमानास्पद बाब असतानाच दुसरीकडे मात्र देशात घडणाऱ्या घटना मन पिळवटून टाकणाऱ्या आहेत. ज्या पश्चिम बंगालमध्ये देशात नव्हे, जगात सर्वात मोठा दुर्गोत्सव साजरा होतो, त्याच पश्चिम बंगालची राजधानी असलेल्या कोलकाता शहरात निवासी डॉक्टरवर अमानुष अत्याचार होतो. या वेदनादायी वृत्ताची शाई वाळण्यापूर्वीच परस्त्रीला मातेसमान मानणाऱ्या छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रात बदलापूर शहरात बालवाडीत शिकत असलेल्या दोन चिमुकल्या मुलींवर एका नराधमाने अत्याचार केल्याचे वृत्त येते. त्यातून सावरत असतानाच अकोला जिल्ह्यातील बाळापूरमधील काजीखेड येथे एका शिक्षकाने त्याच्या सहा विद्यार्थिनींना अश्लील चित्रफीत दाखवत त्यांच्यासोबत लगट करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले. या घटना मन सुन्न करणाऱ्याच!

जिला आम्ही माता म्हणतो, जिच्या रक्षणाचा संकल्प दरवर्षी रक्षाबंधनातून घट्ट करतो, तिचे लचके जेव्हा तोडले जातात. कुठे एक जण तर कुठे माणसांच्या रूपात असलेला हिंस्र कळप तिच्यावर तुटून पडतो. कधी अनपेक्षित तर कधी कट रचून नराधम डाव साधतात तेव्हा या नरपशूसाठी अत्यंत कठोर, विकृतांच्या विकृतीला जरब बसविणारी शिक्षा तातडीने व्हावी, अशी भावना प्रत्येकाची असते. यात दोषी असणाऱ्याची पृष्ठभूमी काहीही असो, त्याचा जात, धर्म, पंथ याचा विचार न करता शासन-प्रशासनाने या जनभावनेची अंमलबजावणी ही रास्त अपेक्षा असते. ती योग्यच आहे. पण ज्यावेळी या अपेक्षेला छेद देण्याचा प्रयत्न होतो तेव्हा जनक्षोभ उसळतो. ही अत्यंत स्वाभाविक भावना आहे.



कोलकाता येथे आरजी कार मेडिकल कॉलेज येथील घटना ९ ऑगस्ट रोजी समोर आली. त्यानंतर ही घटना आत्महत्या भासविण्याचा प्रयत्न केला गेला. एवढेच नव्हे, तर पीडितेच्या पालकांना मृतदेह पाहू दिला नाही आणि त्यावरही कळस म्हणजे सकाळी घटना उघडकीस येऊनही रात्री उशिरापर्यंत याबाबत पोलिस तक्रार नोंदविली गेली नव्हती. पीडितेचा शवविच्छेदन अहवाल तर सुन्न करणारा आहे. शेवटी कोलकाता उच्च न्यायालयाने हे प्रकरण सीबीआयकडे सोपविण्याचे आदेश दिले. त्यानंतर आता सर्वोच्च न्यायालयाने याची सुनावणी स्वत:कडे घेतली. सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी पश्चिम बंगाल सरकारच्या कामगिरीवर अनेक प्रश्न उपस्थित करून जाब विचारला. पण कोडग्या राज्य शासनाने कुणाला तरी वाचविण्याच्या प्रयत्नात माणुसकीच्या सर्व मर्यादा पार केल्याचे दिसून येते. कारण अद्याप या प्रकरणातील सत्य समोर आले नाही. पण दुसरीकडे याबाबत माध्यमांशी संवाद साधणाऱ्या व्यक्तींना राज्य शासन नोटीस बजावते. दुर्दैव म्हणजे हा सर्व घटनाक्रम पश्चिम बंगालमधील असून तेथील मुख्यमंत्रिपद महिला भूषवित आहे. दुसरी घटना मुंबईनजीक असलेल्या बदलापूरची. येथे नकळत्या वयातील चिमुकलींचे लचके तोडणारा पिशाचचे काळे कारनामे समोर आले. दुर्दैवाने येथेही पोलिस अधिकारी असलेल्या महिलेने तक्रार दाखल करून घेण्यास उशीर केला. म्हणूनच जनक्षोभ उसळला. पण राज्य शासनाने त्याची तत्काळ दखल घेऊन दोषी असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना निलंबित केले. तसेच या प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करणार असल्याची घोषणा केली. एवढेच नव्हे, तर हा खटला जलद न्यायालयात चालविण्याचे सांगितले. राज्यातील दुसऱ्या घटनेतील अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यातील आरोपीला तातडीने अटक करण्यात आली आहे.

समाज व्यवस्थेत आधुनिकतेच्या नावाखाली धुडगूस घालणाऱ्या अनेक बाबी कारणीभूत आहेत. त्यातही मोबाईलमधून नको त्या बाबी पाहण्याचा छंद अनेकांना कळत्या-नकळत्या वयात लागल्याचे दिसून येते. यातून उद्दीपित होणाऱ्या विकृत भावना हेही एक कारण आहेच. या मानसिक विकृतीला आळा घालण्यासाठी कायद्यांच्या कठोर अंमलबजावणीसह समाजात नैतिक मूल्यांच्या रुजवणुकीचे प्रयत्न आवश्यक आहेत.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# लॅटरल एंट्री, काँग्रेसची भूमिका आणि मोदी सरकार

केंद्र सरकारच्या सेवेत थेट भरतीने (लॅटरल एंट्री) सहसंचालक, संचालक आणि उपसंचालक अशा ४५ जागा भरण्याचा निर्णय सरकारने मागे घेतला. हा निर्णय म्हणजे सरकारची आणि भाजपाची माघार आणि आपला विजय असल्याचा समज काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी करून घेतला आहे. थेट भरतीच्या निर्णयात काही सुधारणा करण्यासाठी सरकारने या निर्णयाला तात्पुरती स्थगिती दिल्याची घोषणा माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली. थेट भरतीत आरक्षणाचा सिद्धांत लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतला असून यातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या घटनेबद्दलची प्रतिबद्धता दिसून येत असल्याचा निर्वाळाही वैष्णव यांनी दिला आहे. राजकारणात अनेक वेळा दोन पावलं पुढे जाण्यासाठी एक पाऊल मागे घ्यावे लागते, तसे सरकारच्या या निर्णयाबद्दल म्हणावे लागेल.

खाजगी क्षेत्रातील तज्ज्ञ आणि विशेषज्ञांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा सरकारला फायदा व्हावा, म्हणून थेट भरतीचा निर्णय घेण्यात आला होता. हा निर्णय मोदी सरकारने २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर घेतला, असे काही जणांना वाटू शकते; पण वस्तुस्थिती तशी नाही. काँग्रेस नेते एम. वीरप्पा मोईली यांच्या नेतृत्वातील दुसऱ्या प्रशासकीय आयोगाने २००५ मध्ये सरकारी सेवेत काही क्षेत्रातील लोकांना सामावून घेण्याची शिफारस केली होती. त्यानुसार सरकारी सेवेत खाजगी क्षेत्रातील लोकांचा प्रवेश सुरू झाला होता. मात्र, आज काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्ष ज्या कारणाने थेट भरतीचा विरोध करीत आहेत, त्या आरक्षणाच्या मुद्याची पूर्तता काँग्रेसच्या सरकारने आपल्या कार्यकाळातही केली नव्हती. थेट भरतीचा हा निर्णय अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींवर अन्याय करणारा असून सरकारी नोकऱ्यातील आरक्षण रद्द करण्याचा मोदी सरकारचा हा प्रयत्न असल्याचा आरोप काँग्रेसने केला. थेट भरतीचा हा निर्णय संविधानाच्या विरोधात असल्याचा आरोपही काँग्रेसने केला आहे.

काँग्रेसचा हा आरोप खरा मानला तर काँग्रेसच्या नेतृत्वातील संपुआ सरकारने संविधानविरोधी आणि दलित, आदिवासी आणि ओबीसींवर अन्याय करणारा, त्यांचे हक्क हिरावण्याचा निर्णय घेतल्याचे म्हणावे लागेल. म्हणजे भाजपाला दलित, आदिवासी आणि ओबीसीविरोधी ठरवणारी काँग्रेस स्वत:च दलित, आदिवासी आणि ओबीसीविरोधी आहे, असे म्हणावे लागेल. एक बोट दुसऱ्यावर (मोदी सरकारवर) रोखताना उर्वरित चार बोटं आपल्याकडे वळलेली असतात, तसे काँग्रेसचे या मुद्यावर झाले आहे. मुळात काँग्रेसचा हा आरोप राजकीय हेतूने प्रेरित आहे, तसेच काँग्रेसची ही पश्चातबुद्धी म्हटली पाहिजे. तसे नसते तर थेट भरती लागू करताना काँग्रेसने त्यात आरक्षणाची तरतूद केली असती. पण काँग्रेसने हा निर्णय घेतला, तेव्हा त्यांना त्यात आरक्षणाची गरज वाटली नाही. आणि आज मोदी सरकारने व्यापक हितासाठी थेट भरतीचा निर्णय घेतल्यावर काँग्रेस आता थयथयाट करत आहे. विशेष म्हणजे काँग्रेसने थेट भरतीचा निर्णय २००५ मध्ये अधिकृतपणे घेतला असला, तरी त्याच्या कितीतरी वर्षे आधी आपल्या देशात या पद्धतीने थेट भरती करण्यात आली. संपुआ शासन काळात २००४ ते २०१४ अशी १० वर्षे देशाचे पंतप्रधानपद भूषवणाऱ्या डॉ. मनमोहनसिंग यांचा याच पद्धतीने अर्थसचिव म्हणून १९७६ मध्ये सरकारी सेवेत प्रवेश झाला होता. मोंटेकसिंग अहलुवालिया यांनाही याच पद्धतीने आताच्या नीती आयोगाचे तसेच तेव्हाच्या योजना आयोगाचे उपाध्यक्ष करण्यात आले होते. सोनिया गांधी यांनी आपल्याकडे राष्ट्रीय सल्लागार परिषदेचे अध्यक्षपदही या मार्गाने मिळविले होते. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुनसिंह मेघवाल यांनी हा आरोप केल्यामुळे त्यात निश्चितच तथ्य असले पाहिजे. काँग्रेसच्या सरकारने थेट भरतीची ही योजना मनमानी पद्धतीने राबवली, पण मोदी सरकारने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून (युपीएससी) या भरतीला कायदेशीर रूप दिले. २०१८ मध्ये युपीएससीने पहिल्यांदा या पद्धतीने भरती केली. तेव्हा सहसचिवपदासाठी ६०७७ अर्ज आले होते; यातून युपीएससीने फक्त ९ जणांची निवड केली. विशेष म्हणजे या पद्धतीने भरती झालेले विविध मंत्रालयातील ९ सहसचिव आयएएस अधिकाऱ्यांच्या क्षमतेने आणि कौशल्याने सेवा देत आहेत. असे अनेक सहसचिव प्रस्तुत लेखकाच्या परिचयात आहेत. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी ४५ जागांसाठी थेट भरतीच्या प्रक्रियेला आव्हान देणे समजण्यासारखे आहे; मात्र सरकारची खरी अडचण जदयु आणि लोकजनशक्ती या मित्रपक्षांनीही या प्रक्रियेवर आक्षेप घेतल्यामुळे झाली असावी, असे वाटते. जदयुचे राजीवरंजन उर्फ ललनसिंह तसेच लोकजनशक्ती पक्षाचे चिराग पासवान केंद्रीय मंत्रिमंडळात आहेत. त्यामुळे या दोन पक्षांच्या नाराजीची दखल घेत मोदी सरकारने थेट भरतीचा हा निर्णय तात्पुरता स्थगित केला, असे समजायला हरकत नाही. थेट भरतीचा हा निर्णय स्थगित करत मोदी सरकारने एकप्रकारे विरोधी पक्षांच्या हातातील निवडणुकीच्या काळातील अपप्रचाराचे अस्त्रही निष्प्रभ केले, असे म्हणायला हरकत नाही. हरयाणा आणि जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीची घोषणा झाली आहे. येत्या महिनाभरात महाराष्ट्र आणि झारखंडमधील विधानसभा निवडणुकीचीही घोषणा होणार आहे. पुढील वर्षीच्या सुरुवातीला दिल्ली विधानसभेची निवडणूक होणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात या मुद्यावरून विरोधक जनतेची दिशाभूल करण्याची शक्यता असल्यामुळे विरोधकांचा तो प्रयत्न हाणून पाडण्यासाठी मोदी सरकारने थेट भरतीचा निर्णय स्थगित केला, असे दिसते. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी आरक्षण आणि संविधान बदल या मुद्यावरून अपप्रचाराची राळ उडवली होती. त्याचा काही प्रमाणात भाजपाला फटका बसला, हे नाकारता येणार नाही. 'दुधाने तोंड भाजले की पिणारा ताकही फुंकून पीत असतो.' मोदी सरकारची स्थिती या मुद्यावर तशी झाली आहे.

आरक्षण हटवण्याचा तसेच संविधान बदलण्याचा विचार भाजपा आणि मोदी सरकार स्वप्नातही करू शकत नाही. घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर काँग्रेसने ते जिवंत असताना तसेच त्यांच्या मृत्यूनंतरही जेवढा अन्याय केला, तेवढा दुसरा कोणी केला नाही. तीच काँग्रेस आज आरक्षण आणि संविधानाच्या मुद्यावर भाजपाला आणि मोदी सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न करत आहे. दलित, आदिवासी आणि ओबीसी वर्गाच्या कल्याणासाठी मोदी सरकारने आपल्या १० वर्षांच्या कार्यकाळात जेवढ्या कल्याणकारी योजना राबवल्या, त्याच्या एकदशांशही काँग्रेसला आपल्या ६० वर्षांच्या शासन काळात राबवता आल्या नाहीत. आज आपला विजय आणि मोदी सरकारचा पराभव झाला, असे काँग्रेसला वाटप असले, तरी तो त्यांचा भ्रम आहे. याचा प्रत्यय त्यांना लवकरच आल्याशिवाय राहणार नाही.

९८८१७१७८१७

### रवींद्रनगरातही संताप

पश्चिम बंगालमधील कोलकाता शहरात मेडिकल कॉलेजमध्ये ट्रेनी महिला डॉक्टरवर झालेल्या बलात्कार व निर्घृण हत्या प्रकरणाने संपूर्ण देशातील वातावरण ढवळून निघाले. असे निर्घृण कृत्य एकटी-दुकटी व्यक्ती करू शकत नाही. हा गँगरेपचा प्रकार असावा असे वाटते. पश्चिम बंगाल सरकारने या घटनेबाबत वेगवेगळी विधाने केली. डॉक्टर मुलीच्या आई-वडिलांना तीन तास मृतदेह दाखवला नाही. कॉलेजच्या प्राचार्यांना लगेच दुसऱ्या कॉलेजमध्ये रुजू करून घेण्यात आले. या सर्व गोष्टी हत्याऱ्याला वाचवणाऱ्या, मदत करणाऱ्या होत्या म्हणूनच संपूर्ण देशात संतापाची लाट पसरली. सरकार विरोधी जनता, देशातील सर्व डॉक्टर्स रस्त्यावर उतरले इतकी संतापजनक आणि दुर्दैवी घटना घडल्यावर निषेध तर होणारच. सर्व स्तरांवरून या घटनेचा निषेध होत आहे. यात नागपुरातील रवींद्रनगर मागे कसे राहील. या नगरातील लोक तर देशात कुठलीही आनंदाची अथवा दुःखाची घटना घडली तरी त्यावर प्रतिक्रिया देतातच तसेच एक सामाजिक दायित्व निभावणारी व एक जागृत नागरिकांची वसाहत म्हणून रवींद्रनगरची ओळख आहे. या वसाहतीतील नागरिकांनी कॅण्डल मार्च काढून घटनेचा निषेध केला. या मार्चमध्ये आठ डॉक्टर्स, बाकी सर्व आबालवृद्ध असे जवळपास १२५ नागरिक होते. अतिशय शांतपणे कॅण्डल मार्च काढून व शेवटी शान्तिमंत्र म्हणून श्रद्धांजली वाहण्यात आली.


**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

●● ●●

### ठोस उपाय आवश्यक

पश्चिम बंगालमधील कोलकात्यात अतिशय घृणास्पद आणि क्रूर घटना घडली. या घटनेची दाहकता अद्याप शमलेली नाही तोच बदलापुरात दोन चिमुकल्यांवर लैंगिक अत्याचार झाल्याची चिड आणणारी घृणास्पद घटना घडली. मुलींची सुरक्षा हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याकरिता ठोस उपाय आवश्यक आहे. आंध्रमध्ये (तेलंगणा) बऱ्याच वर्षांपासून एक नियम लागू केला आहे. मुलींच्या शाळेत फक्त महिला शिक्षिका, महिला चपराशी आणि सफाई कामगार महिलाच राहतील. पूर्वीच्या पुरुष शिक्षकांच्या बदल्या करून महिला शिक्षिका नियुक्त केल्या. चपराशीसुद्धा महिला नियुक्त केल्या. सफाई कामगारही महिलाच होत्या. इथे लंडनला मुलामुलींना, विद्यार्थ्यांना शाळेतून घरी नेणाऱ्याचे ओळखपत्र असावे लागते. त्यांची नावे आधीच नोंदवलेली असतील तरच त्या व्यक्तीबरोबर मुलामुलींना पाठवतील. अन्यथा कुणाही येऱ्यागबाळ्याबरोबर मुलांना पाठवणार नाही. शाळेतील मुलामुलींची जबाबदारी ही सर्वस्वी मुख्याध्यापक, अध्यापकांची असते. आई-वडील आपल्या मुलांना मुख्याध्यापक, शिक्षकांच्या जबाबदारीवर शाळेत पाठवतात. त्यामुळे मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी मुलामुलींच्या सुरक्षेकडे लक्ष देणे आवश्यक आहे. मुख्य म्हणजे मुलींच्या शाळेत मुख्याध्यापक, शिक्षक, चपराशी सफाई कामगार हे पुरुष नोकरदार नकोच. मुलींच्या शाळेत मुख्याध्यापिका, शिक्षिका महिला, चपराशी, सफाई कामगार महिलाच असाव्यात, असा सरकारने नियम करावा. मुलींची सुरक्षा फार मोठी महत्त्वाची जबाबदारी असून ती प्रत्येकाने पार पाडणे आवश्यक आहे.

## वाचक पत्रे



**मीना खोंड**/७७९९५६४२१२

●● ●●

### अजून किती निर्भया?

२०१२ मध्ये त्यांनी तिच्यावर फक्त बलात्कारच केला नाही तर तिच्या आतड्या काढल्या. हे दिल्लीत होते आणि आम्ही तिचे नाव 'निर्भया' ठेवले. २०१७ मध्ये त्यांनी तिच्यावर फक्त बलात्कारच केला नाही तर तिला झाडावर लटकवले. हे उन्नावमध्ये होते आणि आम्ही नाव 'निर्भया-२' नाव ठेवले. २०१९ मध्ये त्यांनी तिच्यावर फक्त बलात्कारच केला नाही तर तिला जिवंत जाळले. हे हैदराबादमध्ये होते आणि आम्ही तिचे नाव 'निर्भया-३' ठेवले. २०१९ पर्यंत आपण मेणबत्त्या जाळणे, सोशल मीडियावर टिप्पणी करणे आणि आठवडाभरात विसरून जाणे एवढेच करत आहोत. दिवस निघून जातात आणि आमच्याकडे निर्भया तयार होतात. २०२४ मध्ये त्यांनी एका निवासी डॉक्टरवर क्रूरपणे बलात्कार करून हत्या केली. आम्ही चेंज म्हणून 'अभया' नाव ठेवले. बदलापूरमध्ये दोन चिमुकल्याचे लैंगिक शोषण झाले तर पोलिस प्रशासन ढिम्म राहते. लोक रस्त्यावर उतरले तर तत्परतेने पोलिस लाठीचार्ज करतात. आता फक्त मेणबत्त्या नव्हे तर अशा जघन्य अपराध्यांना जाळण्याची वेळ आली आहे. बलात्कार करणाऱ्यांना फाशीच्या शिक्षेचे विधेयक मंजूर करण्याची वेळ आली आहे. जेव्हा रातोरात चलन बदलले जाऊ शकते, जेव्हा राजकारण्यांचे पगार वाढवण्यासाठी विशेष अधिवेशन बोलावले जाऊ शकते, जेव्हा विश्वासदर्शक ठरावासाठी संसद रात्रभर उघडी राहू शकते तेव्हा बलात्काराविरुद्ध कडक कायदा करायला का विलंब होतोय, असा प्रश्न पडला आहे.

**रवी वाघमारे**/नागपूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त

### पैशाच्या कारणावरून तरूणाचा विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**
पैशाच्या कारणावरून तरूणाने विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला.नरसिंग श्रीनिवास सामल (वय ३२, रा. आशा नगर, एमआयडीसी, सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव असून सामल यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. सामल यांनी बुधवारी दुपारी राहत्या घरा बाहेर पैशाच्या व्यवहारातून अंगणात सडा मारण्याचे पिवळे कलर पाण्यात मिसळून पिल्याने त्यास त्रास होऊ लागल्यावर उपचारास भाऊ संतोष सामल यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### महिलेला जातीवाचक शिवीगाळ करून धमकी

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**
महिलेला जातीवाचक शिवीगाळ विनयभंग करून धमकी देणाऱ्या चौघांविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन शिवा जाहिरे, त्याचे मित्र परवेज पठाण, बशीर शेख, मौसीन यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १८ ऑगस्ट रोजी सायंकाळी यातील पिडीता ही घरी असताना शिवा जाहिरे व त्याचे साथीदार हे तिच्या घरासमोर आले. त्यांनी पिडीतेला तु पोलिसांत आमचे विरुध्द तक्रार देते का असे बोलत जातीवाचक शिवीगाळ करून ठार मारण्याची धमकी दिली. तसेच पिडीतेचे पती यांना गच्ची धरून मारहाण करून पिडीतेच्या अंगाशी लगट करून विनयभंग केला. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस आयुक्त अशोक तोरडमल पुढील तपास करीत आहेत.

# आपत्ती व्यवस्थापनात प्रत्येकाचा सहभाग महत्त्वाचा

### जागतिक मानवतावादी दिनानिमित्त आयोजित परिसंवादातील सूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**
आपत्ती नैसर्गिक असो की मानवनिर्मित त्यावेळी प्रत्येक जन प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या बाधित होतो. आपत्तीनंतर होणारी मानवाची, प्राण्याची, पक्षाची, निसर्गाची हानी टाळण्यासाठी आपत्तीचे व्यवस्थापन व त्यात शासन, प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि प्रत्येक नागरिकांने आपली भूमिका महत्त्वाची म ानली पाहिजे असा सूर जागतिक मानवतावादी (ह्युमॅनिटेरियन डे) दिनानिमित्त फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूर आणि इंडियन रेड क्रॉस सोसायटी शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित परिसंवादात निघाला.

प्रारंभी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून परिसंवादाचे उद्घाटन झाले. यावेळी



सहाय्यक जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी अर्चना बिसोई, इंडियन रेडक्रॉस सोसायटी शाखा सोलापूरचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक डॉ. श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, सोलापूर महानगरपालिका अग्निशमन विभाग अधिकारी अच्युत दुधाळ, माजी अध्यक्षा डॉ. नभा काकडे, सदस्या डॉ. विजया महाजन, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड उपस्थित होते.

यावेळी शक्तीसागर ढोले यांनी आपत्ती व्यवस्थापनात स्वयंसेवी संस्था व प्राधिकरणाचे कार्य व सहकार्य, अर्चना बिसोई यांनी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची रचना व कार्य, डॉ. राजीव प्रधान यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा व अंमलबजावणीची गरज, अच्युत दुधाळ यांनी आग नियंत्रणात आपली भूमिका व मानसिकता, सुगतरत्न गायकवाड यांनी गाव पातळीवरील आपत्ती व्यवस्थापन समिती स्थापना व कार्य आणि संघटन, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी यांनी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाचे आपत्ती व्यवस्थापनातील मिस्प मधील सेवा कार्य तर अमरजा थिटे यांनी आपत्ती व्यवस्थापनात प्रथमोपचार व सी. पी. आर आदी विषयांवर मार्गदर्शन केले. जागतिक मानवतावादी (ह्युमॅनिटेरियन डे) दिनानिमित्त आयोजित परिसंवादात पंढरपूर, माळशिरस, मंगळवेढा, मोहोळ, दक्षिण सोलापूर तालुक्यातील गाव पातळीवरील आपत्ती व्यवस्थापन समितीचे सदस्य व सोलापूर शहरातील अग्निशमन विभागाचे आणि इंडियन रेड क्रॉस सोसायटी सोलापूर शाखेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी प्रा. डॉ. एन.बी.तेली यांनी स्वागत केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. नभा काकडे यांनी केले. सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. डॉ. विजया महाजन यांनी मानले.


## मध्य रेल्वे

### सप्टेंबर-२०२४ च्या महिन्यासाठी ई-ऑक्शन कार्यक्रम

भारताच्या राष्ट्रपतींसाठी आणि त्यांच्या वतीने मुख्य मुख्य साहित्य व्यवस्थापक, **सप्टेंबर**-2024 या महिन्यात खालीलप्रमाणे भंगार विक्रीसाठी ई-लिलाव आयोजित करतील.
सुचना:- भविष्यात वृत्तपत्रात ई-लिलाव कार्यक्रमाचे प्रकाशन बंद केले जाईल आणि खरेदीदारांनी मध्य रेल्वे IREPS वेबसाईटचा पत्ता - **www.ireps.gov.in** फक्त लिंक करावा.

| लिलाव आयोजित करणारे अधिकारी | लिलाव तारीख व दिवस | | | संपर्क क्र. |
|---|---|---|---|---|
| एसआर. डीएमएम/एनजीपी | ०३/०९/२०२४ मंगळवार | ११/०९/२०२४ बुधवार | २३/०९/२०२४ सोमवार | ७२१९६१२७५० |
| एसआर. डीएमएम/बीएसएल एमएमआर डेपो सह. | ०४/०९/२०२४ बुधवार | १२/०९/२०२४ गुरुवार | २४/०९/२०२४ मंगळवार | ७२१९६११७५१ |
| एसआर. डीएमएम/पीए | ०५/०९/२०२४ गुरुवार | १७/०९/२०२४ मंगळवार | २५/०९/२०२४ बुधवार | ७२१९६१३७५० |
| एसआर. डीएमएम/बीबी | ०९/०९/२०२४ सोमवार | १८/०९/२०२४ बुधवार | २६/०९/२०२४ गुरुवार | ८८२८११९७५० |
| एसआर. डीएमएम/एसयूआर | १०/०९/२०२४ मंगळवार | १९/०९/२०२४ गुरुवार | २७/०९/२०२४ शुक्रवार | ७२१९६१४७५० |
| डीवाय. सीएमएम(टी.आर.)एचक्यू एसएमएम(जी)सीआरडीकरिता | ०३/०९/२०२४ मंगळवार | ११/०९/२०२४ बुधवार | २३/०९/२०२४ सोमवार | ८८२८११०७६१ |
| डीवाय.सीएमएम(एम)पीआर | ०५/०९/२०२४ गुरुवार | १७/०९/२०२४ मंगळवार | २५/०९/२०२४ बुधवार | ८८२८११९७५५ |
| डीवाय.सीएमएम(सीडब्ल्यूई) एमटीएन | ०४/०९/२०२४ बुधवार | १२/०९/२०२४ गुरुवार | २४/०९/२०२४ मंगळवार | ८८२८११९७७० |
| डीवाय.सीएमएम(टी.आर.)एचक्यू एएमएम/ एचबीएचआर करिता | ०३/०९/२०२४ मंगळवार | ११/०९/२०२४ बुधवार | २३/०९/२०२४ सोमवार | ८८२८११०७६१ |
| डीवाय.सीएमएम (एसीएल) बीएसएल | ०९/०९/२०२४ सोमवार | १८/०९/२०२४ बुधवार | २६/०९/२०२४ गुरुवार | ७२१९६११७५० |

**सुचना:-** सप्लिमेंटरी लिलाव मूळ तारखेच्या वेळेपासून पुढील कामकाजाच्या दिवशी घेण्यात येईल.
आवश्यक असल्यास पात्र लॉट. रेल्वे प्रशासनाला त्याच्या वरील कोणतेही पुरवणी कार्य रद्द करण्याचा अधिकार आहे.
स्वतःचा विवेक.
**टीप:** A) ई-लिलावामधून कोणतीही लॉट काढण्याचा अधिकार रेल्वेकडे आहे. कोणत्याही लिलावाचा अधिकारही रेल्वेने राखून ठेवला आहे त्यानंतरच्या कोणत्याही लिलावात कोणत्याही योग्य पद्धतीने कोणत्याही डेपो/विभागांची बरीच. श्री कोणत्याही न विकल्या गेलेल्या बरेच मध्य रेल्वेच्या इतर डेपो/विभागाच्या पुढील लिलावात डेपो/विभाग विकला जाऊ शकतो.
b) प्रति सरकार धोरण, जेथे भंगार सामग्रीच्या पुनर्वापरामध्ये पर्यावरण आणि प्रदूषणाच्या समस्यांचा समावेश होतो, अशा अनेक गोष्टी केंद्रीय प्रदूषण नियंत्रणाद्वारे जारी केलेले वैध परवाने असलेल्या अधिकृत बोलीदारांनाच विकले जाईल मंडळ(CPCB)/राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ(SPCB).
c) ई-उक्शन कॅटलॉग वेबसाइटवर उपलब्ध असेल - **www.irepsgov.in**
d) ई-उक्शन, डिजिटल स्वाक्षरी, नोंदणी प्रक्रिया आणि यांबाबत कोणतीही मदत आवश्यक असल्यास
सहभाग इ., कृपया वरीलप्रमाणे संबंधित uction संचालक अधिकाऱ्यांशी संपर्क साधा किंवा **Dy.CMM/Sales/HQ,**
**मोबाईल क्रमांक 8828110761**, ईमेल पत्ता- **dycmm.s.cstm@gmail.com** किंवा **dycmmscr.railnet.gov.in**

**क्रमांक S.120.T.लिलाव कार्यक्रम./2024-25 दि.13/08/2024** मुख्य मुख्य साहित्य व्यवस्थापक साठी 342

**अनाधिकृत रुप से रेल लाइन को पार करना दंडनीय उपराध है**


# बांधकामात सापडलेल्या अंड्यातून डब्ल्यूसीएस सदस्यांनी कृत्रिमरीत्या दिला सरड्यांच्या पिल्लांना जन्म

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट -**
बांधकामात सापडलेल्या अंड्यातून डब्ल्यूसीएस सदस्यांनी कृत्रिमरीत्या सरड्यांच्या पिल्लांना जन्म दिला.

१५ ऑगस्ट २०२४ गुरुवारी दुपारी १२:३० वाजता उत्तर सोलापूर तालुक्यातील खेड येथे बाबाराजे भोसले यांचा भाचा हृषीकेश सरवदे यांच्या घराचे बांधकाम चालू होते. बांधकामासाठी आणलेल्या वाळूमध्ये येथील कामगारांना काही अंडी दिसून आली. या कामगारांनी ती सापडलेली अंडी भीतीपोटी घरामागे फेकून दिली, अशी माहिती भोसले यांनी डब्ल्यूसीएस सुरेश क्षीरसागर यांना दिली. काही वेळातच क्षीरसागर



व विकी धाकपाडे घटनास्थळी पोहोचले. फेकलेली ती अंडी नष्ट होऊ नयेत यासाठी ती अंडी ताब्यात घेतली आणि त्यातून कृत्रिमरित्या पिल्लांना जन्म द्यायचं ठरविलं. याआधी घडलेल्या अशा २-३ घटनांचा अभ्यास करून क्षिरसागर यांनी ती अंडी एका प्लास्टिक भरणीत काही प्रम ाणात वाळू, विटांचे तुकडे, काही फरशीचे तुकडे, पालापाचोळा गोळा करून भरणीम ध्ये उबविण्यासाठी सुरक्षित रित्या ठेवून दिली. भरणीत ठेवलेल्या अंड्यांम धून २० ऑगस्ट रोजी एक एक करून अशी ६ सरड्याची पिल्लं बाहेर आली. एकूण मिळालेल्या ११ अंड्यातून ६ सरड्याची पिल्लं बाहेर आल्यावर त्या पिल्लांना २१ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ज्या ठिकाणी अंडी आढळली होती त्याच अधिवासात सुखरूपपणे सोडून देण्यात आले. उर्वरित ५ अंड्यांतून राहीलेली पिल्ले बाहेर आल्यानंतर त्यांनाही निसर्गात सोडून देण्यात येणार आहे. या बचाव कार्यात डब्ल्यूसीएसचे अध्यक्ष अजित चौहान, संतोष धाकपाडे आणि शिवानंद हिरेमठ मार्गदर्शन लाभले.


## अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट

फोन नं. ०२१८१-२२०२५३/२२०२४३ फॅक्स नं. ०२१८१-२२०२५३
टोल फ्री क्र. १८०० २३३२ २३०
ई-मेल: comcakkalkot123@gmail.com

जा.क्र. २०२४/अ.न.प./आरोग्य१०/संकलन-१/कावि/४५९ आरआर
दिनांक- २१/०८/२०२४

### जाहीर सूचना

### पी.ओ.पी. मूर्तीवरील बंदी आदेशाबाबत

मे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी मूर्ती विसर्जनाबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. अक्कलकोट शहरातील सर्व मूर्ती बनविणाऱ्या व्यावसायिकांना कळविण्यात येते की, मे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, दिल्ली यांनी दि.१२/५/२०२० रोजी प्रकाशित केलेल्या पी. ओ.पी. मूर्तीबाबतच्या नव्या मार्गदर्शक तत्त्वानुसार पी. ओ.पी. मूर्ती उत्पादनावर बंदी घालण्यात आलेली आहे.

सर्व स्थानिक स्वराज्य संस्थावर सदर मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करणे बंधनकारक असल्याने अक्कलकोट नगरपालिकेमार्फत अक्कलकोट शहरातील मूर्ती उत्पादक कारागीर कामगार व इतर सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, यापुढे पी.ओ.पी.च्या मूर्ती उत्पादनावर बंदी असल्याने उत्पादकांनी पी.ओ. पी.ची मूर्ती उत्पादन करू नये अन्यथा मे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे मार्गदर्शक तत्त्वानुसार कारवाई करण्यात येईल.

सदर मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी दि. ०१/०१/२०२१ पासून बंधनकारक केलेली आहे. सदर मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी त्वरित करणे तसेच मूर्ती उत्पादक, कारागीर, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ व इतर सर्व संबंधितांमध्ये तसेच विसर्जन हौदामध्ये घरगुती श्री गणेशमूर्ती विसर्जन याबाबत जागरुकता निर्माण करणेसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केलेल्या आहेत.

सही/-
रमाकांत डोके
मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगरपरिषद, अक्कलकोट



## महाळुंग-श्रीपूर नगरपंचायत, महाळुंग श्रीपूर

जा.क्र ६४/२०२४ दिनांक २१/०८/२०२४

### निविदा

या जाहीर निविदा सुचनेद्वारे सर्व पुरवठादार यांना कळविण्यात येते की, महाळुंग नगरपंचायतीच्या विविध विभागाकरीता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता निविदा मागविण्यात येत आहेत. पुढीलप्रमाणे सविस्तर बाबनिहाय माहिती व निविदा नगरपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत दि. २२/०८/२०२४ ते दि. ३०/०८/२०२४ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील. तपशीलाप्रमाणे बयाणा रक्कम भरलेल्या निविदा बंद लिफाफा पध्दतीत नगरपंचायत कार्यालयात दि. २२/०८/२०२४ ते दि. ३०/०८/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यात स्वीकारल्या जातील मुदतीनंतर आलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत व एक व कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार नगरपंचायतीकडून राखून ठेवण्यात आलेला आहे.

| अ.नं. | तपशील | बयाणा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| | **वार्षिक निविदा** | | |
| १ | महाळूंग श्रीपूर नगरपंचायतीच्या विविध विकास कामासाठी JCB पुरवठा करणे. | २,०००/- | १,०००/- |
| २ | नगरपंचायतीसाठी विविध ठिकाणी सिमेंट पाईप पुरवठा करणे | २,०००/- | १,०००/- |
| ३ | नगपपंचायत कार्यालयासाठी Inveter व Battary पुरवठा करणे | २,०००/- | १,०००/- |
| ४ | विद्युत विभागातील बंद असलेले 100 watt, 50 watt लॅम्प दुरुस्त करणे | २,०००/- | १,०००/- |
| ५ | पाणीपुरवठा विभागासाठी लागणारे साहित्य पुरवठा करणे. | २,०००/- | १,०००/- |
| ६ | पाणीपुरवठा विभागासाठी 1 HP, 45 HP, पर्यंत मोटार दुरुस्ती करणे. | २,०००/- | १,०००/- |
| | **वार्षिक फेर निविदा** | | |
| १ | विद्युत विभागसाठी लागणारे साहित्य पुरवठा करणे | २,०००/- | १,०००/- |
| २ | डिजीटल फ्लेक्स बोर्ड, पोस्टर, बॅनर, प्रिंटींग चिटकवणे, लावणे इ. पुरवठा करणे | २,०००/- | १,०००/- |
| ३ | न.प. विविध कार्यक्रमासाठी मंडप, स्टेज, स्पीकर, खुर्च्या इ. पुरवठा करणे | २,०००/- | १,०००/- |
| ४ | सांस्कृतिक कार्यक्रमासाठी हार व पुष्पगुच्छ व इतर लागणारे साहित्य पुरवठा करणे. | २,०००/- | १,०००/- |
| ५ | संगणक विभागाकरिता सर्व साहित्य पुरवठा करणे व दुरुस्ती करणे | २,०००/- | १,०००/- |
| ६ | विविध कार्यक्रमासाठी चहापान अल्पोपहार पुरवणे. | २,०००/- | १,०००/- |
| ७ | न.पं. कार्यालयासाठी दप्तर छपाई करणे. | २,०००/- | १,०००/- |

निविदा कालावधी करार केलेपासून एक वर्ष राहील, निविदेतील अटी व शर्तीत कोणताही बदल करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांना राहील.

**टीप :- अ)** लिफाफा क्र.१ मध्ये पुढील कागदपत्रे जोडावीत. **१)** बयाणा रक्कम भरलेली पावती, **२)** तांत्रिक व आर्थिक क्षमता सिध्द करणारी कागदपत्रे. **३)** अनुभव पात्रता सिध्द करणारी कागदपत्रे, **४)** निविदाधारकाच्यावतीने कोणास प्राधिकृत केले असल्यास त्याबाबतचे कुलमखत्यार पत्र किंवा अधिकर्ता अधिकृत असलेचा पुरावा, **५)** संविधेमध्ये पदाधिकाऱ्यांचा सहभाग नसलेचे प्रतिज्ञापत्र. **६)** पॅनकार्डची साक्षांकीत झेरॉक्स प्रत्र, **७)** लिफाफा क्र.२ मध्ये अक्षरी व अंकात नमूद केलेले दर व योग्य पध्दतीने निविदाधारकाने नमुद केलेप्रमाणे साक्षांकीत केलेल्या मुळ प्रतितील निविदा दर पत्रक द्यावे.

शिक्का

सही/-
मुख्याधिकारी
महाळुंग श्रीपूर, नगरपंचायत


## निधन वार्ता

### राजेश कोंडा



**सोलापूर, दि.२१ ऑगस्ट-**
हैदराबाद रोड विडी घरकुल येथील रहिवासी राजेश गौरीशंकर कोंडा ( वय ३१) यांचे बुधवार, दि. २१ ऑगस्ट रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पश्चात आई-वडील, एक बहिण असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते व मार्कंडेय सोशल फाउंडेशनचे संस्थापक गौरीशंकर कोंडा यांचे ते पुत्र होत.

### नारायणराव राजेपांढरे



**सोलापर, दि. २१ ऑगस्ट-**
शिरापूर (ता. मोहोळ) येथील नारायणराव यशवंतराव राजेपांढरे (वय ९४) यांचे २१ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. प्रगतशील बागायतदार योगेश राजेपांढरे यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. योगेश राजेपांढरे त्यांचे नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार कुंभारी येथील आश्वीनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयातील नेत्रपेढी येथील वैद्यकीय पथकाने तातडीने शिरापूर येथे दाखल होवून नेत्रदानाची प्रक्रिया पार पाडली.

### हभप उध्दव मोरे



**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**
हभप उध्दव नामदेव मोरे (वय ९४) यांचे २० ऑगस्ट रोजी सकाळी निधन झाले आहे. त्यांचेवर पाणी टाकी अक्कलकोट रोड येथील स्मशानभूमी मध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या मागे दोन मुले एक मुलगी सूना नातवंडे असा परिवार आहे.


### नावात बदल

माझे जुने नाव **रत्नाकर गुलाबराव सोनवणे** असे असून तरी माझे नविन नाव **रत्नाकर गुलाबराव सोनवणे** या नावाने ओळखावे. पत्ता : कविता नगर पोलीस लाईन, सोलापूर
**ऑफि. नं. ५६३८**
**दि.२०/०८/२०२४**



### जाहीर समन्स

रे. मु. नं.५५५/२०२३

### सोलापूर येथील मे.६ वे सिव्हील जज्ज ज्युनीअर डिव्हीजन सो‌ा यांचे कोर्टात (मे.वी.एम. रेडकर साहेब)

**श्री. अजय शिवराम पोतदार, वगैरे-२** - वादी
विरुध्द
**श्री. पुंडलिक भगवान पोतदार, वगैरे-५** - प्रतिवादी

प्रति,
**प्रतिवादी नं.२ महेश मोहन पोतदार**
**वय- २२ वर्षे, धंदा- शेती,**
**रा. काळे प्लॉट, उमरगा, जि. उस्मानाबाद**
**सध्या रा. मु.पो. आहेरवाडी,**
**ता.दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर**

ज्याअर्थी, यातील वादीनी प्रतिवादीविरुध्द दावा मिळकतीचे वाटप होवून पृथकः कब्जा मिळणेसाठी व खरेदीखत वादीचे हिश्श्यावर बंधनकारक नसल्याचे जाहीर होवून मिळणेसाठी तसेच निरंतर ताकीदीकरीता प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. या दाव्याचेकामी आपणांस वेळोवेळी दाव्यात दिलेल्या पत्त्यावर समन्स/नोटीस काढले असता, आपण दाव्यातील जागा सोडून गेला आहात, असा बेलीफ रिपोर्ट आला आहे. दावा दाखल केला त्यावेळी आपण दाव्यात दिलेल्या पत्त्यावरच रहात होता. प्रतिवादी नं.२ ला बजावणी न झाल्याने मे. कोर्टानी वर्तमानपत्रात जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे समन्स बजावणीस मंजुरी दिली आहे. त्याअर्थी, उपरोक्त दाव्याचे कामी, आपणास आपले कांही लेखी म्हणणे,

हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत किंवा नेमलेली तारीख २१/०९/२०२४ रोजी आपले म्हणणे/कैफियत दाखल करावे अन्यथा मुदतीत कोणाचे कांही हरकत व म्हणणे न आल्यास मे. कोर्ट पुढील आदेश करतील. ही जाहीर नोटीस न्यायालयाच्या सही शिक्यानिशी दि. २१/०८/२०२४ रोजी प्रसिध्द केली.

सही/- क. लिपीक — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायाधीश व स्तर, सोलापूर



![Classifieds]

### वृद्धाश्रमविषयक

**सोलापुरमध्ये पूर्व भागात वृद्धांना हक्काची जागा, आपुलकी वृद्धाश्रमात प्रवेश देणे आहे. ८६२४०८९१०५ /९४२१८९२०३५**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.



### जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २५९/२०२४**

**१) कादर महंमद तांबोळी,** रा. सोमाणी काट्याजवळ, सोलापूर रोड, बार्शी, ता. बार्शी (असल्यास, तर्फे वकील) — **अर्जदार**
**- विरुद्ध -**
**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** नगरपालिका, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. सोमाणी काट्याजवळ, सोलापूर रोड, बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २७ मे १९६४ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक २७ मे १९६४ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.
आज ता. २५ जून २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का) सही/- **कार्यकारी दंडाधिकारी,** बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



### जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २३९/२०२४**

**१) रविंद्र गोविंद बंडेवार,** रा. सुभाषनगर, बार्शी, ता. बार्शी, सोलापूर (असल्यास, तर्फे वकील रोहित अनिल जोशी) — **अर्जदार**
**- विरुद्ध -**
**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** नगरपालिका, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची आई, रा. सुभाषनगर, बार्शी, ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०४ जुलै २०१५ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची आई यांचा दिनांक ०४ जुलै २०१५ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.
आज ता. २५ जून २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का) सही/- **कार्यकारी दंडाधिकारी,** बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



### जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २००/२०२४**

**१) सागर शहादेव पवार,** रा. संभाजीनगर, नवीन रेल्वे स्टेशन, बार्शी, ता. बार्शी, सोलापूर (असल्यास, तर्फे वकील रोहित अनिल जोशी) — **अर्जदार**
**- विरुद्ध -**
**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** नगरपालिका, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार यांची मुलगी, रा. संभाजीनगर, नवीन रेल्वे स्टेशन, बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०३ डिसेंबर २०२२ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांची मुलगी यांचा दिनांक ०३ डिसेंबर २०२२ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.
आज ता. २५ जून २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का) सही/- **कार्यकारी दंडाधिकारी,** बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### डायमंड लीग लॉसनेमध्ये नीरज आज भाग घेणार

**लॉसने** : पॅरिस ऑलिम्पिक रौप्यपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा गुरुवारी लॉसने डायमंड लीग स्पर्धेत भाग घेणार आहे. गत आठवड्यात त्याने आपल्या सहभागाबाबत पुष्टी केली होती.



पॅरिसमध्ये हंगामातील सर्वोत्तम ८९.४५ मीटर करणाऱ्या नीरजने कंबरेच्या दुखापतीमुळे या हंगामात दोहा येथे केवळ एका डायमंड लीग स्पर्धेत भाग घेतला होता, तरीही तो जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर आहे. ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता अँडरसन पीटर्स व टोकियो ऑलिम्पिकचे रौप्यपदक विजेता जेकब वडलेज हे सुद्धा लॉसनेमध्ये भाग घेत आहेत. पॅरिसमध्ये सुवर्णपदक जिंकणारा पाकिस्तानचा अर्शद नदीम खेळणार नाही. या स्पर्धेत नीरजसह रॉडरिक गेन्की डीन, लस्सी एटेलटालो, आर्टर फेल्फनर, अॅण्ड्रियन मार्डेरे, एडिस मातुसेविसियस, अॅण्डरसन पीटर्स, जेकब वडलेच, ज्युलियन वेबर व ज्युलियस येगो सहभागी होणार आहेत.

### अल्काराझ, जोकोविचसमोर मेदवेदेव, इ्वेरेव्हचे आव्हान

**न्यू यॉर्क** : आगामी अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेत डॅनियल मेदवेदेव आणि अलेक्झांडर इ्वेरेव्ह हे विजेतेपदाचे प्रबळ दावेदार असलेल्या कार्लोस अल्काराझ आणि नोवाक जोकोविच यांच्यासमोर आव्हान उभे करणार आहे. मेदवेदेव व इ्वेरेव्ह हे दोघे या दिग्गजांना पराभूत करू शकतात, तर पुरुषांच्या ग्रॅण्ड स्लॅम विजेतेपदासाठी अमेरिकेची प्रदीर्घ प्रतीक्षा संपवण्यासाठी टेलर फ्रिट्झ हासुद्धा सज्ज झालेला आहे. जागतिक क्रमवारीत पाचव्या क्रमांकावर असलेल्या मेदवेदेवला एकमेव ग्रॅण्डस्लॅम जेतेपद पटकावता आले आहे. त्याने २०२१ च्या अमेरिकन ओपनमध्ये हा मान मिळविला होता व यात त्याने अंतिम फेरीत जोकोविचला पराभूत केले होते. मेदवेदेवने या वर्षीच्या ऑस्ट्रेलियन ओपनच्या अंतिम फेरीत धडक मारली होती, परंतु त्याला जॅनिक सिन्नरकडून पराभव सहन करावा लागला होता. त्याने दुबईमध्ये व मियामी येथे उपांत्य फेरी गाठली होती, परंतु तिथेही त्याला इटलीच्या सिन्नरकडून पुन्हा पराभव पत्करावा लागला होता. इंडियन वेल्स विजेतेपदाच्या सामन्यातही त्याला अल्काराझकडून पराभव सहन करावा लागला होता.

### जपान ओपन बॅडमिंटनमध्ये सतीश कुमार पुढील फेरीत

**योकोहामा** : येथे सुरु असलेल्या बीडब्ल्यूएफ जपान ओपन बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या सतीश कुमारने उप-उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. पहिल्या फेरीच्या लढतीत २३ वर्षीय सतीश कुमार ६-१ ने आघाडीवर असताना त्याची प्रतिस्पर्धी तिसरा विश्वमानांकित डेन्मार्कचा अॅण्डर्स अॅण्टोनसेन जखमी निवृत्त झाला. त्याने अवघ्या तीन मिनिटांतच निवृत्ती पत्करली. जागतिक क्रमवारीत ४७व्या स्थानावर असलेल्या सतीशची अंतिम सोळाच्या फेरीत थायलंडच्या कांताफोन वांगचारोएनशी लढत होईल. तथापि, किरण जॉर्ज पुरुष एकेरी स्पर्धेतून फेरीतून बाहेर झाला असून त्याला जपानच्या कांता त्सुनेयामाकडून १९-२१, १४-२१ असा पराभव पत्करावा लागला .सुमित रेड्डी व एन. सिक्की रेड्डी यांची मोहीम देखील वेळेआधीच संपुष्टात आली. या भारतीय जोडीला डेन्मार्कच्या जेस्पर टॉफ्ट व अमाली मॅगेलंडकडून पहिल्या फेरीत पराभव पत्करावा लागला. महिला दुहेरीत ऋतुपर्णा पांडा व श्वेतापर्णा पांडा या जोडीला डेन्मार्कच्या ज्युली फिन-इप्सेन व माई सरो यांच्याकडून ३४ मिनिटांत ८-२१, १४-२१ असा पराभव सहन करावा लागला.

### हरमितचे सलग दुसऱ्यांदा जेतेपद पटकावण्याचे लक्ष्य

**चेन्नई** : यंदाच्या अल्टिमेट टेबल टेनिस (यूटीटी) लीग हंगामात आपल्या गोवा चॅलेंजर्स संघाला सलग दुसऱ्यांदा विजेतेपद जिंकून देण्याचे लक्ष्य स्टार खेळाडू हरमित देसाईने ठेवले आहे. अल्टिमेट टेबल टेनिस लीगमध्ये हरमीत देसाईच्या नेतृत्वाखालील गोवा चॅलेंजर्स सलग विजेतेपद पटकावून इतिहास रचण्यास उत्सुक आहे. चेन्नईतील जवाहरलाल नेहरू इनडोअर स्टेडियमवर गुरुवारी यूटीटीचा पाचवा हंगाम सुरू होणार आहे. हरमीत व कंपनीला असा पराक्रम साधावा लागेल जो या स्पर्धेच्या इतिहासात याआधी कोणत्याही संघाने केला नसेल. या वर्षी स्पर्धेत अहमदाबाद एसजी पिपर्स व जयपूर पॅट्रियट्स या दोन नवीन संघांचा समावेश करण्यात आला आहे . त्यामुळे एकूण आठ फ्रेन्चायझी आणि खेळाडूंची संख्या पूल ३६ वरून ४८ पर्यंत वाढली आहे. यात १६ स्टार आंतरराष्ट्रीय टेबल टेनिसपटूंचा समावेश आहे. गतविजेत्या गोवा चॅलेंजर्सचा सलामीचा सामना नवोदित जयपूर पॅट्रियट्सशी होणार आहे.

# जय शाह आयसीसी अध्यक्षपदासाठी पुढे

◆ **अहमदाबाद, २१ ऑगस्ट**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) विद्यमान सचिव जय शाह हे ग्रेग बार्कले यांच्यानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) अध्यक्ष म्हणून आघाडीवर आहेत.

आयसीसीच्या नियम पुस्तकानुसार, सध्याच्या १६ आयसीसी संचालकांपैकी प्रत्येकाला २७ ऑगस्टपर्यंत आयसीसी अध्यक्षपदासाठी नामांकन दाखल करावे लागेल. जर अनेक नामांकन असतील तर नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात निवडणूक घेतली जाईल आणि नवीन अध्यक्ष १ डिसेंबरपासून पदभार स्वीकारतील.

ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमधील क्रिकेट मंडळाच्या पाठिंब्याने जय शाह यांची सर्वोच्च पदावर नियुक्ती ही केवळ औपचारिकता आहे, कारण त्यांची एकमताने नियुक्ती होणे अपेक्षित आहे, असे अनेक सूत्रांनी सूचित केले आहे.



बार्कले अद्याप दोन वर्षांचा तिसरा कार्यकाळ मिळविण्यासाठी पात्र असूनही, त्यांनी तिसऱ्या कार्यकाळासाठी निवडणूक लढवणार नाही असे आयसीसीला कळवले आहे. अशा प्रकारे जय शाह यांचा जागतिक क्रिकेट प्रशासकीय मंडळात सर्वोच्च पदावर जाण्याचा मार्ग मोकळा झाला.

मात्र, आयसीसीमध्ये जाण्यापूर्वी त्यांना बीसीसीआयच्या सचिवपदाचा राजीनामा द्यावा लागणार आहे. ऑक्टोबर २०२२ मध्ये बीसीसीआय सचिव म्हणून आपला दुसरा कार्यकाळ सुरू करणारे शाह यांचा सध्याचा कार्यकाळ सप्टेंबर २०२५ मध्ये संपणार आहे.

आयसीसीने बीसीसीआयच्या घटनेशी सुसंगतपणे, अध्यक्षांच्या कार्यकाळात प्रत्येकी तीन वर्षांच्या कमाल दोन कार्यकाळामध्ये सुधारणा करण्यासाठी नियमांत बदल प्रस्तावित केले आहेत.

जर शाह यांनी पदभार स्वीकारला तर ते वयाच्या ३६ व्या वर्षी सर्वात तरुण आयसीसी अध्यक्ष असतील. ते जगमोहन दालमिया, शरद पवार, एन. श्रीनिवासन् व शशांक मनोहर यांच्यासोबत आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे अध्यक्षपद भूषवतील. सध्या ते बीसीसीआय-नियुक्त आयसीसीचे संचालक आहेत व आयसीसीच्या वित्त आणि व्यावसायिक व्यवहार उपसमितीचे अध्यक्ष सुद्धा आहेत. ते आयसीसीचे सर्वात प्रभावशाली मानले जातात. (वृत्तसंस्था)

# रौनक दहियाने जिंकले कांस्यपदक


## १७ वर्षांखालील जागतिक कुस्ती स्पर्धा

◆ **अम्मान (जॉर्डन), १९ ऑगस्ट**

भारताच्या रोनक दहियाने अम्मान, जॉर्डन येथे आयोजित १७ वर्षांखालील वयोगटाच्या जागतिक कुस्ती स्पर्धेत ११० किलो ग्रीको-रोमन गटात भारताच्या रौनक दहियाने कांस्यपदक मिळवले. रौनक हा भारताचा एकमेव भारतीय ग्रीको-रोमन कुस्तीपटू होता व त्याने १७ वर्षांखालील जागतिक कुस्ती स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला होता.

सध्या रौनकच्या वयोगटातील वजन गटात तो जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर आहे.

रौनकने या स्पर्धेत भारताला पहिले पदक जिंकून देताना तुर्कीच्या इमरुल्ला कॅपकनचे आव्हान ६-१ असे आरामात मोडून काढले. याआधी रौनकला उपांत्य फेरीत रौप्यपदक विजेत्या हंगेरीच्या झोल्टन झाकोकडून पराभव पत्करावा लागला होता. प्रकारातील सुवर्ण युक्रेनच्या इव्हान यांकोव्स्कीने जिंकले. इव्हानने तांत्रिक श्रेष्ठतेच्या जोरावर झझाको याच्यावर १३-४ असा विजय नोंदवला.



कुस्तीपटू रौनक दहिया

साईनाथ पारधीने दोन लढती जिंकल्यास भारताला ५१ किलो रिपेचेजमध्ये दुसऱ्या पदकाची संधी आहे. त्याची पहिली लढत अमेरिकेच्या डॉमिनिक मायकेल मुनारेटोशी होणार आहे आणि जर त्याने ही लढत जिंकली, तर तो कांस्यपदकाच्या प्ले-ऑफमध्ये कझाकस्तानच्या येरासिल किंवा इराणच्या अबोलफझल मेहरदाद करमीगेईशी लढेल. इतर पाच कुस्तीपटूंनी स्पर्धेच्या पहिल्या दिवशी आपापल्या गटात विजय नोंदविले.

११० किलो वजनी गटात रौनकने आर्टूर मानवेल्यानवर ८-१ असा विजय मिळवून सुरुवात केली आणि त्यानंतर डॅनियल मास्लाकोवर शानदार तांत्रिक विजय मिळवला.

रौनकशिवाय निशांत फोगट (८० किलो) हा एकमेव भारतीय होता. पात्रता फेरीत तिने अल्जेरियाच्या मोहम्मद अबादीविरुद्ध ७-१ ने विजय मिळवला पण मोल्दोव्हाच्या निचिता अपोस्टोलकडून तिला पराभव पत्करावा लागला.

बिकाश कछाप (४८ किलो) स्पर्धेबाहेर आहेत, पण अनुज (६५ किलो) आणि समर्थ गजानन (५५ किलो) हे त्यांचे भवितव्य जाणून घेण्यासाठी उपांत्य फेरीच्या निकालाची वाट पाहत आहेत. (वृत्तसंस्था)

# विनेश फोगटची ‘ब्रॅण्ड व्हॅल्यू’ वाढली



## एक करार अन् कोट्यवधींचा वर्षाव

◆ **नवी दिल्ली, २१ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कुस्तीपटू विनेश फोगाटने अंतिम फेरी गाठली, परंतु तिला अखेरच्या क्षणी पदकाला मुकावे लागले. कायदेशीर लढाईतून तिला किमान रौप्यपदक मिळेल अशी आशा होती, परंतु इथेही तिला मोठा धक्का बसला. विनेशला रिकाम्या हाताने मायदेशी परतावे लागले, परंतु तिने केलेल्या सुवर्णमय कामगिरीचे तमाम देशवासियांनी तिच्यावर कौतुकांचा वर्षाव केला. आता विनेशच्या कमाईत सुद्धा मोठी वाढ होणार असल्याचे दिसत असून तिच्या ब्रॅण्ड व्हॅल्यूमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. आता ती कोणत्याही कंपनीसोबतच्या एका करारासाठी ७५ लाख ते १ कोटी रुपये आकारते.

कोणतीही अधिकृत माहिती समोर आली नसली तरी विनेशची ब्रँड व्हॅल्यू चांगलीच वाढली आहे. इकॉनॉमिक्स टाइम्सने दिलेल्या वृत्तानुसार, विनेशला करारबद्ध करण्यासाठी जवळपास १५ ब्रॅण्ड तयार आहेत. आता तिच्या शुल्कामध्ये मोठी वाढ झाली आहे. पॅरिस ऑलिम्पिक २०२४ पूर्वी विनेश एका ब्रॅण्डकडून एका वर्षासाठी २५ लाख रुपये आकारत असे. मात्र आता हे ७५ लाख ते १ कोटी रुपयांवर पोहोचले आहे.

विनेशसह रौप्यपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा व दोन कांस्यपदक जिंकणारी नेमबाज मनू भाकर यांनीही जाहिरातीच्या माध्यमातून बक्कळ कमाई केली. (वृत्तसंस्था)

## बीसीसीआयची आयपीएलमधील कमाई ११६ टक्केने वाढली

**मुंबई** : २०२२ ते २०२३ दरम्यान भारतीय क्रिकेट नियामक मंडळाची आयपीएलमधील उत्पन्न ११६% वाढली आहे. बीसीसीआयच्या वार्षिक अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. २०२२च्या आयपीएल सीझनमधून बोर्डाने २,३६७ कोटी रुपयांचा नफा कमावला होता, जो २०२३ च्या आयपीएल आवृत्तीत ५१२० कोटी रुपये नोंदवला गेला होता. या वाढीव नफ्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे नवीन मीडिया हक्क चक्र, जे बोर्डाने २०२३ ते २०२७ या हंगामासाठी ४८,३९० कोटी रुपयांना विकले आहे. अशाप्रकारे, २०२२च्या आयपीएल हंगामात बीसीसीआयची मीडिया हक्कांची कमाई ३७८० कोटी रुपये होती.

## जर्मनीचा गोलरक्षक मॅन्युएल न्युअर निवृत्त

**बर्लिन** : जर्मनीचा स्टार गोलरक्षक मॅन्युएल न्युअरने बुधवारी आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून आपली निवृत्तीची घोषणा केली आहे. आपल्या १५ वर्षांच्या दीर्घ कारकीर्दीची सांगता करणाऱ्या न्युअरने १२४ आंतरराष्ट्रीय सामने खेळले व तो एका दशकाहून अधिक काळ प्रथम क्रमांकाचा गोलरक्षक राहिला. त्याने २०१४ मध्ये विश्वचषक जिंकला, पण त्याच्या नेतृत्वाखाली २०१८ आणि २०२२ च्या विश्वचषकात त्याच्या संघाला गट साखळी फेरीतूनच बाहेर पडावे लागले. न्युअरने समाजमाध्यमावर आपल्या निर्णयाची पुष्टी करत असे म्हटले आहे की, हा दिवस कधीतरी यायला हवा होता. आज माझी जर्मन राष्ट्रीय संघातील कारकीर्द संपत आहे. हा निर्णय माझ्यासाठी सोपा नव्हता.

# गुकेश-नेपोम्नियाची लढत बरोबरीत

## सिंकफील्ड चषक बुद्धिबळ

◆ **सेंट लुईस, २१ ऑगस्ट**

येथे सुरु असलेल्या यंदाच्या ग्रॅण्ड चेस टूरमधील अंतिम स्पर्धा-सिंकफील्ड चषक बुद्धिबळ स्पर्धेत दुसऱ्या फेरीत जागतिक विजेतेपदाचा आव्हानकर्ता भारतीय ग्रॅण्डमास्टर डी. गुकेश याने रशियाच्या इयान नेपोम्नियाचीविरुद्धची रोमहर्षक लढत बरोबरीत राखली.

विद्यमान विश्वविजेता चीनच्या डिंग लिरेननेसुद्धा नेदरलॅण्डच्या अनिश गिरीविरुद्धची लढत सहजतेने बरोबरीत राखली. लिरेनच्या लढतीप्रमाणेच गुकेशनेही नेपोम्नियाचीला बरोबरीत रोखले.





लढत बरोबरीत सुटल्यानंतर हस्तांदोलन करताना डी. गुकेश व इयान नेपोम्नियाची

पांढऱ्या सोंगट्यानिशी खेळणाऱ्या गुकेशने आक्रमक खेळ करत आपला डाव मजबूत केला, परंतु तेवढ्याच स्फूर्तीने

दोन वेळा कॅण्डिडेट स्पर्धा जिंकणाऱ्या नेपोम्नियाचीने काही सुरेख बचाव व ६० व्या चाली अखेर दोघांनीही लढत बरोबरीत राखण्यास सहमती दर्शविली.

ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदनेही फ्रान्सच्या मॅक्झिम वॅचियर-लॅग्रेव्हसोबत बरोबरी साधली. प्रज्ञानंदने इटालियन ओपनिंग पद्धतीने डावाची सुरुवात केली, परंतु त्याला वॅचियर-लॅग्रेव्हविरुद्ध विजय नोंदवण्याची कोणतीही संधी मिळाली नाही.

पहिल्या फेरीत एकमेव निर्णायक डावात फ्रान्सच्या अलिरेझा फिरोझाने अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनावर विजय नोंदवला व पहिल्या फेरीतील इतर सर्व सामने बरोबरीत राहिले.

उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्ह व अलिरेझा फिरोझा यांच्यातील सामना बरोबरीत राहिला. वेस्ली सो व कारुआना यांच्यातील सर्व अमेरिकन लढतसुद्धा अनिर्णीत राहिली.

अलिरेझा फिरोझा १.५ गुणांसह आघाडीवर आहे. आठ खेळाडू प्रत्येकी एका गुणांसह संयुक्तपणे दुसऱ्या स्थानावर आहेत. दहा खेळाडू अर्ध्या गुणांसह संयुक्तपणे तिसऱ्या स्थानावर आहेत. (वृत्तसंस्था)

# दुसऱ्या दिवसअखेर विदर्भाकडे ८० धावांची आघाडी

## महाराष्ट्राच्या पहिल्या डावात १९३ धावा, अझीम काझीचे दमदार अर्धशतक

### महाराष्ट्र विरुद्ध विदर्भ रणजी संभाव्य संघ पहिला सराव सामना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

येथील प्रसिद्ध इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर कालपासून सुरू झालेल्या महाराष्ट्र विरुद्ध विदर्भ रणजी संभाव्य खेळाडूंच्या निवडीच्या दृष्टीने महत्त्वाचा असलेल्या पहिल्या सराव सामन्यात दुसऱ्या दिवशीचा खेळ थांबला तेंव्हा विदर्भ संघाने ९ बाद १७२ (४७ षटके) करत महाराष्ट्राच्या पहिल्या डावातील १९३ धावांच्या वर ८० धावांची बढत घेतली असून उद्या पहिल्या सत्रात साम न्याचा निकाल लागण्याची शक्यता आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी महाराष्ट्राने पहिला डाव कालच्या ९७/४ पासून





पुढे सुरू केला आणि कालची नाबाद अझीम काझी - निखिल नाईक ची जोडी फोडली ती दूशंत टेकन ने निखिल (१४) ला यष्टिरक्षक कडे झेल द्यायला लावून. त्यानंतर आलेला यश क्षीरसागर (०) जास्ती काळ टिकू शकला नाही पण दुसऱ्या बाजूने अझीम ने त्याचे अर्धशतक (५२ धावा ९० चेंडू ५ चौकार) झळकावत सोलापूरच्या अर्शिन कुलकर्णी (२३ धावा) सोबत ४१ धावांची भागीदारी रचली. हे दोघे पाठोपाठ बाद झाले की लगेच रजनीश गुर्बानी (०) बाद झाला. शेवटची जोडी साठी सत्यजित बछाव (१६) आणि मुकेश चौधरी (१०) ने २० धावा जोडल्या आणि जेवणाच्या वेळी महाराष्ट्राचा पहिला डाव १९३ धावांवर थांबला. मध्यंतर नंतर विदर्भाने दुसऱ्या डावाची सुरुवात कालचा सलामीवीर सत्यम भोयर आणि अर्धशतकवीर अमन मोखाडे ने केली, परंतु पुन्हा एकदा पहिल्याच षटकात मुकेश चौधरी ने चौथ्याच चेंडूवर पहिला झटका दिला तो भोयर ला बाद करत. परंतु अमन ने मंदार महाले (१२) आणि सिद्धेश वाठ (३) सोबत एकतर्फी किल्ला लढवत धावफलक हलता ठेवत सामन्यात सलग दुसरे अर्धशतक झळकावले. तो ७५ धावा काढून अर्शिन कडून पायचीत झाला. त्यानंतर यश कदम (२९) आणि कर्णधार अक्षय वाडकर (२८) भागीदारी रचण्याचा प्रयत्न केला पण तरणजित धिल्लोन ने (३८/३ बळी) त्या दोघांसह हर्ष दुबे (०) ला देखील लागोपाठ बाद करत २ धावात ३ गडी टिपत माघारी धाडले. शेवटचे फलंदाज दर्शन नालकांडे (५), गौरव ढोबळे (०) यांनी पार्थ रेखाडे (नाबाद १२) सोबत जास्तीच्या धावांची बढत घेण्याचा प्रयत्न केला पण तेज गोलंदाज रामकृष्ण घोष ने (२१/३ बळी) दोघांना बाद केले आणि दिवसाला खेळ थांबला तेंव्हा विदर्भ ने दुसऱ्या डावात ९ बाद १७२ करत महाराष्ट्र वर ८० धावांची बढत घेतली असून तिसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात राहिलेला १ गडी लवकर बाद करून महाराष्ट्राला सामना जिंकण्याची संधी आहे. विदर्भ संघ सकाळी आणखी किती धावा जोडतो ते पाहून महाराष्ट्र संघ किती षटके खेळत सामना जिंकतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.



# शालेय बॅडमिंटन स्पर्धेत सेंट जोसेफ स्कूलला विजेतेपद

**सोलापूर,दि.२१ ऑगस्ट-**

शालेय शहर बॅडमिंटन स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलांच्या गटात सेंट जोसेफ स्कूलने विजेतेपद पटकाविले. अंतिम फेरीमध्ये त्यांनी इंडियन मॉडेल स्कूलचा २-० असा पराभव केला.

यात कर्णधार आदित्य सागर याने तीन सामने सहज जिंकले. विहान कोटारी, विराज भांगे, कार्तिक चिंचोरे, तोशन नागडा यांनी त्याला चांगली साथ दिली. त्यांना क्रीडा शिक्षक सनी भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापक फादर आनंद गायकवाड व पर्यवेक्षक पद्मा नरवटे यांनी अभिनंदन केले.

## जिल्हा ॲथलेटिक्स व निवड चाचणी स्पर्धा रविवारी

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने २३ वर्षांखालील मुले व मुलींची जिल्हा ॲथलेटिक्स व निवड चाचणी स्पर्धा रविवारी (दि.२५) नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर होईल. ०१ आक्टोंबर २००१ ते ११ नोव्हेंबर २००४ दरम्यान जन्मलेले खेळाडू यासाठी पात्र आहेत. यासाठी जन्म दाखला, इयत्ता दहावी बोर्ड प्रमाण पत्र किंवा महानगर पालिका, नगर परिषद, ग्रामपंचायत यांनी वितरीत केलेले जन्म प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाईल. इच्छुकांच्या प्रवेशिका स्पर्धेठिकाणी सकाळी ८.३० पासून स्वीकारले जातील, असे असोसिएशनचे सचिव राजू प्याटी यांनी कळविले आहे. अधिक माहितीसाठी ९३२६०५५९४० या मोबाईलवर संपर्क साधावा.

# मुलांच्या गटात पिंपळनेर, सांगवी व शेटफळच्या शाळा विजेत्या

## जिल्हास्तर शालेय टेनिक्काईट स्पर्धेस सुरवात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापर, दि. २१ ऑगस्ट-**

शालेय जिल्हा टेनिक्काईट स्पर्धेत मुलांच्या १४ वर्षांखालील गटात आर्या पब्लिक स्कूल पिंपळनेर, १७ वर्षांखालील गटात गगनगिरी विद्यालय सांगवी व १९ वर्षांखालील गटात माध्यमिक विद्यालय शेटफळने विजेतेपद पटकाविले.

जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका येथील इंडोअर स्टेडियमवर या स्पर्धेचे उदघाटन पद्मशाली शिक्षण संस्थेचे संचालक रामू यलदी यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा टेनिक्काईट असोसिएशनचे सचिव भीमराव बाळगे, खजिनदार इक्बाल शेख, तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, सुप्रिया गाढवे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक



राज्य क्रीडा मार्गदर्शक गणेश पवार यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पंच म्हणून धनंजय धेंडे, मनोज बाळगे, शुभम पूरवत, प्रचिता जोगदांडे काम पाहत आहेत.

**मुलांचे अंतिम निकाल (प्रथम तीन)** : १४ वर्षाखालील : आर्या पब्लिक स्कूल (पिंपळनेर), आर्या पब्लिक स्कूल (माढा), गगनगिरी विद्यालय (सांगवी). १७ वर्षाखालील : गगनगिरी विद्यालय (सांगवी), आर्या पब्लिक स्कूल (पिंपळनेर), आदर्श पब्लिक स्कूल (कुर्डूवाडी). १९ वर्षाखालील : माध्यमिक विद्यालय (शेटफळ), अमोल पब्लिक स्कूल (करकंब), डॉक्टर फाळके विद्यालय (पांढरेवाडी).

## संक्षिप्त वृत्त



### मार्कंडेय रथोत्सवात पंधरा हजार भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

भगवान महर्षी श्री मार्कंडेय महामुनींच्या शताब्दी रथोत्सवानिमित्त धर्मरक्षक अंबादास आण्णा गोरंटला मित्र परिवाराच्या वतीने भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भर पावसातही या महाप्रसादाचा पंधरा हजार भाविकांनी लाभ घेतल्याचे अंबादास गोरंटला यांनी सांगितले. सोलापूर शहर पोलीस मुख्यालयासमोरील शिवराम चौक येथे या महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. या कार्यक्रमाला शिवस्मारक मंडळाचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री संजयकुमार जमादार, ज्ञानेश्वर म्याकल, जगदीश कर्रे, नगरसेवक शिवानंद पाटील, नगरसेवक देवेंद्र कोठे, श्रीकांत घाडगे, बाळासाहेब गायकवाड, राजकुमार पाटील, वि गोणे, आनंद मुसळे, गोरक्षक विजय यादव, बजरंग दल जिल्हा सहसंयोजक नागेश बंडी, रविकुमार बोल्ली, महाराष्ट्र पद्मशाली युवक संघटनेचे दत्तात्रय बडगू, भाजपचे सदानंद गुंडेटी, प्रकाश आसादे, हणमंतू प्रवीण कोंडा, अमोल इंदापूरे यांच्याच्यासह अनेक मान्यवरांनी भेट दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेखर राचर्ला, रवि भरत, विजय बडगू, विठ्ठल शेरला, नितिन मार्गम, निखिल इट्टम, राहुल कैरमकोंडा, सागर आडम, उदय रापोल, विजय गोणे, बालाजी कैरमकोंडा, अजय गोणे यांच्यासहअनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे निवेदन श्रीधर आरगोंडा यांनी केले.



### 'ओ गानेवाली' कार्यक्रमाने रसिक मंत्रमुग्ध

**सोलापूर, दि.२१ ऑगस्ट-**

येथील प्रा. श्रीराम पुजारी यांच्या जन्मशताब्दी उत्सवाच्या उद्घाटनाच्या निमिताने 'ओ गानेवाली' हा सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या डॉ वा. का. किर्लोस्कर सभागृहात संपन्न झाला. अवंती पटेल, ऋतुजा लाड या गायिकांना सारंगीवर संदीप मिश्रा, तबल्यावर अक्षय जाधव व संवादिनीवर नुसरत अपूर्व यांनी साथ दिली. गझल, दादरा, बंदिशी या शास्त्रीय व उपशास्त्रीय गायनातून बेगम अख्तर, शोभा गुर्टू सारख्या गायिकांच्या कलाकृती ऐकवत रसिकांशी मराठी, हिंदी व इंग्लिशमधून संवाद साधत, दुर्मिळ माहितीचा खजिनाच सादर केला. रसिकांना मंत्रमुग्ध करणारा हा कार्यक्रम दोन तास चालला. प्रारंभी वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी प्रास्ताविक केले. करुन प्रा. सुलभा पिशवीकर यांनी कलाकारांचा परिचय करुन सूत्रसंचालन केले. याप्रसंगी प्रा. पुष्पा आगरकर उपाध्यक्ष डॉ श्रीकांत कामतकर प्रमुख कार्यवाह डॉ. नभा काकडे, कार्यवाह दत्ता गायकवाड, अॅड धनंजय माने, पं, आनंद बदामीकर, भगवान रामपुरे, प्रशांत देशपांडे, डॉ. संध्या विजय रघोजी, मंजुषा गाडगीळ, डॉ. केदार व गौरी कहाते, डॉ. सुहास पुजारी, मोहन सोहनी, डॉ. बाहुबली दोशी, ज्योती जोशी, अण्णासाहेब कोथली, डॉ. उमा प्रधान, अॅड जे. जे. कुलकर्णी, पद्माकर कुलकर्णी, अण्णासाहेब राजमाने, प्रा शोभा बोल्ली, प्रा. सुधा राठी, गुरुशांत धुतरगावकर, प्रा केशव व विद्या शिंदे, वनमाला किणीकर, रजनीश जोशी, सुधीर देव, डॉ. विद्या कुमठेकर, प्रा. वीणा पत्की, विद्या काळे, विलास कुलकर्णी अरविंद जोशी उपस्थित होते.



### डेंग्यू आजाराच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने उपाययोजना कराव्यात

**सोलापूर, दि.२१ ऑगस्ट-**

शहरातील डेंग्यू आजाराच्या पार्श्वभूमीवर महापालिका आरोग्य विभागाने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात या मागणीचे निवेदन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे आणि आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांना देण्यात आले. सोलापूर शहरात विविध भागांमध्ये डेंग्यूचे रुग्ण आढळून येत आहेत या पार्श्वभूमीवर ज्या परिसरात रुग्ण आढळून आले आहेत त्या ठिकाणी महापालिका प्रशासनाने फवारणीसह इतर उपाययोजना कराव्यात अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार, महासचिव विनोद इंगळे, विक्रांत गायकवाड, रोहित लालसरे, विजय गायकवाड, विजयानंद उघडे , किरण साळवे, अभिजीत गायकवाड, शरीफ शेख आदी उपस्थित होते.

### राज्यातील ८२ पोलिस निरीक्षकांना सहायक पोलिस आयुक्तपदी पदोन्नती

**सोलापूर, दि.२१ ऑगस्ट-**

राज्याच्या पोलिस दलातील ८२ पोलिस निरीक्षकांना सहायक पोलिस आयुक्तपदी पदोन्नती देत बदल्या करण्याचे आदेश गृह विभागाने दिले आहेत. यामध्ये सोलापूर शहरातील फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे निरीक्षक दिलीप शिंदे यांची पुणे ग्रामीण पोलिस मुख्यालय येथे पोलिस उपअधिक्षक पदी बदली करण्यात आली आहे. तर याशिवाय सोलापूर जिल्ह्यात ५ सहायक आयुक्तपदी अधिकारी बदलून आलेले आहेत. राज्यातील पोलिस निरीक्षकांना सहायक पोलिस आयुक्तपदी पदोन्नती देण्याबाबत सुधारीत नियमित निवडसूची तयार करण्यात आली होती. त्यातील ८२ पोलिस निरीक्षकांना सहायक पोलिस आयुक्तपदी पदोन्नती देत बदली करण्याचे आदेश २० ऑगस्ट रोजी गृह विभागाचे अवर सचिव संदीप ढाकणे यांनी काढले आहेत. **सोलापूर शहर व जिल्ह्यातून बदलून गेलेले व बदलून आलेले अधिकारी पुढीलप्रमाणे** : दिलीप पांडुरंग शिंदे (पोलिस उपअधिक्षक, मुख्यालय, पुणे ग्रामीण), प्रताप धोंडीराम पोमण (सहायक पोलिस आयुक्त, सोलापूर), सुरेंद्र गजेंद्र माळाळे (सहायक पोलिस आयुक्त, सोलापूर), राजकुमार प्रभाकर शेरे (पोलिस उपअधिक्षक, पोलिस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर), धुलाबा दादाराव ढाकणे (पोलिस उपअधिक्षक, पोलिस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर), अशोक गुलाब सायकर (सहायक पोलिस आयुक्त, सोलापूर).

# शिक्षण घेतानाच आता प्रत्यक्ष ज्ञानासाठी विद्यार्थ्यांना अप्रेंटशीपची संधी : कुलगुरु महानवर

**● सोलापूर विद्यापीठात इंडस्ट्री व इन्स्टिट्यूट इंट्रॅक्शन मीट संपन्न**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांमध्ये प्लेसमेंट सेल विभाग सुरू करावा. या विभागामार्फत विद्यार्थ्यांना रोजगारा संदर्भात वेळोवेळी मार्गदर्शन करण्याबरोबरच विविध उपक्रमांचे आयोजन करावे. त्याबरोबरच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार सर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना विविध कंपनी, उद्योग तसेच संस्थांमध्ये अप्रेंटशीप-प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करून त्यांना तशी संधी उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांनी केले.

बुधवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात भारत सरकारच्या उच्च शिक्षण विभाग अंतर्गत असलेल्या बोर्ड ऑफ अप्रेंटशीप ट्रेनिंग, पश्चिम विभाग, मुंबई आणि विद्यापीठातील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल, अभ्यासमंडळे विभाग यांच्यामार्फत इंडस्ट्री-इन्स्टिट्यूट इंट्रॅक्शन मीट पार पडले. यावेळी कुलगुरू प्रा. महानवर हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रिसिजन कंपनीच्या संचालिका डॉ. सुहासिनी शहा, प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, बोर्ड ऑफ अप्रेंटशीप ट्रेनिंग पश्चिम विभागाचे उपसंचालक एन. एन. वडोदे, स्मृती ऑरगॅनिकचे एचआर प्रमुख कमलाकर गज्जम, महाराष्ट्र ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसचे रोहन कुर्री आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यापीठातील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. अनिल घनवट यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

कुलगुरू प्रा. महानवर म्हणाले की, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना रोजगाराभिमूख कसे बनवता येईल, यावर अधिक भर द्यावा. वर्गात शिकवण्याबरोबरच इंडस्ट्रीविषयी प्रत्यक्ष ज्ञान देण्यासाठी प्रयत्न करावे. विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे खूप गरजेचे आहे. यासाठी सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना अप्रेंटशीपची गरज होती, ती आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार मिळणार आहे. त्यासाठी महाविद्यालय व शिक्षकांनी इंडस्ट्रीच्या संपर्कात राहून विद्यार्थ्यांचा ग्रोथ वाढवावा, असे आवाहन देखील कुलगुरू प्रा. महानवर यांनी यावेळी केले.

डॉ. सुहासिनी शहा यांनी इंडस्ट्री भेटी वेळी विद्यार्थ्यांनी प्रत्येक गोष्टीकडे बारकाईने लक्ष देऊन त्याविषयी सखोल ज्ञान घेण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन केले. या कार्यक्रमास सोलापुरातील विविध इंडस्ट्रीचे एचआर प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रुती देवळे यांनी केले. सहायक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी आभार मानले.



**अप्रेंटशीप करणाऱ्या विद्यार्थ्यांना ९ हजार विद्यावेतन**

यावेळी बोलताना बोर्ड ऑफ अप्रेंटशीप ट्रेनिंग, पश्चिम विभागाचे उपसंचालक एन. एन. वडोदे म्हणाले, पूर्वी इंजिनिअरिंग विद्यार्थ्यांनाच अप्रेंटीशीप प्रशिक्षण मिळायचे. आता मात्र नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार भारत सरकार द्वारा सर्व विद्यार्थ्यांना अप्रेंटशिपची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना एक चांगली संधी उपलब्ध झाल्याचेही त्यांनी सांगितले. प्रशिक्षणादरम्यान अप्रेंटशिप करणाऱ्या विद्यार्थ्यांना दर महिन्याला विद्यावेतन सुद्धा दिला जातो. विद्यावेतनाचा किमान दर ९ हजार रुपये प्रति महिना इतका आहे. या विद्या वेतनातील ५० टक्के भाग भारत सरकारद्वारा आस्थापनांना दिला जातो. बरेचशे उद्योग ९ हजार पेक्षा जास्त विद्यावेतन विद्यार्थ्यांना देतात, असे वडोदे यांनी यावेळी सांगितले.

# वेळ गमावणे म्हणजे संधी गमावणे : प्रसन्नाजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१-**

वेळ गमावणे म्हणजे आयुष्यातील सर्व संधी गमावणे होय. निष्क्रियतेत वेळ घालवू नका. जीवनात बऱ्याचदा वेळ,सुसंधी,शुभ योग जुळून आलेले असतात. परंतु आळसामुळे आपण त्याचा फायदा घेत नाही. पर्युषण पर्वाच्या रूपाने संधी दाराशी आलेली आहे .संत वास्तव्यास आहेत.आत्म्याला परमात्मा बनविण्यासाठी प्रयत्न करा असे प्रतिपादन मधुर वक्ता प्रसन्नाजी यांनी केले.



जीवनात वेळ पाळा.वेळेची किंमत वेळीच ओळखा.वेळेत कधी आळस करू नका नाहीतर नंतर पश्चातापाची वेळ येते. वेळ परत येत नाही.वेळ निघून गेल्यानंतर पश्चाताप करूनही काहीच फायदा नसतो.वेळेचा सदुपयोग करा.वेळ कोणासाठी थांबत नाही आणि वेळ सांगूनही येत नाही. भविष्यात आपल्यावर कसा प्रसंग, कशी वेळ येणार हे कोणालाही माहीत नसते.वेळेचा संदेश जाणा. ज्यांच्याकडे धन आहे त्यांना भाग्यशाली समजले जाते. ज्यांच्याकडे धन व स्वास्थ आहे त्यांना सौभाग्यशाली मानले जाते. ज्यांच्याकडे धन,स्वास्थ आणि धर्म या तीनही गोष्टी आहेत त्यांना महासौभाग्यशाली मानले जाते.तर ज्याच्याकडे धन,स्वास्थ,धर्म यापैकी काहीच नाही त्याला दुर्भाग्यशाली म्हटले जाते.अनावश्यक गोष्टीत वेळ घालण्यापेक्षा धार्मिक कार्यास वेळ द्या.धर्मकार्यात सहभागी व्हा. संतांच्या चरणी बसा. त्यांचा दिव्य संदेश ऐका. त्याप्रमाणे आचरण करा.

जीवनात धर्म आराधना केलात तर आत्मशुद्धी होईल. ईश्वर प्राप्तीसाठी प्रयत्न करा. जवळजवळ ४८ तास, ७२ तास प्रवास करून तीर्थयात्रेला जाता. दोन-तीन दिवसाचा प्रवास करून मंदिरात जाता परंतु मंदिरात किती वेळ असता. गर्दीच्या ठिकाणी तर मंदिरात एक मिनिट आणि गर्दी नसेल तर पंधरा मिनिटे आपण थांबतो. जायला तीन दिवस आणि यायला तीन दिवस आणि मंदिरात किती वेळ तर फक्त पंधरा मिनिटे. एकदा दर्शन झाले की तीर्थयात्रेचे स्वरूप पर्यटनच. शॉपिंगच्या नावाखाली अनावश्यक वस्तूंचा संग्रह करतो.अनावश्यक पैसा खर्च करतो.अशाने यात्रा सफल होईल का? याचा अर्थ तीर्थयात्रेसाठी जाऊ नका असे नाही.परंतु आपण गेलो तर त्या पवित्र स्थळी वेळ द्या. धर्मकार्यासाठी वेळ द्या.

# शासकीय कर्मचाऱ्यांचा २९ ऑगस्टपासून बेमुदत संप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१-**

एक नोव्हेंबर २००५ नंतर शासकिय सेवेत रुजू कर्मचा-यांना जुनी पेन्शन योजना लागू करणेबाबत हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री यांच्याकडून जाहीर करण्यात आले होते. परंतू त्याबाबत ठोस कार्यवाही न झाल्याने २९ ऑगस्ट पासून कर्मचारी संघटनांनी पुन्हा एकदा बेमुदत संपावर जाण्याचा इशारा सरकारला दिला आहे.

त्या अनुषंगाने राज्य सरकारी कर्मचा-यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, खाजगीकरण रद्द करण्यात यावी, सरळसेवेतील रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी, चतुर्थश्रेणी व वाहनचालक या पदावरील सरळसेवेची बंदी उठवावी. व इतर प्रमुख मांगण्यांसाठी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समिती यांचेकडून बुधवारी (दि. २१) जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेमार्फत बेमुदत संपावर जाणेविषयीचे नोटीस देण्यात आली. यावेळी राज्य कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष राजीव साळुंके, सरचिटणीस अमृत कोकाटे, निमंत्रक अशोक इंदापुरे, शंतनू गायकवाड, राज्य महसूल कर्मचारी प्रदेश उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष गजानन गायकवाड, कोषाध्यक्ष नरेश बोनाकृती, उपाध्यक्ष मंजूनाथ गायकवाड, खंडू भोसले, सहसचिव दिपक पुजारी, कार्यालयीन सचिव समीर हुडीवाले, किशोर सावळे, मारेप्पा फंदीलोलू, रवी नष्टे, लक्ष्मीकांत आयगोळे, रणजीत म्हेत्रे, सुभाष मुपडे, नामदेव गायकवाड, जलसंपदा विभागाचे विनायक पाटील, सचिन माने, नामदेव शितोळे, गणेश काळे आदी संघटनांचे पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदिवासी कोळी समाजाच्या धरणे आंदोलनास अॅड.सोमनाथ वैद्य यांचा पाठिंबा

**● आंदोलनकर्त्यांच्या भोजनाचीही केली नेटकी व्यवस्था**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१-**

जिल्हा परिषदेसमोर विविध मागण्यांसाठी सकल आदिवासी कोळी समाजाच्या धरणे आंदोलनास आज स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक एड. सोमनाथ वैद्य यांनी सक्रिय सहभाग नोंदवून पाठिंबा दिला. सहभागी आंदोलनकर्त्यांच्या दुपारच्या भोजनाचीही व्यवस्था केली.

राज्यातील आदिवासी कोळी महादेव, मल्हार टोकारे, ढोर कोळी समाजाला अनुसूचित जमातीचे जातीचा दाखला आणि जात वैधता प्रमाणपत्र तात्काळ मिळावे यासह विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी आज एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनास दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवार ऍड. सोमनाथ वैद्य यांनी सक्रिय सहभाग नोंदवत पाठिंबा दर्शविला. दरम्यान, या आंदोलनात उपस्थित सर्व आंदोलनकर्त्यांसाठी स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक सोमनाथ वैद्य यांच्यावतीने आंदोलन स्थळी भोजनाची व्यवस्था करण्यात आली. रुचकर भोजनाचा आस्वाद घेऊन उपस्थितांनी तृप्तीचा ढेकर दिला.यावेळी सुरज खडाखडे, अभिमान घंटे, सुदाम होनकोंबडे, जगदेव कोळी, तात्यासाहेब भंडारे, राम शिंदे, दत्ता कोळी, शिवा कोळी, बाबासाहेब सोनवणे, शंकर कोळी आदींसह सकल कोळी समाज नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**कोळी महादेव समाज बांधवांना न्याय मिळाला पाहिजे : अॅड. वैद्य**

आदिवासी कोळी महादेव समाज बांधव गेल्या अनेक वर्षापासून अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र मिळावे यासाठी आंदोलन करीत आहेत. या समाजाला न्याय मिळाला पाहिजे यासाठी माझा सक्रिय पाठिंबा आहे. या मागणीसाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणार आहे. कधीही मला हाक द्या, मी सदैव आपल्यासाठी उपस्थित राहीन. मागण्यांच्या पाठपुरावासाठी मी कटिबद्ध आहे, अशी ग्वाही अॅड. सोमनाथ वैद्य यांनी यावेळी दिली.

# माजी विद्यार्थी हीच महाविद्यालयाची प्रतिमा : प्रा.डॉ.अरूण गायकवाड

**● व्ही. व्ही. पी. अभियांत्रिकीमध्ये माजी विद्यार्थी मेळावा संपन्न**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट -**

विद्यार्थी हा शिक्षणक्षेत्रामधील अत्यंत महत्वाचा घटक असून अशा घटकावर महाविद्यालयाची प्रगती होत असल्याने महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून विविध क्षेत्रामध्ये काम करणारे माजी विद्यार्थी हीच महाविद्यालयाची प्रतिमा असते, असे प्रतिपादन व्ही.व्ही.पी. तंत्रशिक्षण संकुलाचे शैक्षणिक संचालक तथा प्राचार्य डॉ. अरूण गायकवाड यांनी केले.

व्ही.व्ही.पी. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अॅन्ड प्लेसमेंट विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१३-२०२२ मधील उत्तीर्ण विद्यार्थी विद्यार्थीनीच स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विभाग प्रमुख प्रा. अविनाश पाटील, डॉ. सोमशेखर स्वामी, प्रा. राघवेंद्र कुलकर्णी, ट्रेनिंग अॅन्ड प्लेसमेंट अधिकारी प्रा. रोहन कुर्री, कार्यकम समन्वयक प्रा. एस. एन. सय्यद, माजी विद्यार्थी प्रतिनिधी रोहन साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. गायकवाड म्हणाले की, व्ही. व्ही. पी. अभियांत्रिकी महाविद्यालय हे नॅक मानांकित व विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांच्याकडून २ (फ) व १२ (ब) प्रमाणित असून विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून प्राध्यापकवर्ग अध्यापनाचे कार्य करीत असून व त्यांच्या सर्वांगीण विकासाठी सतत प्रयत्नशील असल्याने अनेक शासकीय, निमशासकीय औद्योगिक, केंद्रसरकार, महामंडळे, उद्योजक अशा विविध क्षेत्रामध्ये कार्यरत असून हे विद्यार्थी महाविद्यालयाचे वैभव असल्याचे प्रशंशोदगार काढून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. रोहन कुर्री यांनी केले. निखील सोनकांवळे, लक्ष्मीकांत कांवळे यांनी आपले अनूभव कथन केले. या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. जी के देशमुख, संस्थापक सचिव अमोल (नाना) चव्हाण, संस्था विश्वस्त मधुकर कटकधोंड यांनी शुभेच्छा दिल्या. सुत्रसंचालन प्रा अश्विनी मोटे व विद्यार्थी प्रतिनिधी आयान चिक्कली यांनी केले. प्रा. संजय बुगडे यांनी आभार मानले.




# मनपा सहाय्यक आयुक्तपदी सुरवसे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट -**

महापालिकेच्या सहाय्यक आयुक्तपदी अर्जुन संजय सुरवसे यांची नियुक्ती झाली आहे. राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने बुधवारी ७० अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश जारी केले. त्यात सुरवसे यांचा समावेश आहे. यापूर्वी ते मुख्याधिकारी या पदावर कार्यरत होते. सोलापूर महापालिकेत सहाय्यक आयुक्तांची बारापैकी सहा पदे ही शासन नियुक्त आहेत. उर्वरित सहा पदांवर स्थानिक अधिकाऱ्यांना बढती देऊन नियुक्ती करता येते. हे अधिकार सर्वसाधारण सभेला आहेत. सुरवसे यांची नियुक्ती शासनाकडून झाली आहे. माळशिरसच्या मुख्याधिकारी पदावर कल्याण पंढरी हुलगे यांची नियुक्ती झाली आहे.

# ओम नमो: श्री राघवेंद्राय नम: च्या गजरात लक्ष पुष्पार्चन

**● अलंकारांने सजले श्री राघवेंद्र स्वामींचे वृंदावन : श्री राघवेंद्र स्वामी मठात आराधना महोत्सव**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट -**

ओम नमो श्री राघवेंद्राय नम: च्या गजरात श्री राघवेंद्र स्वामी मठामध्ये लक्ष पुष्पार्चन सोहळा झाला. श्री राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी मध्याराधनेनिमित्त प्रयुक्त लक्ष पुष्पार्चन व तुळशी अर्चनासह अनेक धार्मिक विधी झाले.

बुधवारी पहाटे ५.३० वाजता सुप्रभात, सकाळी ६ वाजता निर्माल्य विसर्जन, सकाळी ७.३० वाजता अष्टोत्तर पारायण, सकाळी ८ वाजता पाद्यपूजा, सकाळी ९ वाजता पंचामृत अभिषेक, दुपारी १२ वाजता तुलसी अर्चना व नैवेद्य, हस्तोदक, अलंकार, महामंगलारती करण्यात आली. त्यानंतर हजारो भाविकांना तीर्थप्रसाद, महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. तर रात्री ८ वाजता पालखी सेवा, रथोत्सव, स्वस्तिवाचन, महामंगलारती व श्रेय प्रार्थना झाली. तसेच कमलानाथा प्रसादा (मंत्रालयम) यांचे प्रवचनही याप्रसंगी झाले. सायंकाळी गायक प्रशांत देशपांडे आणि सहकाऱ्यांचा भक्तीगीत कार्यक्रम झाला. यावेळी श्री राघवेंद्र स्वामींसह विविध देवतांवर भक्तीगीते सादर करुन गायक प्रशांत देशपांडे आणि सहकाऱ्यांनी उपस्थितांच्या टाळ्या मिळवल्या. याप्रसंगी श्री राघवेंद्र स्वामी भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**आज महारथोत्सव**

श्री राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सवाच्या उत्तराराधनेनिमित्त आज महारथोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरूवारी मुरारजी पेठेतील श्री राघवेंद्र स्वामी मठापासून सकाळी ११ वाजता महारथोत्सवास प्रारंभ होणार आहे. तर श्री काळजापूर मारुती मंदिराजवळच्या मठाच्या शाखेपासून सकाळी ११ वाजता पालखी सेवा होणार आहे. यावेळी भाविकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन श्री राघवेंद्र स्वामी मठातर्फे करण्यात आले आहे.

# गुन्हेगारी रोखण्यासाठी महिला सक्षमीकरण होणे काळाची गरज

**● जिल्हा सत्र न्यायाधीश एम.व्ही.केंद्रे**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट -**

भारतात बाल व महिलांवर होणारे अत्याचार, लैंगिक शोषण, कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण व्हावे यासाठी मजबूत कायदे बनवले आहेत. जेणे करून गुन्हा करणारा गुन्हेगार गुन्ह्यापासून परावृत्त झाला पाहिजे. मात्र पीडित बालिका अथवा महिला या मानसिक आणि शारीरिक दृष्ट्या सक्षम व धाडसी नसेल तर मात्र अत्याचाराला प्रोत्साहन मिळते. हे रोखणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हा सत्र न्यायाधीश केंद्रे यांनी केले.

ए. आर. बुर्ला महिला महाविद्यालयात आयक्यूएसी, राष्ट्रीय सेवा योजना, अँटी रँगिग कमिटी, अर्थ वाणिज्य मंडळ यांच्या संयुक्तविद्यमाने आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर यांच्या सहकार्याने विधी साक्षरता शिबीर आयोजित केले होते. याप्रसंगी ते पोक्सो कायद्याविषयी मार्गदर्शन करताना बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष सदस्यानी संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास क्यातम होते. प्रास्ताविक अॅड. श्रीनिवास क्यातम यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शंकर राजे यांनी केले. उपस्थितीतांचे आभार डॉ. अॅनी जॉन यांनी मानले.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या मुख्य संपादकपदी पदोन्नती झाल्याबद्दल प्रशांत माने यांना शुभेच्छा देताना वैष्णवी रजपूत, भारतीय हिंदराज सेनेचे धारासिंग रजपूत, युसूफ पिरजादे, शाहीर रमेश खाडे, दत्ता चव्हाण. यावेळी तरुण भारतचे कार्यकारी संचालक दिलीप पेठे.



सोलापूर : तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांचा सत्कार करताना विजय प्रताप युवा मंचचे दिनानाथ जाधव व प्रयास सामाजिक संघटनेचे सचिन शिंदे.



सोलापूर : दैनिक तरुण भारतच्या मुख्य संपादकपदी पदोन्नती झाल्याबद्दल प्रशांत माने यांना शुभेच्छा देताना कुर्डूवाडीचे जेष्ठ पत्रकार विनायक पाटील, सागर शर्मा.

# घंटागाडी कामगारांनी अचानक पुकारला संप

## गेल्या तीन महिन्यापासून वेतन न मिळाल्याने कचरा संकलन बंद, नागरिकांची गैरसोय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट -**

गेल्या तीन महिन्यापासून वेतन न मिळाल्याने अखेर घंटागाडी कामगारांनी आज सकाळपासूनच संप पुकारला. महापालिकेच्या विविध झोनच्या ठिकाणी घंटागाड्या लावून काम बंद आंदोलन केले. यामुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय झाली.

सोलापूर महापालिका प्रशासनाच्या नियंत्रणाखाली घंटागाड्याच्या माध्यमातून शहरात घरोघरी जाऊन कचरा संकलन करण्यात येते. या घंटागाड्यांचा मक्ता खाजगी ठेकेदाराला देण्यात आला आहे. या ठेकेदाराच्या अंतर्गत घंटागाडी वरील सर्व ड्रायव्हर आणि मदतनीस हे कार्यरत आहेत. घंटागाड्यांवर सुमारे ४०० कामगार कचरा संकलनाचे काम पाहतात. कचरा संकलना प्रमाणे महापालिका संबंधित ठेकेदाराला बिल अदा करते. तर संबंधित ठेकेदाराकडून त्यांच्या अंतर्गत असलेल्या या घंटागाडीवरील कामगारांना वेतन दिले जाते. किमान वेतन कायद्यानुसार या घंटागाडी कामगारांना वेतन, प्रॉव्हिडंट फंड आणि इएसआय देणे बंधनकारक आहे. मात्र गेल्या तीन महिन्यापासूनचे या घंटागाडी कामगारांचे





वेतन थकीत असल्याचा आरोप करत या कामगारांनी आज सकाळपासूनच काम बंद ठेवून संप पुकारला. विविध आठ झोन अंतर्गत कार्यरत असलेल्या या घंटागाडी कामगारांनी त्या त्या ठिकाणी घंटागाड्या लावून काम बंद केले. दररोज सुमारे २०० टन कचरा संकलन या घंटागाड्यांच्या माध्यमातून करण्यात येतो मात्र हे काम बंद आंदोलन केल्यामुळे संकलनाचे काम ठप्प होते. नागरिकांची गैरसोय झाली.

**संबंधितांना सूचना दिली असून लवकरच प्रश्न मार्गी लागेल : उपायुक्त**

या संदर्भातील बिलावर १४ तारखेलाच महापालिका आयुक्तांची सही झाली आहे.

बँकेच्या टेक्निकल इशूमुळे प्रॉब्लेम झाला असल्याचे समजले. संबंधितांना आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत. लवकरच प्रश्न मार्गी लागेल, अशी माहिती महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी दिली.

> **महापालिका प्रशासनाने तात्काळ लक्ष द्यावे**
>
> ऐन पावसाळ्यात शहरातील कचरा संकलन व्यवस्थापन बिघडत असल्याने नागरिकांना दुर्गंधी आणि अस्वच्छतेला सामोरे जावे लागत आहे. रोडवर कचरा टाकला जातो. त्यामुळे सर्वत्र रोगराई वाढत आहे. याकडे महापालिका प्रशासनाने आणि महापालिका आयुक्त यांनी याप्रश्नी तात्काळ लक्ष द्यावे.
>
> **- पूजा बिराजदार, एक नागरिक**

**नियमाप्रमाणे वेतन, प्रॉव्हिडंट फंड जमा केला जात नसल्याचा आरोप**

मक्तेदाराच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या शहरातील घंटागाडीवरील ड्रायव्हर आणि मदतनीस अशा सुमारे ४०० कामगारांना किमान वेतन प्रमाणे वेतन दिले जात नाही आणि नियमानुसार प्रॉव्हिडंट फंड आणि इएसआय कपात केला जात नाही. हे दोन्हीही कपात केल्याचा मेसेज मोबाईलवर या कामगारांना येत नाही. माहिती देण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप या कामगारांनी केला आहे.

**उद्यापर्यंत कामगारांना वेतन जमा होईल**

दरम्यान, या संदर्भात मक्तेदार अश्विनकुमार मानवे यांच्या भ्रमणध्वनीवर फोन केला असता त्यांच्या निकटवर्ती यांनी फोन उचलला. मानवे हे परदेशात गेले आहेत. त्यांच्याशी आमचा संपर्क होऊ शकत नाही. उद्या गुरुवारी घंटागाडीवाल्यांचे वेतन होऊन जाईल, अशी माहिती मला आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

**मक्तेदाराने कोणतीही दखल घेतली नसल्याचा आरोप**

थकीत वेतन मिळत नसल्याने अखेर घंटागाडी कर्मचाऱ्यांनी भल्या सकाळी सहा वाजल्यापासूनच घंटागाड्या ज्या त्या ठिकाणी लावून काम बंद ठेवले. संप पुकारला. दुपारी तीन वाजेपर्यंत संबंधित मक्तेदार आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांनीही कोणत्याही प्रकारची विचारपूस केली नाही. काम बंद ठेवले तरी दखल घेतली नाही असा आरोप करत ठोस आश्वासन अथवा वेतन मिळाल्याशिवाय संप मागे घेणार नाही. आम्हाला न्याय मिळावा, अशी मागणी या कामगारांनी केली आहे.



# लाडक्या बहिणींनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना पाठवली १० फुटांची राखी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट -**

सोमवंशी क्षत्रिय समाज युवती प्रतिष्ठान संस्थेच्या महिला सभासदांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांना १० फुटी राखी पाठवली आहे. सदरचा अनोखा उपक्रम राबविल्याने मंडळांचे कौतुक होत आहे.

समाजातील प्रत्येक महिलेला लाडकी बहीण योजनाद्वारे दर महिन्याला पंधराशे रुपयांचा लाभ मिळाला आहे. स्वातंत्र्य दिन आणि रक्षाबंधन दिवशीच या योजेनेचे निधी बँक खात्यात वर्ग झाल्याने लाडकी बहिण योजनेचा लाभ सर्वसामान्य महिलांना मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर लाडक्या बहिणींसाठी योजना सुरू केल्यामुळे सरकारचे कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सोमवंशी क्षत्रिय युवती प्रतिष्ठान तर्फे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना मोठी राखी पाठवत महिलांसाठी विविध योजना राबवत महिला सक्षम करत असल्याबद्दल महायुती सरकारचे आभार मानले.


**लाडकी बहीण योजना लागू केल्याने सोमवंशी क्षत्रिय समाजाच्या युवती मंडळाने केली कृज्ञता व्यक्त**

> **समाजाच्या वतीने केले जाते विविध कार्यक्रमांचे आयोजन**
>
> सोमवंशीय क्षत्रिय समाज युवती प्रतिष्ठानच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. त्याच माध्यमातून हा अनोखा उपक्रम राबवला आहे. भरजरी कापड, सुती दोरा आणि फोटो बॅनर यांच्या साह्याने दहा फुटांची मोठी राखी बनवली आहे. याव्यतिरिक्त प्रतिष्ठानच्या वतीने संस्कार वर्ग, व्याख्यानमाला आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. तसेच श्रावण महिन्यात क्षत्रिय गल्लीतील श्री विठ्ठल मंदिरात ५६ भोग महाप्रसाद आयोजित केला जातो.
>
> **- सुनीता पवार,**
> खजिनदार, सोमवंशीय क्षत्रिय समाज युवती प्रतिष्ठान सोलापूर.

सध्या सरकारने गोरगरीब महिलांसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेमुळे अनेक गरजू महिलांना आर्थिक स्वरूपात मदत मिळत आहे. त्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने झाली असून सरकारचे आभार मानण्यासाठी प्रतिष्ठानच्या सदस्यांनी हा उपक्रम घेतला असल्याचे सांगण्यात आले. सदरचा अनोखा उपक्रम राबवण्यासाठी युवती मंडळाच्या अध्यक्ष गीता हबीब, ज्योती मेहरवाडे, मोना रंगरेज, सुनीता पवार, रंजिता रंगरेज, मेघा पवार, वर्षा कबाडे, प्रज्ञा मिरजकर आदींसह प्रतिष्ठानच्या पदाधिकारी आणि सदस्य यांनी परिश्रम घेतले.

# सिंहगड अभियांत्रिकीच्या चौघांची नामांकित 'कॅपजेमिनी' मध्ये निवड



**तभा वृत्तसेवा**
सोलापूर, दि.२१ ऑगस्ट-

केगांव येथील एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील कॉम्प्युटर विभागातील ४ विद्यार्थ्यांची कॅपजेमिनी या नामांकित कंपनीमध्ये निवड झाली आहे. यामध्ये रिद्धी शेट्टी, सामिया खान, मानसी राकळे, सफुरा पेरांमपल्ली यांचा समावेश असून त्यांना वार्षिक ४ लाख पॅकेज मिळाले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सिंहगड संस्था ही नेहमीच अग्रेसर असते. विद्यार्थ्यांच्या कर्तृत्व गुणांना वाव देण्याचे काम सिंहगड संस्था करत असते. विद्यार्थ्यांना प्लेसमेंटसाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या गोष्टीचे तज्ञ् प्राध्यापकांकडून प्रशिक्षण देण्यात येत असते व त्याचा फायदा मुलांना प्लेसमेंटसाठी होत आहे. या यशाबद्दल सिंहगड संस्थेचे सहसचिव संजय नवले, प्राचार्य डॉ.शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे, डॉ.शेखर जगदे, डॉ.विनोद खरात, डॉ.प्रदीप तपकिरे, डॉ.विजयकुमार बिरादार, प्रा.हरीश गुरमे, प्रा.सुरज धनवे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. विकास मराठे आदींनी अभिनंदन केले.

## घरगुती भांडणामुळे महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

घरगुती भांडणामुळे महिलेने कपडे धुण्याचे औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. मिराबाई संजू बाडीवाले (वय ३०, रा. कुमठा नाका, महाराणा प्रताप नगर, सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या महिलेचे नाव असून त्यांच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. बुधवारी सकाळी साडेआठच्या सुमारास मिराबाई यांनी घरगुती भांडणातून विषारी औषध प्राश केले. त्यांना त्रास होऊ लागल्यावर उपचारासाठी नणंद गिता चौधरी यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.




## संक्षिप्त वृत्त



### नुमवि शिशु शाळेत हरित दिन साजरा

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

नुमवि शिशु शाळेत हरित दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मोठा गट केदार मधील बालाजी लोकरे व प्रिया लोकरे या पालकांना आमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांनी सूर्य, वायु, आकाश, अग्नी या पंचमहाभूतांचे महत्त्व सांगितले. त्यानंतर मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते पंचमहाभूतांचे पूजन करण्यात आले. हरित दिनानिमित्त वृक्षारोपण करून झाडे लावा झाडे जगवा हा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार वैशाली पाटील यांनी केले.



### विश्वशांती गुरुकुल वाखरी येथे पर्यावरणपुरक गणपती तयार करण्याची कार्यशाळा संपन्न

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

एम आय टी गुरुकुल वाखरी, पंढरपूर व रोटरी क्लब सोलापूर नॉर्थ यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण पूरक गणेश मूर्ती तयार करण्याची कार्यशाळा संपन्न झाली. रोटरी क्लबच्या क्षितिजा गाताडे यांनी विविध प्रात्यक्षिक सादर करून प्लॅस्टर ऑफ पॅरिस विरहित पर्यावरण पूरक गणेश मूर्ती तयार करण्याचे तंत्रज्ञान सहज व सोप्या पद्धतीने विद्यार्थ्यांना करून दाखविले. यावेळी एम.आय.टी. ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य डॉ. स्वप्नील शेठ यांनी सण, उत्सव साजरे करताना पर्यावरणचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. यावेळी मुख्याध्यापिका शिबानी बॅनर्जी, स्कूलचे प्राचार्य शिवाजी गवळी, सौ. गवळी, रोटरी क्लब सोलापूर नॉर्थच्या अध्यक्षा डॉ. जान्हवी माखिजा, सचिव स्वप्नील कोंडगुळे उपस्थित होते.

# गणरायाच्या आगमनाला खड्ड्यांचे विघ्न

## महापालिका प्रशासनाचे होतेय अक्षम्य दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना सोलापूर शहरातील रस्त्यांची दुरवस्था अद्याप कायम आहे. सात सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला शहरात सुरवात होत आहे. तरीदेखील महापालिकेकडून रस्त्यांच्या दुरुस्तीची हालचाली दिसत नसल्याने संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांनी आपल्या कर्तव्याला तिलांजली दिली आहे का? असा सवाल आता गणेशभक्तांमधून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान शहरातील प्रत्येक विभागीय कार्यालयास रस्त्यांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी दरवर्षी २० लाख रुपये तर नगरअभियंता कार्यालयास ७५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तरीदेखील रस्त्यांची आवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. यंदा देखील गणरायाचे आगमन सोलापूर शहरातील विविध खड्ड्यातून होणार आहे का? अशी भीती गणेश भक्तांमधून व्यक्त केली जात आहे.




> **रस्त्यांच्या दुरूस्तीकडे आयुक्तांनी लक्ष द्यावे**
>
> गणेशोत्सव, नवरात्र उत्सव आता काही दिवसांवर आला आहे. मात्र, सध्या शहरातील रस्त्यांची प्रचंड दुरवस्था झाली आहे. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहनधारकांचेही अपघात वाढले आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्तांनी शहरातील रस्त्यांच्या दुरुस्तीचे आदेश द्यावेत. **- सचिन पाटील, गणेशभक्त**

शहरात प्रवेश करताच एसटी स्टॅण्डसमोर व छत्रपती शिवाजी महाराज चौकातही मोठा खड्डा पडला आहे. नवीपेठ, पासपोर्ट कार्यालयासमोरील रोड, अक्कलकोट पाण्याची टाकी, अक्कलकोट रोड, शिंदे चौक, रंगभवनजवळील जिल्हा न्यायालयासमोरील रस्ता, पोटफाडी चौक, गुरुनानक चौकातून अशोक चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावरही मोठे खड्डे पडल्याची वाईटस्थिती आहे.

अधिकारी व शासकीय कर्मचारी दररोज या रस्त्यावरून ये-जा करतात, शाळकरी मुलांचीही याच रस्त्यावरून ये-जा सुरू असते. वाहनांची सर्वाधिक वर्दळ असणाऱ्या या रस्त्यांची अशी दुरवस्था झालेली असतानाही महापालिकेकडून खड्ड्यांची दुरुस्ती होत नसल्याने प्रशासन आणि संबंधित अधिकारी कर्मचारी यांच्या नाकर्तेपणाचा कळस गाठला आहे. रस्त्यांच्या दुरुस्तीचा विषय महापालिका प्रशासनाकडून किती गांभीर्याने घेतला जातो, याकडे गणेश भक्तांचे लक्ष लागून राहिले आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.







## संक्षिप्त वृत्त...

### गांधीनगर पोलीस लाईन येथील बिल्डिंगच्या रूममधील पोलिसांची कागदपत्रे चोरीस

**सोलापूर दि. २१ ऑगस्ट-**
सोलापूर लोहमार्ग पोलीस ठाणे अंतर्गत गांधीनगर पोलीस लाईन (रेल्वे पोलीस वसाहत, दगडी बिल्डिंग क्रमांक) मधील रूम नंबर ५, ६ व ७ मधील ए रेकॉर्ड अनुक्रमांक १ ते १४ मधील दस्तऐवज साधारण सन १९९० पासून ते २०20 पर्यंतचे सर्व कागदपत्रे ही कोणीतरी अज्ञात चोरट्याने लबाडीने कुलूप तोडून प्रवेश करून शासकीय कागदपत्रे व इतर महत्वाचे फाईल चोरून नेली आहे. याबाबत पोलीस हवालदार परमेश्वर सौदागर खरात (नेमणूक सोलापूर लोहमार्ग पोलीस ठाणे सोलापूर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. चोरट्याने १,५ व ६ न्यायालयाकडून मंजूर समन्या, अकस्मात मयत समन्या, एन सी प्रतिबंधात्मक कारवाई, गुन्हे व अकस्मात मयत केस डायरी, मिसींग प्रकरणे व आदेश, एफआयआर आदेश, दोषारोपपत्र, आदेश फाईली, त्रुटी आदेशाचे स्थळप्रत, तपास टिपणी, पुर्तता अहवाल, हजेरीपट, रजिस्टार आवक जावक, क्राईमचे रेर्कार्ड यादीची स्थळ प्रत, पत्रव्यवहार फाईल, विद्युत मोटारीचे स्टार्टर, केबल आदीं चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार मोरे पुढील तपास करीत आहेत.

### तरुणास मिरवणुकीत मारहाण; तिघांवर गुन्हा

**सोलापूर दि. २१ ऑगस्ट-**
मार्कंडेय रथ उत्सव मिरवणुकीमध्ये नाचण्यासाठी गेल्यानंतर आशिष मनोज राठोड (वय २०, रा. शिवशक्ती चौक, कलावती नगर, अक्कलकोट रोड) याला हाताने मारहाण करत डोक्यात दगड घालून दुखापत केली आहे. ही घटना १९ ऑगस्ट रोजी पोटफाळी चौक येथे घडली. याप्रकरणी आशिष राठोड याने दिलेल्या फिर्यादीवरुन आनंद धोत्रे, सतीश धोत्रे, विशाल भैरामंडी (सर्व रा.सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार कांबळे हे करीत आहेत.

### नाकोडा सनराईज सिटीत सोन्यासह रक्कम पळवली

**सोलापूर दि. २१ ऑगस्ट-**
अज्ञात चोरट्याने न्यू मल्लिकार्जुन नगर येथील नाकोडा सनराईज सिटी येथील घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करत घरातील सोने व रोख रक्कम असा एकूण ९४ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना १९ ऑगस्ट रोजी घडली. याप्रकरणी गणेश सिद्धाराम नाडगुंडे (वय ३०, रा. नाकोडा सनराईज सिटी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सोळुंके हे करीत आहेत.

### शाळेच्या कंपाउंडलगत हॅण्डल लॉक केलेली दुचाकी लंपास

**सोलापूर दि. २१ ऑगस्ट-**
स्वामी विवेकानंद शाळेच्या कंपाउंड लगत हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच १३ सीए १९१४ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना १६ ऑगस्ट रोजी रात्री नऊ ते दहा वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी गणेश राजू भंडारी (वय ३४, रा. म ाळीनगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत.

### फौजी चित्रपटात सौरभ आणि प्राजक्ताची जोडी

**सोलापूर दि. २१ ऑगस्ट-**
मराठी चित्रपटामध्ये वेगळ्या विषयांसोबतच आजकाल नायक-नायिकेच्या अनोख्या जोड्याही पहायला मिळतात.मराठी रुपेरी पडद्यावर अशीच आणखी वेगळी एक जोडी लवकरच पहायला मिळणार आहे. ती जोडी आहे सौरभ गोखले आणि प्राजक्ता गायकवाडची. 'फौजी' या चित्रपटातून ही जोडी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मातृपितृ फिल्म्स निर्मित घनशाम येडे प्रस्तुत 'फौजी' हा मराठी चित्रपट येत्या ३० ऑगस्टला चित्रपटगृहात दाखल होत आहे.या चित्रपटाच्या निमित्ताने हे दोघे प्रथमच एकत्र आले असून देशभक्तीची पार्श्वभूमी असलेल्या 'फौजी' चित्रपटात वेगळ्या धाटणीची व्यक्तिरेखा साकारण्याची संधी मिळणं हे खरंच आम्हाला सुखावणारी बाब असल्याचे दोघं सांगतात.

### एससी,एसटी आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधातील

# भारत बंदला सोलापुरात संमिश्र प्रतिसाद

## बसपाच्या कार्यकर्त्यांनी रॅली काढून केले बंदचे आवाहन; विविध मागण्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २१ ऑगस्ट-**
एससी, एसटी आरक्षण उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द करावा यासह विविध मागण्यांसाठी पुकारण्यात आलेल्या भारत बंदला सोलापुरात बुधवारी (दि.२१) संमिश्र प्रतिसाद मिळाला. बसपाच्या कार्यकर्त्यांनी शहरात रॅली काढून बंदचे आवाहन केले. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.






ऑल इंडिया बहुजन समाज पार्टीच्या वतीने या बंदची हाक दिली होती. आज सकाळपासूनच बसपाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शहरातील एसटी स्टँड, नवी पेठ, डॉ. आंबेडकर चौक परिसरासह इतर ठिकाणी रॅली काढून बंदचे आवाहन केले. हातात पक्षाचे निळे झेंडे आणि निळे उपरणे गळ्यात घालून पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ठिक-ठिकाणी बंदचे आवाहन केले. बहुजन समाज पार्टीचा विजय असो आणि विविध घोषणा देण्यात आल्या. बंदच्या आवाहनास त्या त्या ठिकाणी व्यापाऱ्यांनी प्रतिसाद दिला. काही वेळानंतर त्या ठिकाणची दुकाने उघडण्यात आले असल्याचे दिसून आले. रॅलीद्वारे जाऊन पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

अनूसूचित जातींचे वर्गीकरण व अनुसूचित जाती जमातीना क्रिमीलेअर न लावणेबाबत संसदेत घटना दुरुस्ती करून सर्वोच्च न्यायलायाचा निर्णय रद्द करावे. न्यायधिशांच्या नियुक्तीसाठी कॉलेजियम पद्धत बंद करून न्यायायधिशाची नियुक्ती ऑल इंडिया जुडेशरी सर्व्हिसचे गठन करून यात आरक्षण लागू करावे. एससी, एसटी, ओबीसी, भटक्याचे आरक्षणाला कायदेशीर करण्यासाठी संविधानाच्या शेड्युल ९ मध्ये त्याचा अंतरभाव करावा. जिसकी जितनी संख्या भारी उसकी उतनी भागीदारीनुसार जातीनिहाय जनगणना करावी. सर्वांना समान न्याय या तत्वानुसार ओपन कॅटगरीचे सुद्धा वर्गीकरण करून त्यांनाही क्रिमीलेअर लावावे. खासगी संस्थामध्ये आरक्षण लागू करावे, जातीचे निर्मूलन करण्यासाठी शाळा सोडल्याच्या दाखल्यावर जात लिहिणे बंद करावे व जातीचे दाखले देणे बंद करून फक्त प्रवर्गाचे प्रमाणपत्र देण्यात यावे. अनुसूचित जाती, जमाती व मागासवर्गीयांचा रिक्त असलेल्या पदांचा अनुशेष भरण्यासाठी आरक्षित व खुल्या प्रवर्गातील जागांच्या स्थितीचे श्वेतपत्र जाहीर करावे आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. यावेळी प्रदेश कार्यकारणी सदस्य आप्पासाहेब लोकरे, ॲड. संजीव सदाफुले, जिल्हाध्यक्ष बबलू गायकवाड, माजी शहर अध्यक्ष देवा उघडे, टी. ए. लोहार, राहुल सर्वगोड, योगेश गायकवाड, जिल्हा कार्यालयीन सचिव शिलवंत काळे, अमर साळवे, सुहास सुरवसे, महिंद्र कांबळे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### नवीपेठेत बंदच्या अफवाने तणावाचे वातावरण

बुधवारी सकाळी नवीपेठेत सर्व दुकाने सुरू होती. सर्व व्यवहार सुरळीतपणे चालू होते. परंतु कार्यकर्त्यांच्या घोषणाबाजीने व्यापाऱ्यांनी दुकाने बंद केली. यामुळे नवीपेठेत तणावाचे वातावरण निर्माण झाले. काहीतरी अनुचित प्रकार घडला आहे, दगडफेक झाली आहे, अशी अफवा सोलापूर शहरात वाऱ्यासारखी पसरली. परंतु तशी कोणतीही घटना नवीपेठ मध्ये घडली नाही. काही काळ नवीपेठमध्ये तणाव होता. फौजदार चावडीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिलीप शिंदे आणि त्यांचे सहकारी तात्काळ घटना ठिकाणी दाखल झाले आणि परिस्थिती नियंत्रणात असल्याची माहिती दिली. व्यापाऱ्यांनी काही काळानंतर दुकाने सुरू ठेवत आपले दैनंदिन व्यापार सुरू केले.

## मुख्यमंत्री 'नको तुमची लाडकी बहिण योजना, आम्हाला हवी सुरक्षा'



### राष्ट्रवादी महिला आघाडीचे अनोखे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २१ ऑगस्ट-**
बदलापूर येथील दोन चिमूरड्या विद्यार्थीनींवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर सोलापुरात त्याचे पडसाद उमटत आहेत. शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला आघाडीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने केली. यावेळी मुख्यमंत्री 'नको तुमची लाडकी बहीण योजना, आम्हाला हवी सुरक्षा' या घोषणांनी परिसर दणाणून सोडले होते. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

दरम्यान शहराध्यक्ष सुनिता रोटे यांनी घटनेचा तीव्र शब्दात निषेध नोंदवताना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवली त्याचा आम्हाला अभिमान वाटतो परंतु आमच्या मुलींना तुम्ही सुरक्षा कधी देणार? असा प्रश्न विचारत गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. यावेळी लता फुटाणे, वंदना भिसे, सुरेखा मोगरे, नसीम शेतसंधी, सुनिता गायकवाड, गौरा कोरे, मनीषा माने, रेखा सपाटे, प्रतीक्षा चव्हाण, सारिका नारायणकर, प्रेमलता कांबळे, कुंदन कांबळे, गुलशन जमादार यांच्यासह महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.




### अज्ञात कारणावरून तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट -**
शहरातील न्यु बुधवार पेठ परिसरात राहणाऱ्या तरूणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्म हत्या केली.

सचिन विकास शिरसट (वय ३५, रा. न्यु बुधवार पेठ, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. बुधवारी सकाळी साडेनऊपूर्वी सचिन शिरसट या तरूणाने अज्ञात कारणावरून राहत्या घरात खिडकीच्या लोखंडी हॅन्डलला नायलॉन दोरीने गळफास घेतल्याचे दिसून आले. त्यावेळी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार शेडम यांनी सचिन शिरसट यास खाली उतरवून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. शितलकुमार यांनी शिरसट यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## राज्यपालांनी सरकार बरखास्त करावे

### शिक्षणसंस्था, दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २१ ऑगस्ट-**
बदलापूर घटनेच्या निषेधार्थ व राज्य सरकारच्या विरोधात उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने जिल्हा परिषद पूनम गेट येथे बुधवारी तीव्र निदर्शने करण्यात आली. राज्य सरकार बरखास्त करावे, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी राजीनामे द्यावेत. राज्यपालांनी त्वरित सरकार बरखास्त करावे, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने आंदोलनावेळी केली.

बदलापूर येथील त्या शिक्षण संस्थेवर कठोर कारवाई करण्यात यावी. त्या नराधमावर व दिरंगाई करणाऱ्या शाळेतील हलगर्जीपणा केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. पिडीत्याला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर यांनी केली.

केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार असताना व महाराष्ट्रात मिंदे सरकार आल्यापासूनच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. जे कोणी आरोपी आहेत त्यांना कायद्याची भीती राहिलेली नाही. फास्टट्रॅक कोर्टात खटला चालवून नराधमाला फाशी देण्यात यावी, अशी मागणी दत्तात्रयपंत वानकर यांनी केली. यावेळी लहू गायकवाड, अस्मिता गायकवाड, आबा सावंत, पूजा खंदारे, सुरेश शिंदे, अनिल जाधव, सुरेश जगताप, ऋषी दोरकर, बाबू दोरकर, अजय पुकाळे, सोमनाथ बंदपट्टे, कृष्णा सुरवसे, अमोल भोसले, बाळासाहेब पवार, दत्ता खलाटी, शशिकांत बिराजदार, डॉ.शकील आतार, ज्योतीबा गुंड, सुरेश जगताप, संदिप बेळमकर, अमीत भोसले, अनिल दंडगुले, जगदीश मुल्ला विजय पुकाळे आदी शिवसेना, महिलाआघाडी, युवा युवतीसेना व सर्व अंगीकृत संघटना आजी माजी पदाधिकारी, शिवसैनिक मोठया संख्येने उपस्थित होते.

### अशा नराधमांना भर चौकात फाशी द्या

बाळासाहेब ठाकरे यांनी यापूर्वी सुद्धा म्हटलेले आहे की अशा बलात्कारी लोकांना भर चौकात फाशी देण्यात यावी याच अनुषंगाने फास्टट्रॅक कोर्टात केस न चालवता व एसआयटीने नेमका अशांना भर चौकात फाशी देण्यात यावी.

**-प्रताप चव्हाण, उपजिल्हा प्रमुख**




## महिला अत्याचार प्रकरणी महिला काँग्रेस आक्रमक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २१ ऑगस्ट-**
बदलापूर येथे चिमुकल्या मुलींसोबत आणि कोलकत्ता येथे डॉक्टर मुलीवर झालेल्या अत्याचार घटनेचा निषेध करण्यासाठी तसेच ही प्रकरणे फास्टट्रॅक कोर्टात चालवून आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी या मागणीसाठी सोलापूर शहर महिला काँग्रेसच्यावतीने काँग्रेस भवन येथे निदर्शने आंदोलन करून निषेध व्यक्त केला. तहसीलदार दिनेश पारगे यांना निवेदन देण्यात आले

निवेदनात असे नमूद आहे, बदलापूरमधील एका प्रतिष्ठित शाळेत सफाई कर्मचाऱ्याकडून दोन चिमुरड्यांवर लैंगिक अत्याचार करण्यात आला. पोलिसांनी गुन्हा नोंद करण्यास टाळाटाळ केली. त्याच प्रमाणे पश्चिम बंगालमधील आर.जी.कार. मेडिकल हॉस्पिटलम ध्ये शिकत असलेल्या एका निवासी महिला डॉक्टरवर काही नराधमांनी अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केली. केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र म ोदी यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या एन. डी.ए सरकार आणि राज्यातील महायुती सरकारच्या निष्क्रियतेपणामुळे देशात आणि महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या घटना वाढतच चाललेल्या आहेत. केंद्रातील एन.डी. ए.सरकार आणि राज्यातील महायुती सरकार विरुद्ध जनतेत प्रचंड रोष निम र्ाण होऊन रस्त्यावर उतरत आहे. देशात आणि राज्यात बहिणी तर सुरक्षित नाहीतच पण आता तीन चार वर्षाच्या लेकीसुद्धा सुरक्षित नाहीत, बदलापूर येथे चिमुकल्या मुलींसोबत व कलकत्ता येथील झालेला प्रकार अत्यंत घृणास्पद व निंदनीय आहे. निष्क्रिय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, शिक्षण मंत्री यांनी ताबडतोब राजीनामा द्यावा अशी आमची मागणी आहे.या निषेध आंदोलनात माजी महिला अध्यक्ष अँड करिमुनिसा बागवान, हेमा चिंचोळकर, माजी नगरसेविका भारती ईप्पलपल्ली, आशा म्हेत्रे, शोभा बोबे, संध्या काळे, शुभांगी लिंगराज, मुमताज तांबोळी, चंदा काळे, रेखा बिनेकर, अरुणा बेंजरपे, रुकय्याबानू बिराजदार, सुनिता शेरखाने, लता सोनकांबळे, सलीमा शेख, मुमताज शेख, रोहिणी धोत्रे, आशा गायकवाड आदींसह महिला पदाधिकारी उपस्थित होते.


श्री सिध्देश्वर देवस्थान ट्रस्ट संचलित

**श्री सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक, सोलापूर**

रुपाभवानी मंदिर रोड, भवानी पेठ, सोलापूर

All Programmes Accredited (3 Times) by NBA, New Delhi.

**डिप्लोमा प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका प्रवेश**

**Facilitation Center : 6458**

**Online Option Form Filling ची मोफत सोय**

कन्नड भाषिक अल्पसंख्यांकासाठी ५१% जागा राखीव

| Sr.No. | Courses | Choice Code |
|---|---|---|
| 1 | Civil Engineering (Women) | 645819150F |
| 2 | Computer Engineering (Women) | 645824550F |
| 3 | Information Technology (Women) | 645824650F |
| 4 | Electrical Engineering (Women) | 645829350F |
| 5 | Electronics & Telecommunication Engineering (Women) | 645837250F |

**प्रथम वर्ष** - **CAP Round III** करीता ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची तारीख २२ ऑगस्ट ते २६ ऑगस्ट २०२४.

**थेट द्वितीय वर्ष** - **CAP Round III** करीता ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची तारीख २७ ऑगस्ट ते २९ ऑगस्ट २०२४.

कार्यालय स. ०९ ते सा.०५ वाजेपर्यंत आणि रविवार व इतर सुट्टीच्या दिवशीही खुले राहील.

- संस्था स्तरावरील प्रवेशाकरीता संपर्क -

प्रा. श्रीशैल मळेवाडी ९९२२३६२०३५ प्रा. शिल्पा देशमुख ८८५५९५२३१० 
प्रा. सुचेता चौधरी ९८९०८६९८२६ प्रा. प्रविण गौडा ८४२१८६२६४५ 
प्रा. प्राजक्ता सप्तश्वा ९८२२२६१४८६

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८६४

**सेना म्हणे याविण काही ।**
**मोक्ष मुक्ती चाड नाही ।।**

संसार म्हटला की केव्हा काय आणि किती लागेल हे सांगता येत नाही. हे खरे असले तरीही जमवाजमवीला मर्यादा घातल्या पाहीजेत. हे पाहिजे, ते पाहिजे, एवढे पाहिजे, तेवढे पाहिजे असे म्हणणारे अनेक सांसारीक जीव मृत्यूशय्येवर जाऊन पडले तरी त्यांचे असे मागणे थांबवत नाहीत. माझ्या डोळ्यासमोर किंवा मी जिवंत आहे तोपर्यंत तरी माझ्या समाधानासाठी का होईना हे शेत घ्या, ते घर घ्या, ते दुकान खरेदी करा, असे म्हणणारेही काही कमी नाहीत. जमीन, घर दारासाठी म्हणजेच नाशवंतासाठी भावाभावातील भांडणेही काही कमी नाहीत. असो, रिक्त हाताने रडत येणारा हा जीव रिक्त हाताने रडत रडतच जातो. हे सत्य असले तरी आयुष्यभर जमवलेलं जणू कांही सर्व सोबतच येणार आहे, अशा मानसिकतेत माणूस जमवा जमव करीत असतो. माती, दगड, धोंडे जरी मिळू लागले तरी नको किंवा आता पुरे झाले असे म्हणत नाही. सतत जमवा जमव करणारे बरेच लोक जमवलेल्या वस्तूंचा स्वत: सुध्दा उपभोग घेत नाहीत. विशेष म्हणजे असे लोक घरातल्या लोकांनाही आवश्यक तेवढा उपभोग घेऊ देत नाहीत. राहू दया उदया लागेल, परवा लागेल असे म्हणत असतात.असे असले तरीही संसारात असणारे संत सेनाजींसारखे संत, महात्मे नाशवंत, भौतिक जमवाजमवीच्या भानगडीत पडत नाहीत. त्यांना सोने, चांदी, पैसा, सत्ता तर सोडाच; पण त्यांच्या,



**सेना म्हणे याविण काही । मोक्ष मुक्ती चाड नाही ।।,**

या म्हणण्याप्रमाणे मोक्ष, मुक्तीसुध्दा नको असते. नलगे मुक्ती धन संपदा । संत संग देई सदा ।।, असे तुकाराम महाराजांनीही म्हटले आहे. आपल्या वाट्याला आलेले कार्य नि:स्वार्थ भावाने पांडूरंगाची सेवा समजून त्याच्या नामघोषात पार पाडण्यात ते आनंदी असतात. अशा निर्भेळ आनंदाची प्रचिती येणारा किती भाग्यवंत असेल हे शब्दात सांगता येण्यासारखे नाही. **अगा तयांचिया ज्ञाना । पाठी पोट नाहीं अर्जुना । वायु जैसा गगना । सर्वांगी असे ।।,** अशा ओव्यातून माऊलींनी श्री ज्ञानेश्वरीमध्ये श्रीकृष्णांनी अर्जुनाला अगा या शब्दाने अनेक वेळा संबोधल्याचा उल्लेख आहे. अगा हा शब्द अत्यंत लडीवाळ भावनेचा आणि नि:स्वार्थ प्रेमाचा संयोग दर्शविणारा आहे. अगा या शब्दाचा वापर श्रीकृष्णांनी अर्जुनासाठी केला, याचा अर्थ वरिष्ठांने कनिष्ठासाठी हा शब्द वापरला असा अर्थ काही लोक काढू शकतात. मात्र जेथे वरीष्ठ आणि कनिष्ठ असा भेद शिल्लक राहत नाही, तेथेही या शब्दाचा वापर होतो आणि अशा ठिकाणीच या शब्दाची खरी महती असते. म्हणूनच सेनाजींनी भेद न जाणणाऱ्या व प्रेमाचे प्रतिक असणाऱ्या पांडूरंगाला, अगा पंढरीनाथा । शरण आलो कृपावंता ।।, अशा प्रकारे अगा म्हणून हाक मारली आहे. अगा म्हणून हाक मारतांना ते शरणांगतीची भाषा विसरले नाहीत. शरणागती हा भक्तीचा आधारस्तंभ असतो. मीपणा जवळ ठेवून केली जाणारी भक्ती फलद्रुप होत नाही. शरणागत भावात मीपणा शिल्लक राहत नाही. आपल्यापैकी अनेकांच्या जीवनात मीपणामुळेच अनेक प्रश्न, अडचणी निर्माण होत असतात. अधिकारवाणीने हाक मारणाऱ्यांकडे किंवा हक्क गाजवणाऱ्यांकडे जर नम्रता आणि नि:स्वार्थ प्रेम असेल तर आई-मुलांप्रमाणे नाते निर्माण होणे कठीण नसते. सासू-सून, वरिष्ठ-कनिष्ठ, श्रीमंत-गरीब यांच्यात असे नाते निर्माण होण्याची गरज आहे. नि:स्वार्थ भाव हा या गरजेच्या पूर्तीसाठी आवश्यक असणाऱ्या नात्याचा आधारस्तंभ आहे, हे लक्षात असावे.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरुवार
दि. २२ ऑगस्ट २०२४
विक्रम संवत् २०८०,
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - श्रावण
कृ. तृतीया (१३.४६)
ऋतु - वसंत
नक्षत्र- उ.भाद्रपदा (२२.०५)
योग - धृति (१३.१०)
करण - बव (२४.१०)
सुर्योदय - ०६.२४
सूर्यास्त - १८.५९
दिनविशेष -
संत बाळूमामा पु.ति. जागर

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३ ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष** : मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ** : आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका.

**मिथुन** : आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क** : मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

**सिंह** : कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

**कन्या** : मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ** : चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक** : सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु** : शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा: पश्चिम. आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील. आळस करू नका.

**मकर** : नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ** : सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन** : आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील.

# राखी पौर्णिमानिमित्त एसटी बसेस फुल्ल

## उत्पन्न वाढले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट -**

राखी पौर्णिमानिमित्त एसटी महामंडळाच्या बसेसमध्ये महिलांची मोठी गर्दी झालेली होती. गावाला जाण्यासाठी तसेच परत येण्यासाठी एसटी बसेस महिलांनी फुल्ल झाल्याचे चित्र दिसून आले. त्यामुळे एसटी महामंडळाच्या उत्पन्नात वाढ झाली.

बहिणींच्या अतूट नात्यांचा सण म्हणजे रक्षाबंधन होय, भावाच्या मनगटावर राखी बांधून सदैव रक्षण करण्याची मागणी करते. भाऊ देखील आपल्या लाडक्या बहिणीसाठी तत्पर राहतो.याच सणाच्या निमित्ताने महिलांची आपल्या माहेरी जाण्यासाठी तसेच माहेरहून परत सासरी येण्यासाठी एसटी महामंडळाच्या बसेसकडे मोर्चा वळवला. अर्ध्या तिकीट काढून महिलांनी तडक भावाचे घर गाठले. राखी पौर्णिमा दिवशी बहीण आपल्या भावाच्या घरी अर्थात माहेरी जातात. त्याठिकाणी रक्षाबंधन सण उत्साहात साजरा केला जातो. राखी बांधून नात्यांतील जिवंतपणा कायम ठेवला जातोय.

दरम्यान राज्य सरकारने एसटी महामंडळाच्या बसेस मधून प्रवास करणाऱ्या महिलांना अर्धे तिकीट योजना सुरू केली आहे. त्यामुळे महिला आणि मुलींनी एसटी महामंडळाच्या बसेसना प्राधान्यक्रम देताना दिसत आहे. योजनेमुळे एसटी बसेस महिलांनी हाऊसफुल्ल केल्याचे चित्र दिसत आहे. सोमवारी रक्षाबंधन सण आटोपून आपल्या माहेरी जाण्यासाठी महिलांची एसटी बसेसला गर्दी दिसून होती. सोलापूर शहर जिल्ह्यातून असंख्य महिलांची मांदियाळी सोलापूर बसस्थानकासह नऊ आगारातील बस स्थानकावर देखील मोठी वर्दळ दिसून आली. यावेळी रक्षाबंधन सणामुळे महिला प्रवाशांची एसटी बसेसकडे वाढती गर्दी लक्षात घेता महामंडळाने देखील काही मार्गावर जादा बसेस सोडण्यात आल्या होत्या. त्या एसटी बसेसचा फायदा महिलांना झाला.



> **एसटीच्या अर्ध्या तिकटीचा फायदा**
>
> रक्षाबंधन सणानिमित्त माहेरी गेले होते. रक्षाबंधन सण उत्साहात साजरा करून परत सासरी जात आहे. एसटी महामंडळातर्फे महिलांना अर्धे तिकीट योजना सुरू करण्यात आल्याने त्यांचा आम्हाला नक्कीच फायदा झाला आहे.
>
> **- अनुसया मेठे, महिला प्रवासी**

# समर्थ तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी साहिल बावळे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट -**

मुरारजी पेठेतील मंगळवेढेकर चाळ येथील श्री समर्थ तरूण मंडळाच्या अध्यक्षपदी साहिल बावळे यांची निवड करण्यात आली. मंडळाच्या गणेशोत्सवाची सर्वसाधारण बैठक आधारस्तंभ अरुण रोडगे यांच्या मार्गदर्शनाखाली भाऊ रोडगे यांच्या अध्यक्षतेखाली मेकॅनिकी चौकातील उदासी मठ येथे पार पडली. या बैठकीत सन २०२४ मधील गणेशोत्सवासाठी पदाधिकारी निवडण्यात आले. यावेळी मावळत्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने सर्व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मंडळाचे मार्गदर्शक अण्णा रोडगे, श्रीकांत पसारे, बापू रोडगे, राजू जगताप, दादू रोडगे, सचिन बावळे, श्रीपाद रोडगे आदी उपस्थित होते. यंदाच्यावर्षी समर्थ तरूण मंडळाच्यावतीने श्रीं ची नविन ११ फुट उंचीची मुर्ती तयार करण्यात आली आहे. या नुतन श्रीं च्या मुर्तीचा आगमन सोहळा ५ सप्टेंबर रोजी मिरवणुकीने साजरा करण्यात येणार आहे. या मिरणुकीम ढोल ताशा पथक, लेझीम पथक, बँन्ड पथक असणार.



**अन्य पदाधिकारी :**
उपाध्यक्ष - सिराज शेख, सचिव - ऋषिकेश कांबळे, खजिनदार - श्रीपाद रणदिवे, मिरवणूक प्रमुख - प्रमोद बबलू माने पूजा प्रमुख - बापू साळुंखे, मनोज सोनार, प्रसिद्धीप्रमुख - मनोज जावळे.



# माध्यमिक व प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन

## महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेकडून वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे माध्यमिक व प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन दिले.

शिक्षक आमदार ज. मो. अभ्यंकर यांच्या आदेशाने राज्य सरचिटणीस रमेशजी चौगुले यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना, सोलापूरच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक तसेच जिल्हाधिकारी यांच्या गैरहजरीत कार्यालयातील कर्मचारी यांच्याकडे शिक्षण विभागातील अनागोंदी कारभारत सुधारणा करण्याच्या मागणीचे निवेदन देवुन निषेध नोंदवून आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष प्रसाद मसरे, विभागीय अध्यक्ष भालचंद्र मोरे, शहराध्यक्ष भारत गुणापुरे, वल्लभ चौगुले, मुरलीधर कडलास्कर, सोमनाथ गायकवाड बिडवे यांच्यासह शिक्षक सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# सोलापूर ग्रामीण पोलिसांची ऑल आऊट तपासणी मोहिम

## २५ ठाण्याच्या हद्दीतील आरोपींच्या घरासमोर पहाटेच पोलिस उभा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट -**



आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलिस दलाच्या २५ पोलिस ठाण्याच्या हद्दीत ग्रामीण पोलिसांनी मंगळवारी पहाटेच्यावेळी ऑल आऊट तपासणी मोहिम राबविली. या मोहिमेत पहाटेच्या सुमारास आरोपींच्या साखर झोपेवेळी दारातच पोलिस हजर झाल्याने आरोपींची चांगलीच दैना उडाली. या मोहिमेत पोलिसांच्या रेकॉर्डवरील हिस्ट्रीशिटर, रेकॉर्डवरील आरोपी, दोन पेक्षा जास्त गुन्हे दाखल आरोपींची तपासणी करण्यात आली.

लवकरच विधानसभा निवडणुकीचा बिगूल वाजण्याची शक्यता आहे. त्यामुळे मालाविषयक व शरीरीविषयक गुन्हे करणारे आरोपींना गुन्हे करण्यापासून परावृत्त करून गुन्ह्यास प्रतिबंध करण्यासाठी मंगळवारी पहाटेच्या सुमारास ही मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेत जिल्ह्यातील २५ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दोन किंवा दोन पेक्षा जास्त गुन्हे दाखल असणारे आरोपी, जामीनावर सुटलेले आरोपी, हिस्ट्रीशिटर्स, सराईत गुन्हेगार अशा सुमारे ४८६ आरोपींची यादीच तयार करण्यात आली होती. या यादीतील सुमारे ३१४ आरोपी हे त्यांच्या घरी साखर झोपेत असलेले मिळून आले. पहाटेच्या साखर झोपेत येऊन पोलिसांनी झोप मोड करून या आरोपींची कसून तपासणी केली व त्यास गुन्हे न करण्याबाबत सक्त ताकीद दिली. या आरोपींवर संबंधित पोलिस ठाण्यामध्ये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. हे ऑल आऊट ऑपरेशन पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलिस अधिक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, संबंधित पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेकडील पोलिस पथके यांनी राबविली.




# सोलापुरात प्रथमच ब्रास गिफ्ट व गिफ्ट शॉपि

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

सोलापुर जिल्हा शहरातील लोकांना ऑनलाईन किंवा पूणे, मुंबई शहराकडे जावून वेगवेगळे गिफ्ट खरेदी करावे लागत होते. जगदंब फॅमिलीने सोलापुरात सुरु केलेल्या गिफ्ट शॉपीचे उद्घाटन महाराष्ट्र ब्युटी केअरच्या अध्यक्षा अनीता कांबळे यांचा हस्ते करण्यात आले. यावेळी भारतीय हिंदराज सेनेचे संस्थापक अध्यक्ष धारासिंह राजपूत, संचालक प्रद्युमनसिंह राजपूत, शाहिर रमेश खाडे, यूसूफ पिरजादे, शफी शेख आदी उपस्थित होते.

# वालचंद महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ ऑगस्ट-**



वालचंद कला व शास्त्र कनिष्ठ महाविद्यालयात २०११-१२ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता ११वी कला शाखेतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा बायोटेक सेमिनार हॉलमध्ये संपन्न झाला. विविध क्षेत्रात कार्यरत असणारे ४५ विद्यार्थी उपस्थित होते.

आकाश कांबळे, रम्या मेरगु, सुधारानी शहापुरे, महेश बुधाराम या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. प्रारंभी उपप्राचार्य अनुप म्हेत्रे यांनी या माजी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयात हार्दिक स्वागत करून महाविद्यालयात राबवणाऱ्या विविध शैक्षणिक व इतर उपक्रमांची उपस्थित विद्यार्थ्यांना माहिती करून दिली. प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांनी या प्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे सभासद होऊन महाविद्यालयाच्या कार्यामध्ये आपला सहभाग असावा, असे मत व्यक्त केले तर या बॅचला शिकवणारे सहशिक्षक अमोल सरवळे, संदीप चेंडकापुरे, कस्तुरे यांनी देखील मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन श्रुती गौड, सुजाता शिंदे, अनिल विटकर, आभार महेश बुधाराम यांनी मानले. कार्यक्रमाचे संयोजन श्रुतिका गौर व महेश बुधाराम यांनी केले. याप्रसंगी पर्यवेक्षक डॉ.जे.बी कस्तुरे, सहकारी शिक्षक अमोल सरवळे, प्रशांत पाटील, शैलेंद्र विठ्ठलदास, तुषार ढोले, विजय वाघमोडे, संदीप कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

# गायक पिरजादे यांचा पुणे येथे सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**



एस.पी.ग्रुप सौ. शैला पाटील निर्मित सत्य शिव म्युझिकल इव्हेंट्स प्रस्तुत तराने नये, पुराने या हिंदी-मराठी गितांचा बहारदार कार्यक्रमात सोलापूरचे गायक युसूफ पिरजादे यांनी गाणे गाऊन पुणे येथील कार्यक्रमास उपस्थित रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. याप्रसंगी पिरजादे यांचा अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराजराजे भोसले, अभिनेत्री शैला पाटील, डॉ. जोहरभाई चुनावाला, हरीश तापकीर, अरुण काजूळकर यांचे हस्ते सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात पुणे येथील प्रशांत बोगम, सुमन सोनवणे, विष्णू देवा, साधना पंडीत, अशोक गायकवाड, डॉ. अनिल कुलकर्णी, भिमराव पिंजार, विठ्ठल वैद्य, गायिका सिने अभिनेत्री शैला पाटील, मनिषा गायकवाड, संगीता पाटील, रेश्मा गायकवाड, विना जाधव, सुष्मा वाघ, मनिषा कसबे, स्वाती राजेमहाडीक आदी कलाकारांनी हिंदी मराठी गीतांचे सादरीकरण केले. या कार्यक्रमात स्वातंत्र्य दिनानिमित्ताने पोलीस अधिकारी अरविंद पवार, निलेश बनसोडे, आरिफ अत्तार, अखिल राजपूर, आशिक रजपूत या सर्व पोलीस अधिकाऱ्यांना सन्मान चिन्ह पुष्प गुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व रेजमेंट नितीनकुमार रणदिवे यांनी पार पाडले.

# विहिरीत पडलेल्या काळविटाच्या पाडसाला जीवदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

हिरज येथील विहिरीत पडलेल्या काळविटाच्या पाडसाला वन्यजीवप्रेमी डब्ल्यूसीएसच्या सदस्यांनी जीवनदान दिले. पाडसाला विहिरीतून बाहेर काढताच ते ओरडू लागले. पाडसाचा आवाज ऐकून काळविटने दूरवरूनच धावत येत पाडसाला जवळ घेतले.

रविवारी सकाळी हिरज येथील शेतकरी बाळू माळी हे त्यांच्या शेतात आले असता शेजारच्या शेतातील विहिरीतुन एक जोराजोरात ओरडण्याचा आवाज येत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी विहिरीजवळ जाऊन पाहिले असता विहिरीत एक काळविटाचे पाडस पडलेले दिसले. माळी यांनी क्षणाचाही विलंब न करता त्यांनी शेताचे मालक अप्पू पाटील यांना फोन करून सांगितले. अप्पू पाटील यांनी लगेच डब्ल्यूसीएसचे सदस्य सोमानंद डोके यांना फोन करून सांगितले. डोके यांनी सुरेश क्षीरसागर आणि संतोष धाकपाडे यांना घटनास्थळी पाठवले.काळवीटाच्या पाडसाला विहिरीतून बाहेर काढण्यासाठी डब्ल्यूसीएसच्या सदस्यानी सोबत रेस्क्यू किट घेऊन घटनास्थळ गाठले. विहिरीच्या कडेने वाढलेली झाडे आणि गवत कोयत्याच्या साहाय्याने काढून घेतले.



थोडी जागा मोकळी करून सोबत आणलेली दोरी एका झाडाच्या बुंध्याला आवळून घेतली आणि दुसरी बाजू संतोष धाकपाडे, बाळू माळी यांनी घट्ट धरून ठेवली. दोरीचे पहिली बाजू धरून सुरेश क्षीरसागर आणि अमोल जाधव हे विहिरीत उतरले. सुरेश क्षीरसागर आणि अमोल जाधव विहिरीत असलेल्या कट्ट्यावर उतरले. एक बाजूने क्षीरसागर आणि दुसऱ्या बाजूने जाधव हळूहळू पुढे त्या पाडसाच्या जवळ जाऊ लागले. पण पाडसाने घाबरून पाण्यामध्ये उडी घेतली. या संधीचा फायदा घेऊन सुरेश क्षीरसागर यांनी देखील पाण्यामध्ये उडी घेतली. ते पाडस पाण्यामध्ये गेल्यामुळे सुरेश क्षीरसागर यांना त्या पाडसाला पकडणे सोपे झाले. पाडसाला पकडल्यावर विहिरीतच क्षीरसागर यांनी त्या पाडसाला सोबत आणलेले लिंबू पिळून पाजले आणि ते पाडस तणावात जाऊ नये म्हणून डोळ्यावरती रुमाल बांधून आपल्या कडेवर घेऊन विहिरीच्या वरती आणले.

विहिरीच्या वरती आल्यानंतर ते पाडस जोरात ओरडू लागले व निसटण्याचा प्रयत्न करू लागला. डब्ल्यूसीएसचे सदस्यांनी त्या पडसाला वरती आल्यावरती अजून एक लिंबू पिळून पाजले. लिंबू पिळून पाजल्यानंतर त्या पाडसाला कुठे लागले का याची पाहणी केली. ते पाडस तंदुरुस्त असल्यामुळे लगेचच त्याला निसर्गात मुक्त करण्याचे ठरविले. त्या पाडसाचा हंबरडा फोडण्याचा आवाज ऐकल्यामुळे पाडसाच्या आईची ममता जागृत झाली अन् ती बाजूलाच असलेल्या ऊसाच्या शेतातून धावत बाहेर आली, आणि आपल्या पिल्लाला सोबत घेऊन गेली. हे दृश्य पाहून उपस्थितांच्या डोळ्याचे पारणे फिटले. एका वन्यजीवाच्या पिल्लाला त्याच्या आईसोबत पुनर्भेट करून दिल्याचा मनस्वी आनंद डब्ल्यूसीएसच्या सदस्यांना झाला होता.

या बचाव कार्यात सुरेश क्षीररसागर, संतोष धाकपाडे, अमोल जाधव, बाळू माळी, तम्मा पाटील, गोपाळ माळी, प्रतीक माळी, प्रज्वल माळी, प्रणव माळी, प्रवीण माळी आर्दीनी सहभाग नोंदविला.

# महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाचा स्वातंत्र्यदिन सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जरा चंडक प्रशाला इंदिरा प्रशाला तसेच राजीव प्राथमिक शाळा शरद बालक मंदिर यांचे संयुक्त विद्यमाने ७८वा स्वातंत्र्य दिन सोहळा साजरा करण्यात आला. या स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष सचिन भैय्या ठोकळ, संचालक किशोर काका पाटील, माजी नगरसेविका मंदाकिनी तोडकरी, नगरसेवक गणेश पुजारी, संस्थेच्या सचिवा शिल्पाताई ठोकळ यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले.



यावेळी प्रशालेतील माजी विद्यार्थी तथा पोलीस उपनिरीक्षक म्हणून नियुक्त झालेले संकेत उमाकांत शिंदे व राष्ट्रीय खेळाडू श्रावणी प्रताप सूर्यवंशी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी स्काऊट गाईडच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी संचलन करून ध्वजाला सलामी दिली. अनेक विद्यार्थ्यांनी मराठी हिंदी इंग्रजी भाषांमध्ये देशभक्तीपर भावना व्यक्त केल्या. यावेळी विद्यार्थिनींनी स्वातंत्र्य च्या गीतावर तिरंगा वेशभूषेत नृत्य सादरीकरण करण्यात आले. शेवटी विद्यार्थ्यांना मिठाई वाटप करण्यात आली. कार्यक्रमास प्राचार्य मोहनराव घोडके मुख्याध्यापिका महादेवी तानवडे मुख्याध्यापक शिवाजी आतकरेस यांनी या सोहळ्याचे कौतुक करत होते. सूत्रसंचालन मुननोळी तर पुजारी यांनी आभार मानले.

## संक्षिप्त वृत्त



### एचडीएफसी बँकेतील अधिकाऱ्यांनी स्वीकारले विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

एचडीएफसी बँकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी भवानी पेठेतील महानगरपालिका मुलांची मराठी शाळा क्रमांक २९ मधील सर्व मुलांना वर्षभराचे शालेय साहित्य देऊन शैक्षणिक पालकत्व घेतले.गेल्या तीन वर्षापासून एचडीएफसी बँकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून वर्षभर पुरेल इतके शैक्षणिक साहित्य देण्यात येते. यावर्षीपासून भारत टॅलेंट सर्च (बीटीएस) या परीक्षेसाठी या बँककडून १२ विद्यार्थ्यांना बसविण्यात आले. यातील एक विद्यार्थी गुणवत्ता यादीत आल्यास शाळेला प्रोजेक्टर भेट देणार असल्याचे आश्वासन दिले.



### भारतीय जैन संघटनेच्या वतीने प्रभाकर वनकुद्रे यांचा सन्मान

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

जैन कासार समाजातील ज्येष्ठ व्यक्तिमत्व सोलापूरचा बुलंद आवाज समजले जाणारे प्रभाकर वनकुद्रे यांना जैन कासार विकास प्रतिष्ठानच्या वतीने जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल त्यांचा भारतीय जैन संघटना व अतिशय क्षेत्र १००८ श्री चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिर समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला भारतीय जैन संघटनेचे श्याम पाटील, मंदिर समितीचे वालचंद पाटील, भारतीय जैन संघटनेचे विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन विभुते, जिल्हा उपाध्यक्ष विक्रांत बशेट्टी, चेतन वनकुद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संजय गडदे, ज्योती विभूते, अर्चना शहा तसेच भारतीय जैन संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.



### महापालिकेच्या वतीने माजी पंतप्रधान राजीव गांधी यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंती दिनानिमित्त कॉन्सिल हॉल येथील कार्यालयामध्ये माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेस सहाय्यक आयुक्त ज्योती भगत-पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर, पशुवैद्यकीय अधिकारी सतीश चौगुले, राहुल मोहाडे, सचिन कांबळे,चंदनसिंह पवार,दयानंद कांबळे, अनुप्रिया शिवशरण, अ.रहमान पटेल, शंकर सुर्वे सिद्धू , तिमिगार,अशोक खडके आदी मान्यवर उपस्थित होते.




### ग्रंथालय शास्त्राचे ध्यासपर्व म्हणजे एस. रंगनाथन : डॉ. श्रीकांत कामतकर

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

ग्रंथालय शास्त्राचे जनक म्हणून ज्यांचा नावलौकिक होता, ते पद्मश्री डॉ. एस.आर.रंगनाथन हे ग्रंथालय शास्त्राचे ध्यासपर्व होते. ग्रंथालयांच्या शास्त्रशुध्दी- करणासाठी आणि पुस्तकांच्या वर्गासाठी तसेच द्वीवर्ग, ग्रंथालय शास्त्राची पंचसूत्री, तयार केली. या महत्त्वाच्या योगदानासाठी रंगनाथन यांना आपला देश कधीही विसरु शकत नाही. अशी माहिती श्री. हिराचंद नेमचंद वाचनालयाचे उपाध्यक्ष डॉ श्रीकांत कामतकर यांनी दिली. श्री हिराचंद नेमचंद वाचनालयात ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. रंगनाथन यांच्या १३२ व्या जयंती आणि ग्रंथपाल- दिना निमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यावेळी वाचनालयाचे डॉ.कामतकर बोलत होते.या प्रसंगी वाचनालयाच्या प्रमुख कार्यवाह नभा काकडे, ग्रंथपाल दत्ता मोरे, यांनीही रंगनाथन बद्दल मनोगत व्यक्त केले. यावेळी माधुरी करंटे सहाय्यक ग्रंथपाल, मुदूला फडतरे-देशमुख, प्रभा पाटील, सुधीर कुलकर्णी, जगदीश इमडशेट्टी, सुचेता फडके, यांच्यासह वाचनालयाचे कर्मचारी अभ्यासिकेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये वृक्षांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा

**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये वृक्षांना राखी बांधून संरक्षण, संवर्धनाची शपथ घेण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तूरे होते तर प्रमूख अतिथी प्रशालेचे पर्यवेक्षक रमेश दिंडूरे, धरेप्पा हत्तूरे हे होते. यावेळी विदयार्थिनीच्या हस्ते वृक्षांना राखी बांधून रक्षाबंधनचा कार्यकम संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष वैजिनाथ हत्तूर यांनी आपल्या मार्गदर्शनात वृक्ष लागवडीचे महत्त्व सांगून प्रत्येकाने एक पेड धरती माँ के नाम या उपक्रमात सहभाग घेऊन प्रत्येक विद्यार्थ्याने एक रोप लावावे व त्याची प्रेमाने जोपासना करावी असे आवाहन केले. यावेळी सविता कुलकर्णी, सुकेशनी गंगोडा, अनिल कुमार गावडे, प्रा.लक्ष्मीकांत पनशेट्टी तसेच प्रशोलेतील शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

# अडीच हजार शेतकऱ्यांना कृषी योजनेंतर्गत लॉटरी

## जिल्हा परिषद कृषी विभाग; तीन कोटींच्या अवजारांची सोडत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

जिल्हा परिषद सेस कृषी योजनेंतर्गत तालुकानिहाय २,४५१ लाभार्थ्यांची निवड सोडत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नेहरूनगर (ता. उत्तर सोलापूर) येथील विद्यार्थ्यांमार्फत लॉटरी पद्धतीने निवड करण्यात आली.

कृषी विभागाकडील तीन कोटी पंधरा लाख रुपयांच्या विविध अवजारांसाठी ५० टक्के निधी अनुदान शेतकऱ्यांना उपलब्ध करण्यासाठी लॉटरीद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा निरीक्षक गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ व महेश पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले. सुरुवातीला कृषी विकास अधिकारी नंदकुमार पाचकुडवे यांनी जिल्हाभरातून प्राप्त अर्ज, उद्दिष्ट व लॉटरी निवड सोडत प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांना व उपस्थितांना




मार्गदर्शन केले. त्यामध्ये सर्वप्रथम दिव्यांग व महिला महिला शेतकऱ्यांची पाच टक्क्याप्रमाणे १२२ सोडत काढण्यात आली. नंतर २,४५१ सर्वसाधारण लाभार्थ्यांची निवड जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या सभागृहात करण्यात आली. यासाठी जिल्हा कृषी अधिकारी सागर बारवकर, मोहीम अधिकारी अशोक मोरे, सहाय्यक प्रशासन अधिकारी विवेक लिंगराज, योजना सहाय्यक राजश्री कांगरे, कार्यालयीन अधीक्षक उमाकांत कोळी, रोहित शिंदे, महानंदा कुंभार, वर्षा अवधूर्ती यांनी परिश्रम घेतले. या सोडतीमध्ये अक्कलकोट ८०२ अर्जातून २१३, बार्शी १९९३-२१०, करमाळा २१६०-१९५, माढा १७०२-२३४, माळशिरस १८४५-३१९, मंगळवेढा १००९-१८६, मोहोळ ९४२-२२१, उत्तर सोलापूर ५५७-१४२, पंढरपूर १९४०-२५९, सांगोला १८९३-२५३, दक्षिण सोलापूर १०४३-२१९ अशा एकूण १५,८८६ प्राप्त अर्जातून १४ अवजारे व साहित्य योजनेतील २,४५१ लाभार्थ्यांची व उर्वरित प्रतीक्षाक्रमवारी लॉटरी पद्धतीने शेतीसाठी विविध अवजारे, पूरक यंत्रणा अनुदान देण्यासाठी निवड करण्यात आली. अत्यंत पारदर्शकतेन शेतकऱ्यांच्या उपस्थितीत ही लॉटरी सोडत काढल्याने शेतकरी वर्गानी समाधान व्यक्त केले. या लॉटरी सोडतीसाठी तालुक्यातील कृषी अधिकारी व विस्तार अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना अर्जांच्या बाबतीत मार्गदर्शन व लॉटरीसाठी मोलाचे सहकार्य केले. लॉटरीसाठी जिल्ह्यातून माहिती संकलन विस्ताराधिकारी सचिन चव्हाण, अंबिका वाघमोडे, हरूनपाशा नदाफ, मिथुन भिसे, मल्लिकार्जुन स्वामी, ओमप्रकाश कोकणे, लक्ष्मण वंजारी यांनी संकलन केले. लॉटरीसाठी प्राथमिक शाळा नेहरूनगर येथील उपशिक्षक अनिल थोरबोले यांचे सहकार्य लाभले.



### २१ सप्टेंबरपर्यंत पावती सादर करा

पूर्व संमती नंतर २१ दिवसांच्या आत म्हणजे २० सप्टेंबरपर्यंत खरेदी पावती संबंधित पंचायत समिती कृषी विभागाकडे सादर करून अनुदान घेण्याची प्रक्रिया लवकर करावे, असे आवाहन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी याप्रसंगी शेतकऱ्यांना केले.



# पुराणात हेमरड्डी मल्लम्मांचा विवाह सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ ऑगस्ट-**

येथील कुंभार गल्लीतील श्रीशैल पीठाचे श्री. शांतलिंगेश्वर हिरेमठाच्या वतीने मठाधिपती श्रीषब्र जयगुरुशांतलिंगराध्य शिवाचार्य महास्वामी यांच्या दिव्य सानिध्यात श्रावणमासनिमित्ताने आयोजित महासाध्वी हेमरड्डी मल्लम्मा यांच्या चरित्रावरील पुराणाच्या सोहळ्यात रविवारी रात्री नऊच्या सुमारास हेमरड्डी मल्लम्मांचा पौराणिक पद्धतीने विवाह सोहळा पार पडला.

रात्री साडेनऊच्या सुमारास श्री रेणुकाचार्य अक्कन बळगच्या मुख्य गायिका शिवम्मा स्वामी, गंगाबाई स्वामी व सहकाऱ्यांच्या गीताने हळदीचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर पौरोहित्य गुन्नय्या स्वामी व गिरीश शास्त्री यांच्या विधिवत धार्मिक पूजा, वेदमंत्रोच्चारात दोन मंगलाष्टके म्हणून कन्यादानाचा मान असलेले गुरप्पा व जयश्री कुंभार दाम्प्त्यानी हेमरड्डी मल्लम्मांचे कन्यादान केले तर वर पक्षाचे मान घेतलेल्या चिदानंद व भागीरथी कुंभार यांच्या समवेत आणि यावेळी मंगलमय वातावरणात उपस्थित शेकडो भाविकांनी अक्षता टाकल्या. शेवटची मंगलाष्टकग संपताच टाळ्यांच्या कडकडाटात महासाध्वी हेमरड्डी मल्लम्मा यांचा जयजयकार करण्यात आला.

प्रारंभी पुराणिक जगदिश्वरय्या यांनी विविध प्रकारच्या विवाह पद्धतीचे महत्त्व सांगितले. यावेळी श्री जयगुरु शांतलिंगराध्य शिवाचार्य महास्वामी यांचे आशिर्वचन झाले. लोकमान्य सुपर बझारचे संचालक सिध्दाराम टाके परिवाराच्या वतीने महाप्रसाद वाटप करण्यात आला. सूत्रसंचालन तात्यासाहेब समाणे व कल्लप्पा सोमेश्वर यांनी केले. यावेळी प्रसिद्ध व्यापारी सूर्यकांत बिराजदार, इरण्णा पाटील, शरणप्पा कुंभार, शिवानंद कुंभार, चिदानंद कुंभार, विरशैव महिला मंडळाच्या सदस्या राजेश्वरी हौदे, मल्लम्मा सोमेश्वर, चंद्रकला हत्ते, भारती कडबगांवकर, बसम्मा स्वामी, सुशीलाबाई स्वामी, मल्लिनाथ कुंभार, भीमाशंकर करकी, बाबुराव बिराजदार, नंदकुमार कुंभार, शाणप्पा कुंभार सहभागी झाले होते.

# सोलापूरकरांनी जाणून घेतला मोहोळचा इतिहास

## इंटॅक संस्थेचा मोहोळ वारसा फेरीचा अभिनव उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २१ ऑगस्ट-**

वडवळचे नागनाथ मंदिर, दुर्मिळ श्रीकृष्ण मंदिर, खर्गतीर्थ, मुंगीचा धोंडा, शिरापूर येथे राजे पांढरे यांचे चिरेबंदी वाडे, स्मृती स्थळे, मोहोळमधे प्राचीन चंद्रमौळी गणपती,औरंगाबाद यांचे गुप्त हेर खात्याचे प्रमुख राजे भास्कर यांची समाधी, यादवकालीन नीलकंठेश्वर मंदीर ,कोरीव कलाकुसरीचे व पाठीमागे तीन मुर्तीमंडपाचे भानेश्वर मंदिर, उत्तरेश्वर व भव्य नागनाथ मंदिर आदी ऐतिहासिक स्थळे पाहून सोलापूरकर पुरते भारावून गेले. निमित्त होते इंटॅक सोलापूर ने आयोजित केलेल्या मोहोळ तालुक्यातील ऐतिहासिक वारसा सहलीचे.

इंटॅक सोलापूर शाखेच्या वतीने बीबी दारफळ, शिरापूर, वडवळ,मोहोळ या गावांचा इतिहास जाणून घेण्यासाठी मोहोळ वारसा फेरी आयोजित करण्यात आली होती. वारसा फेरीचा प्रारंभ बीबी दारफळ येथील यादव काळातील दोन महादेव मंदिरातून झाली. तेथील राजा सिंघण देवाचा शिलालेख व वास्तुकलेची माहिती वारसा प्रेमींनी घेतली. या फेरीत ८१ वर्षीय



ज्येष्ठ नागरीक ते ५ वर्षीय बालकांपर्यंत ४० जण उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. सोलापूरचे प्रसिद्ध खाद्यपदार्थांचा आस्वाद मंडळींनी घेतला. या अभ्यास सहलीचे नियोजन नितीन अणवेकर, आशिष मोरे,विकास शिंदे यांनी केले तर इंटॅक समन्वयक डॉ सिमंतीनी चाफळकर, नितीन अणवेकर, डॅा सोनाली गिरी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी श्वेता कोठावळे, पुष्पांजली काटीकर, रेवती डिंगरे, मोनिका दोशी, शोभा श्रीवास्तव, सुमित्रा वाघमारे, श्रीनिवास येले, योगेश जक्कल, काशिनाथ वाघमारे, सागर धानोरे, सिद्धांर्थ बिंदगे, हेमंत कपुरे, डॉ. संध्या रघोजी, शेकप्पा गाजूल, दत्तात्रय हुच्चे, सुनील शिंदे, विवेक पोतदार, तिप्पया स्वामी, प्रविण इंदापुरे, विलास माळी उपस्थित होते.

# विजेच्या धक्क्याने औषध विक्रेत्याचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २१ ऑगस्ट-**

विजेचा शॉक लागून औषध विक्रेत्या तरुणाचा उपचारापूर्वीच दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सोमवारी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास महात्मा फुले चौकातील गाळ्यात घडली. सुधीर अरविंद येलपले (वय-३५) रा.सांगोला असे मरण पावलेल्या तरुणाचे नाव आहे.सुधीर येलपले याच्या आकस्मित अपघाती निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. सुधीर येलपले यांचे महात्मा फुले चौक येथे औषध दुकान आहे. सोमवारी सांगोला शहर परिसरात मुसळधार पाऊस सुरू होता.त्यात रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास पावसाने वीजही गेली होती. दरम्यान, सुधीर येलपले हे सोमवार दि.१९ रोजी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास दुकानातील इन्व्हर्टर बॅटरी काढत असताना वीजेचा शॉक लागल्याने त्यांचा उपचारापूर्वीच दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.



# सुट्टे पैसे घेण्याच्या बहाण्याने दुकानातून दीड लाखांची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २१ ऑगस्ट-**

सुट्टे पैसे देऊन पाचशेची नोट द्या, म्हणत एका चोरट्याने हात चलाखी करीत काऊंटरच्या गल्ल्यातून दीड लाखांची रोख रक्कम हातोहात लांबविली. ही खळबळजनक घटना टेंभूर्णी येथील अकलूज चौकातील हिंदुस्थान इलेक्ट्रिक दुकानात सोमवारी (दि.१९) सकाळी साडेआठच्या सुमारास घडली.

याबाबत अधिक माहिती अशी, टेंभुर्णीत अकलूज चौक येथे इलेक्ट्रॉनिकचे दुकान आहे. नेहमीप्रमाणे अभिजित दत्तात्रय जगताप (वय २८, रा. सुर्ली, ता. माढा) या दुकानाच्या मालकाने सोमवारी सकाळी ८ वाजता दुकान उघडले. यानंतर तो यश कुटे या दुकानातील कर्मचाऱ्यास घरी काम असल्याचे सांगून घरी निघून गेला. त्यानंतर थोड्या वेळात ८.३० च्या सुमारास हेल्मेट घातलेला एक तरुण दुकानात आला व त्याने शंभर रुपयांच्या नोटा देऊन पाचशे रुपयांची नोट मागितली. ती दिल्यानंतर नंतर त्याने आणखी किती पैसे आहेत, असे म्हणत दोनशे रुपयांच्या नोटा काऊंटरवर ठेवल्या. त्या फॅनमुळे उडून दुकानात पसरल्या. कुटे हा त्या नोटा गोळा करू लागला. या संधीचा फायदा घेऊन चोरट्याने गल्ल्यातील दीड लाख रुपयांची रक्कम घेऊन पोबारा केला. ही घटना अवघ्या दहा मिनिटात घडली. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. या रकमेमध्ये पाचशे, दोनशे व शंभर रुपयाच्या नोटा होत्या. यानंतर तो बिगर नंबरच्या मोटारसायकल वरून पसार झाला. ऐन रक्षाबंधन सणाच्या दिवशी दिवसा-ढवळ्या घडलेल्या या घटनेने व्यापारी वर्गात खळबळ उडाली आहे. याबाबत टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# पंचायत समितीत अधिकारी येईनात, कामे होईना

## माळशिरसमधील प्रकार; नागरिकांना नाहक त्रास, लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २१ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील पंचायत समितीची मुदत संपून दोन-तीन वर्ष होत आली आहेत. यावर सध्या प्रशासकीय राजवट आहे. यामुळे अधिकाऱ्यांची प्रचंड मनमानी सुरु असून याठिकाणी अनेक अधिकारी पंचायत समिती कार्यालयाकडे फिरकतच नाहीत. यामुळे तालुक्यातील विविध गावांतून कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना आपल्या कामासाठी दिवस दिवस ताटकळत बसावे लागत आहे.

अनेकदा नागरिकांना हेलपाटे मारावे लागत आहेत. या पंचायत समितीत तर २२ सदस्य आहेत. पण मुदत संपल्यामुळे व प्रशासकीय राजवट असल्याने ते सदस्य पंचायत समीतीकडे फिरकतच नाहीत. तसेच जिल्हा परिषद सदस्यांचीही मुदत संपली आहे., त्यामुळे तेही पंचायत समितीकडे फिरकतच नाहीत. याचाच फायदा अधिकारीसुद्धा घेत आहेत. या ठिकाणी असणारे गटविकास अधिकारी विनायक गुळवे हे सेवानिवृत्त झाले, तेव्हापासून गटविकास अधिकारीपदाचा पदभार करमाळ्याचे गटविकास अधिकारी मनोज राऊत यांच्याकडे आहे. ते या ठिकाणी आठवड्यातून फक्त दोनवेळा येतात. खरे पण ते कधी येतात, कधी जातात हे तालुक्यातील नागरिकांना अजिबात माहित होत नाहीत. यामुळे गावगाड्यातील विकासकामे अक्षरशः ठप्प झाली आहेत. तालुक्यातील रोजगार हमी, अहिल्यादेवी सिंचन विहीर योजना, प्रधानमंत्री आवास योजना, जलजीवन मिशन अंतर्गत कामे, झालेल्या कामांची प्रत्यक्षात पाहणी करुन बिल देणे अशी कामे सध्या तालुक्यात ठप्प झाली आहेत. प्रशासकीय राजवट असल्याने वेळेवर कामे होत नसल्याने नागरिकांतून संताप व्यक्त केला जात आहे.

### जि. प., पं. स.च्या निवडणुका घ्या

रोजगार हमी योजनेतील तसेच अहिल्यादेवी सिंचन विहीर योजनेची शेतकऱ्यांची बिले अनेक दिवसांपासून पेंडिंग आहेत. लोकप्रतिनिधी नसल्यामुळे अधिकाऱ्यांचे चांगलेच फावत असून शासनाने ताबडतोब जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका घेऊन लोकप्रतिनिधींच्या नेतृत्वाखाली पंचायत समितीचा कारभार आल्याशिवाय सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळणार नाही. याठिकाणी शासनाने कायमस्वरूपी गटविकास अधिकाऱ्यांची ताबडतोब नेमणूक करुन सर्वसामान्यांना दिलासा देण्याची मागणी होत आहे.

# बल्करच्या धडकेत युवक ठार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ ऑगस्ट-**

अक्लककोट ते गुलबर्गा रोडवर वागदरी पुलापासून काही अंतरावर स्पीड ब्रेकरच्या पलीकडे २० ऑगस्ट रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास एक २४ वर्षीय तरूण रस्ता ओलांडत असताना बल्करच्या धडकेत मयत झाला.

मोहम्मद रेहान मोहम्मद रफिक आत्तार, (वय २४, रा. मालघत्ती क्रॉस, गुलबर्गा कर्नाटक असे मयताचे नाव आहे. अक्कलकोट उत्तर पोलीस ठाणे मध्ये ३७५/२०२४ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०६ (१), २८१, १२५ (अ), (ब), मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १८३,१८४ प्रमाणे बल्कर (क्र. एम. एच. १२/ डब्ल्यू. जे. ६८०४) चा चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल झाला. फिर्याद मयताचा मित्र रियाज नबी सय्यद (वय २३, रा. सोनिया गांधी कॉलनी, गुलबर्गा, कर्नाटक यांनी दिले.

२० ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी सातच्या सुमारास अक्लककोट ते गुलबर्गा रोडवर वागदरी ब्रिजपासून काही अंतरावर स्पीड ब्रेकच्या पलीकडे फिर्यादीचा मित्र मोहम्मद रेहान मोहम्मद रफिक आत्तार हा रस्ता ओलांडत असताना वागदरीहून अक्कलकोटकडे येणारे बल्कर (क्र. एम. एच. १२/ डब्ल्यू. जे. ६८०४) चालकाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बल्कर भरधाव वेगान चालवून तरूणास धडक देऊन गंभीर जखमी करुन त्याच्या मरणास कारणीभूत झाला. अधिक तपास पोसई पंडीत चव्हाण करीत आहेत.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## बुद्धेहाळ तलावात शुक्रवारपासून टेंभूचे आवर्तन

### आ. शहाजीबापू पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २१ ऑगस्ट-**

शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेवून टेंभू योजनेतून पाण्याचे आवर्तन सुरू करण्यात आले आहे. शुक्रवार दि.२३ ऑगस्ट रोजी कोळा नाला येथून टेंभू योजनेचे पाणी बुद्धेहाळ तलावात सोडण्यात येणार असून तलाव पूर्ण क्षमतेने भरून घेण्यात येणार असल्याची माहिती आ.शहाजीबापू पाटील यांनी दिली.

खरीप हंगामातील पिकांना जीवदान देण्यासाठी टेंभू योजनेचे आवर्तन सुरू करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली होती.आ.शहाजीबापू पाटील यांनी शेतकऱ्यांच्या मागणीची दखल घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस,टेंभू उपसा सिंचन योजनेचे कार्यकारी अभियंता राजन रेड्डीयार यांच्याकडे टेंभूचे आवर्तन सुरू करण्याची मागणी केली होती.या मागणीची दखल घेत टेंभू योजनेचे आवर्तन सुरू करून माण नदीवरील बलवडी ते मेथवडे पर्यंतचे सर्व बंधाऱ्यात पाणी सोडण्यात आले आहे.शुक्रवार दि.२३ ऑगस्ट रोजी टेंभू योजनेचे पाणी कोळा नाला येथून बुद्धेहाळ तलावात सोडण्यात येणार असून तलाव पूर्ण क्षमतेने भरून घेण्यात येणार असल्याची माहिती आ. शहाजीबापू पाटील यांनी दिली.तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर बुद्धेहाळ तलावाच्या लाभक्षेत्रातील हजारो हेक्टर शेतीला लाभ होणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### वैरागच्या संतनाथ यात्रेतील कुस्ती आखाड्यात माऊली कोकाटे ठरला क्रांतीसूर्य किताबाचा मानकरी

**वैराग, दि. २१ ऑगस्ट-**

श्री संतनाथ महाराज यात्रेनिमित्त आयोजित तिन्ही कुस्त्यांच्या आखाड्यात राष्ट्रीय स्तरावरील कुस्तीपटूंनी सहभाग घेत कुस्तीचे मैदान गाजवले.उप महाराष्ट्र केसरी पैलवान माऊली कोकाटे विरुद्ध महाराष्ट्र केसरी पैलवान हर्षद सदगीर यांच्यात चुरशीची लढत लक्षवेधी ठरली. यामध्ये पै. माऊली कोकाटे प्रतिस्पर्धाल्या चितपट करून क्रांतिसुर्य किताबाचा मानकरी ठरला. तीन लाख रुपये व चांदीची गदा देवून कोकाटेंचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. क्रांतिसूर्य केसरी कुस्ती मैदानाचे उद्घाटन आमदार राजेंद्र राऊत , प्रशांत परिचारक, विजयकुमार देशमुख, माजी आमदार धनाजी साठे व माजी जिल्हा परिषद सदस्य संतोष निंबाळकर या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी चेअरमन रणविर राऊत, नगरसेवक शाहूराजे निंबाळकर, वैजिनाथ आदमाने, बाबासाहेब रड्डी, मोहन घोडके, रमेश पाटील, केशव घोगरे, विलास रेणके, अरुण कापसे आदी मान्यवर उपस्थित होते. नाना धायगुडे, ज्ञानेश्वर माने, जिन्नस उमाप, संदीप गुंजाळ, संदीप पालकर, अजित मुळे , महेश गुंजाळ , भाऊसो जाधव यांनी यावेळी परिश्रम घेतले. तर पंच म्हणून महाराष्ट्र केसरी समाधान घोडके, आसलम काझी, गोविंद पवार, संजय तनपुरे यांनी काम पाहिले.



### बार्शीतील बँक कर्मचारी समन्वय समितीचे खा. ओमराजे निंबाळकर यांना निवेदन

**बार्शी, दि. २१ ऑगस्ट-**

बार्शी शहरामध्ये तहसील कार्यालयात खासदार ओमराजे निंबाळकर यांची भेट घेऊन बँक कर्मचारी समन्वय समिती बार्शीच्यावतीने निवेदन देण्यात आले. अपुरी कर्मचारी संख्या, विविध प्रकारच्या शासकीय योजनांची बँकांमार्फत होणारी अंमलबजावणी, त्याचा कर्मचाऱ्यावर पडणारा ताण, स्टाफवर होणारे हल्ले, सुरक्षेचा प्रश्न, सध्या लाडकी बहीण योजना राबवत असताना निर्माण होत असलेले प्रश्न इत्यादी विषयांचा त्यात समावेश केला होता. यावर प्रतिक्रिया देताना बँकांमधील होणारी तुटपुंजी नियुक्ती आणि बँकावरचा ताण ही अत्यंत गंभीर बाब असून यावर वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांच्याशी यापूर्वीही चर्चा झाली असून अजूनही तो विषय लावून धरणार आहोत. त्याचबरोबर संघटना म्हणून तुम्ही पण तीव्र आंदोलनाचा पवित्रा घ्या त्याला आमचा पाठिंबा असेल, यावर आपण मिळून नक्की तोडगा काढू. या शब्दात त्यांनी आश्वासन दिले . यावेळी समन्वय समितीचे अध्यक्ष कॉ. राहुल मांजरे, सचिव कॉ. सरिता कुलकर्णी आणि अनेक अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.



### श्री महादेव विद्या मंदिरच्या विद्यार्थिनींनी वृक्षांची रक्षा करण्यासाठी झाडांनाच बांधली राखी!

**अक्कलकोट, दि. २१ ऑगस्ट-**

अक्कलकोट तालक्यातील श्री महादेव विद्या मंदिर बोरगाव (दे.)येथील विद्यार्थिनींनी शाळेच्या परिसरातील पिंपळाच्या झाडाला राखी बांधून निसर्ग प्रेम जोपासले. श्री महादेव विद्या मंदिर प्रशालेच्या विद्यार्थिनींनी अनोख्या पद्धतीने निसर्ग रक्षणासाठी वृक्षसवंर्धन हा उद्देश डोळ्यासमोर ठेवत झाडांना राख्या बांधल्या. लोकपरंपरा आणि आपला सांस्कृतिक वारसा जपणे हे प्रत्येक मानवी संस्कृती जपणारे नागरिकांचे कर्तव्य आहे. असाच हा एक उत्सव रक्षाबंधन (राखी) आहे. मोठ्या आनंदाने बहीण ही भावाला ओवाळणी घालून रक्षाबंधन बांधून रक्षा करावी अशी मनोकामना करते. हा दृष्टांत ठेवून श्री महादेव विद्या मंदिर बोरगाव दे येथील इयत्ता पाचवीच्या सर्व विद्यार्थ्यांनी झाडांची म्हणजे वृक्षांची रक्षा करण्यासाठी रक्षाबंधने बांधली. वृक्षांची संवर्धन करावी, झाडे लावावी-झाडे जगवावी, वृक्षांची कत्तली होणार नाही. असेही याप्रसंगी सांगण्यात आले. या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष राम देशेट्टी, सचिव प्रा. दत्तात्रय फुलारी व विश्वस्थानी कौतुक केले. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक प्रभाकर बंदिछोडे, रशीद पठाण, संजीवकुमार हत्तरके, विजयकुमार चव्हाण, अमोल फुलारी, आनंदकुमार सुतके,अनिल देशेट्टी, दत्तात्रय मोरे, दरेप्पा बिराजदार व विद्यार्थी उपस्थित होते.

# सुरक्षा द्या सुरक्षा...नको पंधराशेची भीक्षा...

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ ऑगस्ट-**

**बदलापूर येथे घडलेल्या अमानवी कृत्याचा निषेध करत नराधमाला फाशीची देण्याच्या मागणीसाठी सोलापूर जिल्ह्यातील विरोधी पक्षांच्या महिला सदस्यांसह सर्वसामान्य रणरागिणी संताप व्यक्त करत रस्त्यावर उतरल्या. सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. रस्ता रोको, आंदोलने करत निवेदन दिले. 'नको पंधराशेची भीक्षा... आम्हाला द्या सुरक्षा' असे म्हणत शासन आणि प्रशासनाकडे दाद मागितली. आता शासन काय निर्णय घेणार, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.**

**बदलापूर येथील घटनेचा सोलापूर जिल्ह्यात तीव्र पडसाद; विरोधी पक्षांच्या महिलांसह सर्वसामान्य रणरागिणी रस्त्यावर, रस्ता रोको, घोषणाबाजीने व्यक्त केला निषेध**

## नराधमाला फाशीची शिक्षा द्या; माढ्यात प्रशासनाला निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २१ ऑगस्ट-**

बदलापूर येथे बालवाडीत शिकत असलेल्या चार वर्षाच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधमाला फाशीची शिक्षा व्हावी तसेच या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी माढ्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून विविध राजकीय पक्ष सामाजिक संघटना व नागरिकाकडून बुधवारी निषेध मोर्चा काढण्यात आला.

बदलापूर येथे चिमुरडीवर झालेल्या लैंगिक अत्याचार माणूसकीला काळीमा फासणारी गोष्ट आहे.समाजात अशा विकृत माणसांमुळे लहान



मुलींना धोका निर्माण झालाअसुन.भविष्यात अशा घटना होवू नये व कृत्य करणाऱ्याला कायद्याची धाक बसावा म्हणून बदलापूर येथील नराधमला तत्काळ फाशीची शिक्षा करावी जेणेकरून भविष्यात अशा अमानुष घटनांस आळा बसेल. या आशयाचे निवेदन माढा तहसीलदार विनोद रणवरे व पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर यांना देण्यात आले.

**बहिणींना नको पंधरा हजार; अत्याचारी नरधामाला द्या फाशी; घोषणांनी परिसर दणाणला**

## अक्कलकोटमध्ये शिवसेनेच्या रणरागिणींनी रोखली एसटी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २१ ऑगस्ट-**

बदलापूर येथील शालेय विद्यार्थीनीवर अत्याचार झाल्याच्या घटनेच्या निषेधार्थ महिला सुरक्षिततेच्या कारणावरून अक्कलकोट तालुक्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट महिला आघडीच्या रणरागिणी आक्रमक झाल्या. रास्ता रोको आंदोलन करून घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला. घटनेबाबत अत्याचारी नराधमाना द्या फाशी, महिलांना द्या सुरक्षा, नको पधराशे या मागणीने सारा परिसर दणाणून सोडला.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उपनेत्या संजनाताई घाडी, संपर्क प्रमुख अनिल कोकिळ, जिल्हा प्रमुख अमर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिला आघाडी जिल्हा संघटिका प्रिया बसवंती यांच्या नेतृत्वात उपजिल्हा प्रमुख सुनील कटारे, तालुका संघटिका अनुराधा शिवगुंडे, अल्पसंख्यानक तालुका प्रमुख आयाज जमादार, उपशहर संघटिका सुमन वेदपाठक, उपशहर संघटिका किशोरी होटकर, शाखा संघटिका सरोजनी शाली, चंद्रकला बिराजदार, हसीना शेख, चन्नव्वा बिराजदार, सुवर्णा गवंडी, सुमन चव्हाण, समिना लुकडे, नजमीन अन्सारी, सारिका जोगधनकर, चंद्रकला गायतोंडे, गीता म्हेत्रे, पार्वती इसापुरे यांच्या महिलांनी रस्ता रोको केला. महिला व लहान मुलींवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात महिला सुरक्षिततेकरिता कुजकामी नियोजन आणि झोपी गेलेल्या सरकारला जाग आणण्यासाठी आज अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात अक्कलकोट शहरात महिला रणरागिणींनी आंदोलन केले. उत्तर पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, पोलीस उपनिरीक्षक राजू राठोड यांना निवेदन देण्यात आले.

## वामन म्हात्रेंवर कारवाईची मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २१ ऑगस्ट-**

बदलापूर येथील शाळेतील लहान ३ ते ४ वर्षाच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार केल्याची निंदनीय घटना बदलापूर येथे घडली आहे. या घटनेची सखोल चौकशी करून संबंधितांवर कडक कारवाई करावी. महिला पत्रकारांनी बातमी छापली म्हणून बदलापूरचे माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे यांनी सदर महिला पत्रकारास दमदाटी व अर्वाच्य भाषा वापरल्याबद्दल या विकृत माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे याच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी करत बदलापूर घटनेचा पंढरपूर शहर व तालुका पत्रकारांनी पंढरपूर उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन निषेध नोंदवला.

यावेळी पंढरपूर शहर व तालुक्यातील पत्रकार बांधव उपस्थित होते. पत्रकारांच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनामध्ये घडलेल्या घटनेची फिर्याद सुध्दा दाखल करणेस संबंधीत पोलीस ठाण्यातील पोलिसांनी वेळ लावला.तर या संपुर्ण घटनेची बातमी बदलापूर मुंबई येथील सकाळ'च्या महिला पत्रकारांनी बातमी छापली म्हणून बदलापूरचे माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे यांनी महिला पत्रकारास दमदाटी देवून अर्वाच्च भाषा वापरली की, 'जणू तुझ्यावरच बलात्कार झाला आहे. अशी अशोभणीय वक्तव्य केले. अशा विकृत वृत्तीच्या वक्तव्यामुळे महिला पत्रकारास मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. हा एक प्रकारे विनयभंगच असून या विकृत माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे याच्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी पंढरपूर उपविभागीय अधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## पंढरपूर येथील शिबिरात १ हजार ८३२ दिव्यांगांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ ऑगस्ट-**

पंढरपूर उपजिल्हा रुग्णालय येथे दिनांक १९ व २० ऑगस्ट २०२४ रोजी महसूल विभाग, पंचायत समिती पंढरपूर, उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर व दिव्यांग कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तालुक्यातील १ हजार ८३२ दिव्यांग व्यक्तींनी या उपक्रमामध्ये सहभाग नोंदवला.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर येथे दोन दिवस तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे तसेच उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. महेश सुडके व वैश्यपायन वैद्यकीय महाविद्यालयाचे तज्ञ डॉक्टर यांच्या उपस्थित शिबिर यशस्वी पार पडले.

दृष्टी दोष २४२, श्रवण दोष ३०७, बौध्दीक अपंगत्व ३८७, अस्थिव्यंग ७८०, लहान मुलांचे



व्यंग १२० अशा विविध व्यंगांची तपासणी करण्यात आली असून यामध्ये पात्र लाभार्थ्यांना घरपोच मिळणार प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी विविध विभागाच्या वतीने माहितीचे स्टॉल लावण्यात आले होते. सोलापूर जिल्हयातील तालुकानिहाय ग्रामिण रुग्णालय तथा उप जिल्हा रुग्णालयात २५ ठिकाणी दिव्यांग बोर्डाच्या तज्ञ डॉक्टरांमार्फत १५ हजार ६६६ व्यक्तींची दिव्यांगत्व तपासणी व निदान करून पात्र दिव्यांगत्व प्रमाणपत्र आणि वैश्विक ओळखपत्र स्पिड पोस्टने घरपोच देण्यात येणार आहे. तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या प्रचार प्रसिध्दी करण्यात येणार आहे.

## लोकांना न्याय मिळवून देणे आमची जबाबदारी

### खा. धैर्यशील मोहिते-पाटील; महुद येथील मेळाव्यात दिली ग्वाही

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २१ ऑगस्ट-**

या आगोदर मोठ्या दादांनी, आबासाहेबांनी व रामराजेंनी निरेच्या पाण्याच्या बाबत कधीही राजकारण केले नाही.आता मात्र या पाण्याचे राजकारण काही लोकांकडून होताना दिसत आहे. अधिकारी वर्ग सुध्दा त्यांच्या दबावाला बळी पडत आहेत. परंतु येथून पुढे कोणत्याही अधिकारी वर्गानी मग ते ईरीगेशन असो, महसूल असो की पोलीस प्रशासन कोणीही कामकाज करताना कोणाच्याही दबावाला बळी न पडता जनतेला न्याय दिला पाहिजे. आम्ही ही लोकप्रतिनिधी आहोत. आम्हाला लोकांनी निवडून दिले आहे. लोकांना न्याय मिळवून देणे आमची जबाबदारी आहे. कोणावरती अन्याय होणार नाही



याची खबरदारी अधिकारी वर्गाने घ्यावी, असे प्रतिपादन खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केले. ते स्व. गणपतरावजी देशमुख यांच्या जयंती निमित्त महुद येथे आयोजित मेळाव्यात बोलत होते.

यावेळी माजी आ. रामहरी रुपनवर म्हणाले, एकच पक्ष, एकच झेंडा, एकच मतदार संघ व अकरा वेळा आमदार असे एकमेव उदाहरण म्हणून आबासाहेबांच तर कौतुक आहेच आहे. यावेळी डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. मेळावा सुरु होण्यापूर्वी मोटार सायकल रॅली काढून उपस्थित प्रमुख मान्यवर यांच्यावर जेसीबी मधून फुलांचा वर्षाव करण्यात आला. मेळाव्यास शेकापचे चिटणीस दादासाहेब बाबर, चंद्रकांत सरतापे यांच्यासह अनेक संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# माढा मतदारसंघातील महिलांचे सक्षमीकरण हेच ध्येय

**अभिजीत पाटील : श्रीपूरमध्ये खेळ पैठणीच्या कार्यक्रमात व्यक्त केला विश्वास**

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २१ ऑगस्ट-**

आज घर व प्रपंचात महिला वर्ग अडकून पडला आहे. यातून त्यांना स्वतःच्या आरोग्याकडे पुरसे लक्ष देता येत नाही. त्यामुळे अनेक शारीरिक समस्या व त्यातून होणारी कुचंबणा महिलांसाठी मोठी समस्या आहे. यातून बाहेर पडण्यासाठी महिलांचे मनोरंजन होणे , अंगी असलेल्या गुणांना वाव मिळणे व सुदृढ आरोग्यासाठी खेळ पैठणीचा हा उपक्रम महत्वाचा आहे. याबरोबरच माढा विधानसभा मतदारसंघाचे सर्वांगिण विकासाबरोबर विशेष करून महिला सक्षमी करणासाठी विविध माध्यमातून स्वयंरोजगार उपलब्ध करण्यावर माझा भर राहिल, असे उद्गार विठ्ठल सहकारी



साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी काढले.

श्रीपूर येथे रक्षा बंधनाचे औचित्य साधत विठ्ठल प्रतिष्ठान व अभिजीत पाटील मित्र मंडळाचे वतीने खास महिलांसाठी खेळ पैठणीचा या कार्यकमाचे आयोजन करण्यात आले होते, त्या प्रसंगी अभिजीत पाटील बोलत होते. पैठणी हा महिला वर्गाच्या जिव्हाळ्याचा विषय असल्याने महिलांचा उत्फुर्त प्रतिसाद या खेळास लाभला.

यात जागृती सूरज काटे यांनी पैठणी मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. सोनाली औंदुबर जाधव यांनी सोन्याची नथ मिळवत व्दितीय, रूपाली प्रभाकर भगत प्रेशर कुकर मिळवत तृतीय तर वैष्णवी प्रशांत काळे यांनी डिनर सेट मिळवत चौथा क्रमांक पटकावला.

स्पर्धकांना अभिजित पाटील यांच्या हस्ते बक्षिस देण्यात आले. याप्रसंगी महाळुंग-श्रीपूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष लक्ष्मी चव्हाण, शर्मिला मदनबापू पाटील, नगरसेवक प्रकाश नवगिरे, शिवसेना तालुका उपप्रमुख नितीन वाघमारे , विठ्ठल कारखान्याचे संचालक गणेश ननवरे, राष्ट्रवादी (श. प.) गटाचे सुनिल भोसले, सिद्धेश्वर पवार, अजिंक्य पाटील, भाग्यश्री भोसले, सुवर्णा गाडेकर, नेहा तळेकर, सोनाली जगताप, जयश्री जमदाडे, जयश्री बनसोडे, नीता शिंदे, रुपाली जमदाडे, संगीता बागल, मंदाकिनी पाटील, भारती बनसोडे, सुनिता मोटे, शितल लवटे, सुरेखा थिटे, वर्षा वाघमारे, सविता बचुटे उपस्थित होते.

### अभिजीत पाटील यांची 'पैठणी' पेरणी

राज्याच्या विधानसभेची मुदत संपणेस थोडा कालावधी राहिलेला आहे. त्यासाठी अनेक ईच्छुक तयारीला लागले आहेत. पंढरपूरचा बंद पडलेला विठ्ठल सहकारी साखर कारखाना कुशलतेने अंत्यंत कमी कालावधीत नावारुपाला आणून लौकिक वाढवणारे अभिजीत पाटील यांनी माढा विधानसभेची तयारी चालू केली असून त्याचाच एक भाग म्हणून माढा मतदारसंघात ते कमालीचे सक्रिय झालेले दिसून येतात. त्याचाच एक भाग म्हणून खेळ पैठणीच्या माध्यमातून त्यांनी पेरणी चालू केली आहे.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्री छत्रपती शिवाजी विद्यालय तलमोड येथील विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**कसगी, दि.२१ ऑगस्ट -**

भारत शिक्षण संस्था उमरगा, संचलित श्री छत्रपती शिवाजी विद्यालय तलमोड विद्यालयातील इयत्ता आठवी व दहावीच्या विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट संपन्न झाली.

या अंतर्गत विद्यार्थी व शिक्षक यांनी तलमोड येथील पोस्ट ऑफिसला भेट देऊन तेथील कामकाजाची माहिती मिळवली. त्यावेळी पोस्टमन संतोष मोरे यांनी कार्य, रचना, विविध समित्या व त्यांचे काम काज, योजना, यासंबंधीची विस्तृत माहिती विद्यार्थ्यांना व त्यांचे शंकासमाधान केले. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक मोरे जयवंत, संतोष मोरे, उपस्थित होते. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छता ही सेवा-जागरूकता अभियान याबद्दलची विस्तृत माहिती व पत्रके विद्यार्थ्यांना दिली. क्षेत्रभेटीचे नियोजन प्रमुख राठोड एन., बिराजदार ए.एस., वडदरे एन.टी. यांनी केले.


https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### बदलापूर येथील 'त्या' घटनेचा तुळजापूरात निषेध

**तुळजापूर, दि.२१ ऑगस्ट -**

बदलापूर येथील अल्पवयीन मुलीवर झालेल्या घटनेच्या आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ कोळगाव बदलापूर येथे अल्पवयीन मुलीवर तेथील सफाई कर्मचारी यांनी अनैतिक कृत्य केले आहे. त्याचा परिणाम म्हणून विद्यार्थी पालक यांच्यामध्ये तीव्र असंतोष असून ही घटना लोकशाही लोकशाहीला घातक आहे. हा खटला जलद गती न्यायालयामध्ये चालवून त्या नराधमास फाशीची शिक्षा देण्यात यावी व सदरील घटनेचा महाविकास आघाडीच्या वतीने जाहीर निषेध करत आहोत व गृहमंत्री यांनी घटनेची जबाबदारी स्वीकारून आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी केली आहे. या निवेदनावर ॲड. धीरज पाटील, अमोल कुतवळ, अनमोल साळुंखे, राहुल खपले, शरद जगदाळे, सुधीर कदम, चंद्रकांत सोनवणे, बाळासाहेब केसरकर, संदीप कदम, तोफिक शेख, संतोष बामनकर, धनराज शिंदे, संदेश माने सह आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



### भूम भाजप कार्यालयात ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहात साजरा

**भूम, दि.२१ ऑगस्ट -**

आरोग्याची काळजी घेतली. कष्ट केले म्हणूनच चांगले दिवस पाहायला मिळाले. आज चार माणसात सन्मान मिळत आहे. युवकांनी देखिल या पुढील काळात माणूसकी जागृत ठेवण्यासाठी प्रत्येक काम इमानदारीनेच करावे असे आवाहन माजी नगराध्यक्ष शिवाजी गाढवे यांनी जेष्ठ नागरिक दिनाच्या दिवशी सत्कार प्रसंगी बोलताना केले. दि.२१ रोजी भाजपच्या कार्यालयात जागतिक जेष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष ज्येष्ठ नागरिक शिवाजी गाढवे, विधानसभा अध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर, सुदाम पाटील, समाधान अंधारे, बाबासाहेब वीर, हेमंत देशमुख, शंकर खामकर, मुकुंद वाघमारे, शांतीराज बोराडे, मारुती चोबे, अमोल लोंढे सह कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी जेष्ठ नागरिक श्रीमंत गाडे, आप्पाराव सानप, भागवत कोंडीबा वरळे, दिगंबर दत्तू मुसळे, अण्णा बाबा देवकते, सोपान काळे, बाबा गुळवे, धोंडीराम जाधव, सुरेश उपरे रमोल परसू माळी वालवडसह असंख्य ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार केला.



### 'एक पौधा माँ के नाम' वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन

**उमरगा, दि.२१ ऑगस्ट -**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथे एनसीसी विभागाच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रभारी प्राध्यापक डॉ.एस.एन. हिस्सल, प्रमुख मार्गदर्शक डॉ.डी.एस. इटले होते. दि.२१ ते ३० ऑगस्ट पर्यंत हा दिवस एक पौधा माँ के नाम हे ब्रिद वाक्य घेऊन हा कार्यक्रम डीजी एनसीसी कार्यालय दिल्ली व ५३ महाराष्ट्र बटालियन लातूर कार्यालयाचे कमान अधिकारी कर्नल हेमंत जोशी यांच्या मार्गदर्शना खाली घेण्यात येत आहे. कार्यक्रमानंतर महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. सुत्रसंचलन प्रा. विजय पवार प्रास्ताविक कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले व आभार कॅडेट आकाश बनसोडे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ.एस.एन. अस्वले, डॉ.व्ही.एस. इंगळे, डॉ.पी.ए. पिटले, एस.एल. राठोड, जी.एन. सोम वंशी, ए.एस. कसगीकर शिक्षेकत्तर कर्मचारी, एनसीसीचे कॅडेटस उपस्थित होते.



### अध्यक्षपदी नूर पठाण यांची निवड

**लोहारा, दि.२१ ऑगस्ट -**

लोहारा तालुक्यातील मार्डी येथील जिल्हा परिषद शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षपदी नूर पठाण तर उपाध्यक्षपदी तेजकुमार देवकर यांची बिनविरोध निवड झाली आहे. तर नुतन सदस्यपदी मुकुंद देवकर, कल्पना कांबळे, नागेश देवकर नागेश, सुषमा दुधंबे, शितल कदम, संजय माळी, प्रकाश देवकर, रेखा देवकर, शिक्षक तज्ञ योगेश देवकर, शिक्षक प्रतिनिधी के.एस. माणिकशेट्टी यांची निवड करण्यात आली.

# ई-पीक पाहणी अट रद्द करण्याचा मुख्यमंत्र्यांचा निर्णय

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ ऑगस्ट -**

ई-पीक पाहणीच्या अटीमुळे जिल्ह्यातील जवळपास १५ टक्के शेतकरी सोयाबीन व कापसाच्या दरातील घटीमुळे दिल्या जाणाऱ्या अनुदानापासून वंचित रहात आहेत. ही बाब लक्षात घेवून शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदान प्रक्रियेमध्ये बदल व सुधारणा करून सर्व सोयबीन उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देण्याची मागणी आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी कृषि मंत्री ना. धनंजय मुंडे यांच्याकडे केली होती. या मागणीस कृषि मंत्री ना. धनंजय मुंडे यांनी सकारात्मकता दर्शविली होती. आज परळी येथील राज्यस्तरीय कृषि प्रदर्शनामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून ही अट रद्द करण्याची घोषणा करण्यात आली असून यामुळे सर्व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.



खरीप २०२३ मध्ये बाजारातील सोयाबीन व कापसाचे दर कमी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते. ही बाब लक्षात घेवून महायुती सरकारने २ हेक्टरच्या मर्यादेत प्रती हेक्टरी ५००० रुपयांचे अर्थसहाय्य शेतकऱ्यांना देण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय देखील निर्गमित झाला आहे. मात्र ई-पीक पाहणी ॲपच्या माध्यमातून नोंद करूनही लाभार्थी यादीत नावे नसणे, ७/१२ वरती नोंद असूनही यादीत नाव नसणे अशा तक्रारी समोर येत आहेत. तसेच ई-पीक पाहणी न केलेल्या शेतकऱ्यांची संख्या देखील जवळपास १५ टक्के असल्याने ते देखील या अनुदानापासून वंचित रहात आहेत. ई-पीक पाहणीच्या माध्यमातून शासन दफ्तरी नोंद झालेल्या जिल्ह्यातील ३ लाख ९५ हजार ५८३ शेतकऱ्यांना सदरील अनुदान मिळत आहे.

मात्र तंत्रज्ञानापासून दूर असलेले अगदी गोर गरीब व मोबाइल पासून अलिप्त शेतकरी ई-पीक पाहणी करू शकलेले नाहीत. अशा शेतकऱ्यांना देखील ही मदत देणे अत्यावश्यक असून ई पीक पाहणीची अट रद्द करण्याची मागणी आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी कृषि मंत्री ना. धनंजय मुंडे यांच्याकडे केली होती.

> खरीप २०२३ मध्ये ऑनलाइन तक्रारी केलेल्या २५ महसूल मंडळातील शेतकऱ्यांनाच पीक विमा मिळाला असून केंद्र सरकारच्या ३० एप्रिल २०२४ च्या परिपत्राकमुळे उर्वरीत ३२ महसूल मंडळातील शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित आहेत. सदरील परिपत्रकाचे पुनरावलोकन करून त्यामध्ये योग्य ते बदल करण्याबाबत बैठक बोलविण्याची आपल्या मागणीवरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कृषी मंत्री धनंजय मुंढे यांनी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याकडे केलेली विंनती शिवराजसिंह चौहान यांनी मान्य केली असून लवकरच बैठक आयोजित करण्याचे आश्वासित केले आहे. या बैठकीच्या माध्यमातून निश्चितच शेतकऱ्यांना न्याय देणारा निर्णय होईल.

## सातलिंग स्वामींनी घेतली मनोज जरांगे-पाटील यांची भेट

**नैसर्गिक भूकंपानंतर ३० वर्षानंतर उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघात होणार राजकीय भूकंप...**

### आगामी विधानसभा निवडणुकी संदर्भात केली राजकीय खलबते...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२१ ऑगस्ट -**

विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर गत दोन वर्षापासून उमरगा-लोहारा विधानसभा लढवण्याची तयारी करत असलेले सातलिंग स्वामीं यांनी मराठा संघर्ष योद्धा मनोज जरंगे पाटील यांची अंतरवाली सराटी येथे दि.१९ ऑगस्ट रोजी संभाजी ब्रिगेडचे धाराशिव जिल्हाध्यक्ष शरद पवार, संभाजी ब्रिगेडचे उमरगा तालुकाध्यक्ष अण्णासाहेब पवार, महादेव माने, ओमकार गायकवाड, विजय स्वामी, ज्ञानेश्वर कांबळे, दिनेश पाटील, समाधान सरडे, आतिश गाटे, महादेव मगर, औदुंबर क्षीरसागर, हरिदास पवार, मंजूताई शिरसागर, दिपाली मगर आदी प्रमुख पदाधिकाऱ्यांसह तब्बल ४० ते ५० छाव्यासह भेट घेवून आगामी उमरगा-लोहारा विधानसभा निवडणूकीसंदर्भात सांगोपांग चर्चा केली. दोन गोपनीय फाईल जरांगे पाटील यांना सुपूर्द केली.




याप्रसंगी मनोज जरांगे-पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचे सातलिंग स्वामी यांनी सांगितले.

## बदलापूर येथील घटनेचा परंड्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वतीने निषेध



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२१ ऑगस्ट -**

बदलापूर येथील बालिकावर झालेल्या अत्याचाराची घटना अत्यंत दुर्दैवी व संताप जनक आहे. महाराष्ट्र भूमी ही संतांची भूमी आहे अश्या भूमीत अशी घटना घडणे संस्कृतीला शोभत नाही. पीडित मुलींना न्याय मिळवून देऊन आरोपीला शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी निवेदनाव्दारे दि.२१ ऑगस्ट रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वतीने विभागीय महिला अध्यक्षा वैशाली मोटे यांनी परंडा तहसीलदार मार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना निवेदन देऊन केली आहे.

जर आरोपीला अटक करून शिक्षा झाली नाही, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष महिलाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्र भर आंदोलन तीव्र करण्यात येईल असा इशारा देण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस महिला जिल्हा सरचिटणीस स्वाती गायकवाड, उषा गटकुळ, तालुकाध्यक्षा दैवशाला खैरे, नगरसेविका रत्नामाला बनसोडे, युवती तालुका कार्याध्यक्षा प्रियांका काळे, उज्वला वणवे, नशिरशहा बर्फीवाले, राहुल बनसोडे, गनी हावरे, नंदु शिंदे, श्रीहरी नाईकवाडी, हनुमंत गायकवाड, खयुम तुटके, हनुमंत यादव, पटेल, प्रा. शरद झोंबाडे, प्रा. मारकड, प्रा. अजय मेटकर, प्रा. आटोळे, सहदेव खैरे यांच्यासह शेकडो विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## पोलीस अधीक्षक संजय जाधव यांचे स्वाआधार संस्थेतील दिव्यांग मुलींसोबत अनोखे रक्षाबंधन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ ऑगस्ट -**

रक्षाबंधन हा सण 'रक्षा' आणि 'बंधन' या दोन शब्दांनी बनलेला असून संस्कृत भाषेनुसार या सणाचा अर्थ 'संरक्षण करणारे बंधन' असा होतो. येथे रक्षा म्हणजे संरक्षण प्रदान करणे आणि बंधन म्हणजे गाठ, संरक्षण देणारी तार. याच पार्श्वभूमीतून बालगृहातील कोणाला चालता येत नाही, कोणाला नीट बोलता येत नाही, जन्मतः‌च मानसिक अंपगत्व लाभलेल्या शेकडो अनाथ भगिनींना जन्मदात्यांनी वाऱ्यावर सोडून दिले. तरीही मोठ्या कल्पक आणि उत्साही असलेल्या या दिव्यांग भगिनींनी पोलीस अधीक्षकांनाच आपला भाऊ मानले. मोठ्या कल्पकतेतुन वेगवेगळ्या झाडांच्या बियांचा वापर करुन बनविलेल्या राख्या पाहून जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधवही भारावून गेले.

स्वाआधार संस्थोतील दिव्यांग अनाथ मुलींसोबत हे रक्षाबंधन अविस्मरणीय असल्याची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. दरवर्षीप्रमाणे यंदाही तालुक्यातील आळणी येथील स्वाआधार मतिमंद मुलींच्या निवासी प्रकल्पात पर्यावरणपुरक रक्षाबंधन कार्यक्रम दि.१९ ऑगस्ट रोजी आयोजीत करण्यात आला होता. प्रमुख पाहुणे म्हणून संजय जाधव जिल्हा पोलीस अधिक्षक धाराशिव, यांसह स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक वासुदेव मोरे, धाराशिव (ग्रा.) पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती शेळके, संस्था प्रमुख शहाजी चव्हाण, गुरुनाथ थोडसरे (मुख्याध्यापक), आदीची उपस्थिती होती. यावेळी दिव्यांग मुलींनी त्यांच्या ठायी असलेल्या कलागुणांचे दर्शन घडविले.जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांना राखी बांधून दिव्यांग मुलींनी औक्षण केले. त्यांच्या हस्ते मुलींना शालेय साहित्य व खाडुचे वाटप करण्यात आले.

प्रास्तविक मुख्याध्यापक गुरुनाथ थोडसरे यांनी केले. सुत्रसंचालन व आभार रुपाली कांबळे यांनी व्यक्त केले.

## जालना येथे उपोषणास नळदुर्ग ब्राह्मण समाज संघटनेचा पाठींबा

**नळदुर्ग, दि.२१ ऑगस्ट -**

ब्राह्मण समाजाचे नेते दिपक रननवरे हे गेल्या सात दिवसापासुन जालना येथे आमरण उपोषणास बसलेले आहेत त्यांच्या उपोषणास नळदुर्ग शहर ब्राम्हण समाजाने जाहीर पाठिंबा दिला असुन याबाबतचे निवेदन ब्राम्हण समाज संघटनेच्या वतीने नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांना देण्यात आले आहे. परशुराम आर्थिक विकास महामंडळची स्थापना करण्यात यावी या मुख्य मागणीसह इतर मागण्यांसाठी हे उपोषण सुरु आहे. या उपोषणास जाहीर पाठिंबा देण्यासाठी ब्राह्मण समाजाच्या वतीने ब्राह्मण समाजाचे अध्यक्ष माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांच्या नेतृत्वाखाली नळदुर्ग पोलीस स्टेशनमध्ये साह्यक पोलीस निरीक्षक सरोदे यांना निवेदन देण्यात आले.

## स्वातंत्र्य सेनानी चंद्रशेखर बदोले यांचा स्मृतीदिनी साजरा

### स्मृतीदिनानिमित्त गरीब व गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती...

**तभा वृत्तसेवा**
**कसगी, दि.२१ ऑगस्ट -**

उमरगा तालुक्यातील कसगी गावचे सुपुत्र तथा कसगी गावचे प्रथम सरपंच कर्मयोगी कै. चंद्रशेखर बदोले त्यांचे २३ स्मृति महोत्सव कार्यक्रम श्री सिद्धेश्वर विद्यालय कसगी येथे विविध शालेय सामाजिक उपक्रम करून मागील २३ वर्षापासून अखंडपणे संपन्न होत आहे.



२३ व्या स्मृती महोत्सव कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे संचालक अमरसिंग ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष प्राध्यापक विठ्ठलराव पटणे, संचालक राम मोरे, संचालक भीमाशंकर बोरुटे, विश्वनाथ नंदर्गे, विनय बदोले, भीमाशंकर नंदर्गे, बसवराज कुंभार, पालक पंडित माशाळे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष शशिकांत चनपटणे, कलशेट्टी, मुख्याध्यापक आर.एम. माशाळे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाले. स्मृती महोत्सव समितीच्या माध्यमातून श्री सिद्धेश्वर विद्यालयातून शिकून उच्च शिक्षण घेणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती देऊन त्यांच्या उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत या महोत्सवाच्या माध्यमातून केली जाते. यात चंचलपुरी, त्रिरत्न सोनकांबळे, मनोज गुरव याचबरोबर अनेक माजी विद्यार्थ्यांना आर्थिक मदत ही करण्यात आली आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आर.एम. माशाळे, सूत्रसंचालन गणेश पाचंगे, विद्यालयातील सर्व कर्मचारी बांधव, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लाडकी बहिण योजनेसाठी उमरगा-लोहारा तालुक्यात ७७ हजार ५०० महिला पात्र

### महिलांनी आ. चौगुलेंना राखी बांधून केली आभार व्यक्त...

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२१ ऑगस्ट -**

महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करण्याकरिता राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरू केली असुन या योजनेत उमरगा तालुक्यातील ५२ हजार महिला व लोहारा तालुक्यातील २५ हजार ५०० महिला असे एकण ७७ हजार५०० महिलांच्या अर्जाला मंजुरी मिळुन पात्र झाल्या आहेत. या योजनेची विधानसभा निहाय समिती नेमण्यात आली होती.

या अनुषंगाने आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या अध्यक्षतेखाली उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघ क्षेत्रनिहाय समितीची बैठक तहसिल कार्यालय, उमरगा येथे दि.८ ऑगस्ट रोजी घेण्यात आली होती. यावेळी आ. ज्ञानराज चौगुले यांनी सदर योजनेबाबत दोन्ही तालुक्यातील आढावा घेतला होता. प्रशासनाने या योजनेचे लाभार्थी वाढवण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न करावेत व गावोगावी ग्रामीण भागात ग्रामपंचायत संगणक परिचालक यांनी ऑनलाईन करण्यासाठी सहकार्य करावे. ज्या लाभार्थ्यांनी ऑफलाईन अर्ज जमा केले आहेत अशांचे ऑफलाईन अर्ज प्रशासनाने करून घ्यावेत जेणेकरून एकही पात्र महिला वंचीत राहणार नाही अशा सुचना यावेळी त्यांनी केल्या होत्या.



याची दखल घेऊन प्रशासनाने प्रगतीपथावर कामे करुन समितीचे अध्यक्ष आ. ज्ञानराज चौगुले, समितीचे सदस्य किरण गायकवाड, शितलताई पाटील, उपविभागिय अधिकारी गणेश पवार, उमरगा तहसीलदार गोविंद यरमे, लोहारा तहसीलदार काशीनाथ पाटील, मुख्याधिकारी रामकृष्ण जाधवर (उमरगा, लोहारा), मुख्याधिकारी समीर भुजबळ (मुरूम), बालविकास प्रकल्प अधिकारी डी.के. वाघ (उमरगा), बालविकास प्रकल्प अधिकारी किशोर गुरव (लोहारा) यांनी उमरगा, लोहारा तालुक्यातील एकुण ७७,५०० महिलांच्या अर्जाला मंजुरी दिली आहे.

या सर्व महिला पात्र झाल्या आहेत. माझी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत पात्र असणाऱ्या महिलांच्या खात्यात रक्कम पडण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे पैसे काढण्यासाठी महिलांची बँकेत मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.

खात्यावर रक्कम जमा झाल्याने राखी पोर्णिमा सणाचे औचित्य साधुन उमरगा, लोहारा तालुक्यातील महिलांनी आ. ज्ञानराज चौगुले यांना राखी बांधुन आभार मानले.

## संक्षिप्त वृत्त...

### सकल हिंदू समाजाच्यावतीने पूर्णा बंदला व्यापाऱ्यांचा संमिश्र प्रतिसाद




**पूर्णा,/प्रतिनिधी:**बांगलादेश येथे अल्पसंख्यांक हिंदू समाज बांधवांवर होत असलेल्या क्रूर अन्याय अत्याचाराच्या निषेधार्थ सकल हिंदू समाज बांधवांच्या वतीने १७ ऑगस्ट शनिवारी पुर्णा बंदचे आवाहन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहून बांगलादेश येथील घडलेल्या घटनेचा तीव्र निषेध केला यावेळी तहसीलदार माधवराव बोथीकर यांना निवेदन देण्यात आले या बंदमध्ये सकल हिंदू समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाला होता व सर्व व्यापारी बांधवांनी स्वयंपूर्तीने दुकाने बंद ठेवून बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.समाधान पाटील यांच्या मार्गर्शनाखाली पोलिस निरीक्षक विलास गोबाडे यांनी शहरात कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### संभाजी ब्रिगेडचे मुंबई येथे आज अधिवेशन

**सेलू,/प्रतिनिधी:** मराठा सेवा संघ-संभाजी ब्रिगेडचे राज्यस्तरीय अधिवेशन २२ ऑगस्ट रोजी नवी मुंबई येथे विष्णुदास भावे नाट्यरंग मंदिरामध्ये आयोजित करण्यात आले आहे, या अधिवेशनास तरुणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संभाजी ब्रिगेडचे राज्य उपाध्यक्ष छगन शेरे यांनी केले आहे संभाजी ब्रिगेडच्या अधिवेशनाचे उद्घाटन खा.अमोल कोल्हे,आ. रोहित पवार,अभिनेते सयाजी शिंदे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.संभाजी ब्रिगेडने गेल्या दहा वर्षांमध्ये अर्थकारण चळवळीला प्राधान्य दिले आहे.आर्थिक साक्षरता घडवणे,तरुणांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे हा यामागचा हेतू आहे.या निमित्ताने विविध कार्यक्रम होत असून प्रसिद्ध लेखक प्रफुल वानखेडे यांची मुलाखत प्रसिद्ध पत्रकार अभिजीत करंडे हे घेणार आहेत. ज्येष्ठ व्याख्याते निरंजन टकले हे गांधींच्या स्वप्नातील भारत या विषयावर व्याख्यान देणार आहेत. ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार हे महाराष्ट्र धर्म या विषयावर बोलणार आहेत.तसेच ज्येष्ठ पत्रकार ज्ञानेश महाराव हे मार्गदर्शन करणार आहेत. समारोपाच्या सत्रामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते- पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कोल्हापूरचे खासदार शाहू छत्रपती यांचा विशेष शाही सन्मान करण्यात येणार आहे उद्योग व्यवसाय मार्गदर्शनासह विविध मान्यवरांचे सत्कार सोहळे पार पडणार आहे म्हणून तरुणांनी अधिवेशनास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संभाजी ब्रिगेडचे राज्य उपाध्यक्ष छगन शेरे,बजरंग आरकुले,निलेश शिंदे,ऋषी चट्टे,शशांक टाके,उत्तम डोंबे,अतुल डख,सचिन रोडगे यांनी केले आहे

### वराड यांन केला स्वखर्चातून रस्ता



**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर तालुक्यातील सायखेडा येथील सरपंच गजानन वराड व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक यांनी असोला पाटील ते सायखेडा पर्यंत हा रस्ता तीन किलोमीटरचा असून या रस्त्याामुळे गावात जाणाऱ्या नागरिकांना चिखलातून जावं लागत होते परंतु सायखेडा गावातील नागरिकांनी गजानन वराड यांच्याकडे मागणी केली असता गजानन वराड यांनी शासनाकडे कुठल्याही निधीची मागणी न करता गावकऱ्यांच्या मागण्या मान्य करूनकुठल्याही गोष्टीचा विचार न करता आपल्या स्वखर्चातून चिखलमय रस्ता दुरुस्त करून त्याा रस्त्याावर संपूर्णपणे मुरूम टाकण्यात आला आहे यामुळे मुरूम टाकल्यामुळे गावातील नागरी मोठ्या संख्येने गजानन वराड पाटील यांचे कौतुक करीत आहेत असाच उपक्रम इतर गावांनी घ्यावा असेही आवाहन केले.

### प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व खा.अमोल कोल्हे यांचे जंगी स्वागत

**जिंतूर,/प्रतिनिधी:** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने काढण्यात आलेल्या शिवस्वराज्य यात्रेचे सेलूत तालूका राष्ट्रवादी च्या जंगी स्वागत करण्यात आले तर माजी जि. प. सभापती अशोकराव काकडे यांच्या वतीने त्यांच्या निवासस्थानीही स्वागत करण्यात आले .यावेळी येणाऱ्या सर्व मान्यवरांची भोजनाची देखील व्यवस्था करण्यात आली होती . राष्ट्रवादी कांग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने लढा महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा '' शिव स्वराज्य '' यात्रेचे नियोजन राज्यभर करण्यात आले आहे .



सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी–विक्री–प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# शिवस्वराज्य यात्रेस जिंतूरात हजारोंचा जनसमूदाय

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर : १७ ऑगस्ट, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) प्रदेशाध्यक्ष मा.आ.श्री.जयंतजी पाटील साहेब यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेली ''शिवस्वराज्य यात्रा'' आज जिंतूर मध्ये मा.आ.विजयराव भांबळे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.शिवस्वराज्य यात्रा; हजारोंच्या संख्येने जमलेल्या जिंतूर-सेलूकरांनी प्रांताध्यक्ष जयंतराव पाटील साहेबांचे प्रचंड स्वागत केले.

सन्मा. संसदरत खा. अमोल कोल्हे साहेब, आ.राजेशभैय्या टोपे साहेब, खा. फौजिया खान मॅडम, युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, जिल्हाध्यक्ष विजयराव गव्हाणे साहेब, सौ.प्रेक्षाताई भांबळे यांचासह पदाधिकारी, प्रमुख नेत्याांच्या उपस्थितीत शिवस्वराज्य यात्रेची भव्य सभा पार पडली. ''शेतकऱ्यांचे चाललेले हाल, सत्ताधाऱ्यांच्या फुसक्या योजना, वाढती बेरोजगारी, जनतेची चाललेली ससेहोलपट या सर्वांना आवाज देण्यासाठी शिवस्वराज्य यात्रा उभी टाकली आहे. राज्यातील गावागावात, शहरा शहरात जाऊन जनतेच्या प्रश्नांना आम्ही वाचा फोडतोय. महाराष्ट्राचा स्वाभिमान पुन्हा परत करण्यासाठी, गद्दारी गाडण्यासाठी, महाराष्ट्र धर्म जपण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आरंभलेली ही न्याय यात्रा होती. यावेळी प्रांताध्यक्ष जयंतराव पाटील साहेबांनी संबोधित करतांना म्हंटले कि, लोकसभा निवडणुकीत जनतेने त्याांना जागा दाखवल्यानंतर ते विविध योजनेचा पाऊस नागरिकांवर पाडून मते मिळवण्याचा प्रयत करणार आहेत. परंतु, शासनाने लादलेले विविध टॅक्स शेतमालाचा भाव आणि मिळणाऱ्या योजनेतील लाभ पाहता शासन आजही तोंडाला पान पुसत आहे. या योजना नागरिक स्वीकारतील का नाही यावर विश्वास नसल्याने सर्व सरकारी कर्मचारी कामाला लाऊन योजनेची जाहिरात बाजी करत आहेत. परंतु, जिंतूर-सेलूकरांची उपस्थिती पाहता मा.आ.विजयराव भांबळे यांचा विजय निश्चित असल्याचे मला दिसत आहे असे स्पष्ट उद्गार काढले. बेलगाम, हुकूमशाही सरकारला आणि त्याांच्या प्रतिनिधींना, शेतकरी कष्टकऱ्यांच्या या शत्रूंना सत्तेतून खाली खेचा,'' असा चौफेर हल्ला प्रांताध्यक्ष जयंत पाटील साहेबांनी सरकारवर चढवत सत्ताधाऱ्यांवर टिका केली. यानंतर मनोगत व्यक्त करताना मा.खां.अमोल कोल्हे साहेब यांनी महाराष्ट्र आजचा बाजार खपऊन घेणार नाही. तर त्याांना



आपण येत्याा निवडणुकीत जागा दाखऊ असा निर्धार केला. लोकसभा निवडणुकीनंतर घसरता पाय पाहता मतांची झाली कडकी म्हणून बहिण झाली लाडकी अशी कानपिचकी देत सत्ताधाऱ्यांवर सडकून टिका केली. तर मा.आ.विजयराव भांबळे साहेबयांनी मत व्यक्त करतांना म्हंटले कि, तेव्हाही सांगितलं होत आजही सांगतो... आम्ही गद्दारी केली नव्हती आणि करणारही नाही, शेवटच्या श्वासापर्यंत पवार साहेबांशी एकनिष्ठ राहणार. ज्यांनी पक्षाशी, जनतेशी आणी आपल्या मातीशी गद्दारी केली अशा लोकांनी त्यांची जागा दाखवायचं काम आपण सर्वांनी मिळून करायचं. निवडणुकीत पैशाचा महापूर येणार आहे. तुम्हाला पैसा पाहिजे कि जनतेसाठीच काम यातील एकाची निवड करा आणि मगच आपल अमूल्य मत द्या. तसेच चालू असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना यावर म्हंटले कि, मागच्या दोन वर्षापासून ह्याचं सरकार होत मग तेव्हा ''लाडकी बहिण'' का नाही आठवली, जर योजना काढायचीच तर सुरक्षित माझी बहिण योजना काढा असे म्हंटले.

तसेच सौ.प्रेक्षाताई भांबळे-बोराडे यांनी म्हंटले कि, बेरोजगारी, महिलांवरील अत्याचार आपण किती दिवस सहन करणार? महाराष्ट्राच्या जपण्याची वेळ आता आली आहे. जिंतूर शहरातील लोक लोडशेडिंगमुळे त्स्त्रा आहेत, पण इथल्या सत्ताधारी आमदाराला तो प्रश्नही सोडवता आला नाही. अशी टिका स्थानिक आमदारावर केली. उपस्थित जनतेने यावेळी राजेशभैय्या टोपे साहेब, मेहबूब शेख यांचे मार्गदर्शन ऐकले. यावेळी सय्यद खैसर व सय्यद गफ्फार भाई चारठाणकर यांच्यासह शंभर कार्यकर्त्यांचा, बोरकिनी येथील सुरेश मुसळे, प्रसाद मुसळे, नवनाथ मुसळे व विष्णू मुसळे यांच्यासह एक्क्यानव कार्यकर्त्यांचा, नरसापूर येथील संदीप ढाले , अक्षय वाकळे, कोंडीराम वाकळे यांच्यासह एक्कतीस कार्यकर्त्यांनी, मलेटाकळी नेताजी काशिनाथ ताठे व इतर दहा जन, खरदडी येथील माणिकराव थिटे , उद्धवराव थिटे यांच्यासह पंचेवीस सहकारी, हकीमलाला यांच्या माध्यमातून एकशे वीस कार्यकर्त्यांचा, सेलू शहर मधील शेख मुख्तार उर्फ राजू, मोहम्मद शेख बेलदार यांच्यासह आठ जणांनी, तसेच ढेंगळी पिंपळगाव येथील चेअरमन नारायणराव सोळंके, केशव चोरमाले यांच्यासह दहा कार्यकर्त्यांनी प्रांताध्यक्ष जयंतजी पाटील साहेबांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर प्रवेश केला. यावेळी मंचावर उज्वलाताई राठोड, विश्वनाथ राठोड, अजयभैया चौधरी, रामराव उबाळे, राजेंद्र लाहाने, अशोक नाना काकडे, मुरलीधर मते, विठ्ठल घोगरे, अभिनय राउत, बालासाहेब रोडगे, विनायक पावडे, मनीषाताई केंद्रे, सुधाकर रोकडे, शरद अंभूरे, आशाताई खिल्लारे, निर्मलाताई लिपने, गणेशराव उबाळे, साबिया बेगम फारुकी, बाळासाहेब भांबळे, पृथ्वीबाबा भांबळे, दलमीर पठाण, बंटी निकाळजे, मनोहर डोईफोडे, इस्माईल पहेलवान, शाहेद बेग मिर्झा, शोएब जानिमिया, अहेमद बागबान, लखुजी जाधव, दत्तराव काळे, शौकत लाला, अभिलाष राउत, अविनाश काळे, शाहेद सिद्धिकी इत्यादींसह पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोनपेठ तालुक्यात चक्क बोगस पिक विम्याचा भरणा

**सोनपेठ/ प्रतिनिधी-** तालुक्यातील ज्या गावांमध्ये महसुली रेकॉर्डला कुठल्याही प्रकारची सात बारा वर नोंद नसलेल्या बोगस शेतकऱ्यांनी पिक विमा लाटण्याच्या उद्देशाने चक्क खोट्या कागदपत्रांच्या आधारे १३,१७० हेक्टर वर पिक विम्याचा भरणा केला असल्याची माहिती समोर आली असून सदरील बोगस पिक विम्याचे प्रस्ताव तात्काळ रद्द करण्याची मागणी शेतकरी संघटनेच्या वतीने तहसीलदार सोनपेठ यांच्याकडे करण्यात आली आहे.

मागील काही वर्षापासून सोनपेठ तालुक्यातील कुठल्याच महसुली गावामध्ये शेतजमिनी नसणारे बोगस शेतकरी, खोट्या कागदपत्रांच्या आधारे तालुक्यातील काही गावांमध्ये शेती असल्याचे दाखवून पिक विमा भरत आहेत. त्यामुळे शासनाचा पीक विमा परतावा खऱ्या शेतकऱ्यांना अपेक्षित प्रमाणात मिळत नसल्याने तालुक्यातील खऱ्या शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होत आहे. यावर्षी सन २०२४ च्या खरीप हंगामातील विविध पिकांचा अशाच प्रकारे बोगस पिक विमा भरण्यात आला असल्याची माहिती शेतकरी संघटनेच्यावतीने देण्यात आली आहे. त्यामध्ये सखाराम तांडा ९१२ हेक्टर, भाऊ तांडा २९१२ हेक्टर, मुंशीराम तांडा १०९० हेक्टर, कोठाळा तांडा ३९९ हेक्टर, तुकाई तांडा ५४६ हेक्टर, सोनपेठ ग्रामीण १३७७ हेक्टर, रेवा तांडा ३६२५ हेक्टर, सोनपेठ शहर २३०६ हेक्टर व प्रत्योक गावातील बोगस पीक विमा भरलेल्या क्षेत्राच्या पुढे पुन्हा गुंट्यामध्ये असलेले क्षेत्र धरुन एकूण १३ हजार १७० हेक्टर वर बोगस पिक विमा भरणा केला आहे. तालुक्यातील या आठ गावांमध्ये बोगस पीक विमा भरणाऱ्या लाभार्थ्यांची कुठल्याही प्रकारची शेतजमीन नसल्याचे सांगितले जाते.त्यांनी बोगस कागदपत्रांच्या आधारे पिक विमा भरणा केल्यामुळे, भविष्यात तालुक्यात पिक विमा लागू झाल्यास तालुक्यातील खऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय होऊन त्यांना बाधित क्षेत्राचा अपेक्षित पिक विम्याचा परतावा मिळत नसल्याचे शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सांगितले. त्यामुळे या प्रकरणाचा लवकरच भांडाफोड होणार असून अशा बोगस पिक विमा लाटणाऱ्या लाभार्थ्यांनी भरणा केलेल्या पिक विम्याचे प्रस्ताव तात्काळ रद्द करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी ही शेतकरी संघटनेच्या वतीने केली जात आहे. या निवेदनावर शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष विश्वंभर गोरवे, गणेश पाटील यांच्या स्वाक्षरी आहेत.

## अमृत कल्याणकारी योजनेचा लाभ घेवून उत्कर्ष साधा- धर्माधिकारी

**पूर्णा,/प्रतिनिधी-** खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या उत्थानासाठी अमृत स्वायत्त संस्थेच्या विविध कल्याणकारी योजना आहेत त्याचा लाभ घ्या असे आवाहन भुषण धर्माधिकारी (मुंबई) यांनी केले.

येथील महावीर नगर मधील शनि मंदिर सभागृहात १७ ऑगस्ट शनिवारी खुल्या गटातील आर्थिक दुर्बल घटकांना मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी ( अमृत ) या स्वायत्त संस्थेच्या वतीने मार्गदर्शन शिबीर व बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी संस्थेचे वक्ते भूषण धर्माधिकारी हे मुख्य मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी दीपक जोशी (छत्रपती संभाजी नगर) अनंत जोगदंड (परभणी )अभिजित चक्के, भास्कर भाले, सुभाषचंद्र ओझा, लक्ष्मीकांत कदम, प्रभाकर कोत्तावार, प्रविण कोत्तावार, वसंत पांपटवार, रमण ओझा, सतीश टाकळकर, नरेश पुणपाळे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना भूषण धर्माधिकारी म्हणाले, खुल्या गटातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल ( ) जे तरुण व तरुणी आहेत यांना स्वयंरोजगार, कृषी उद्योग प्रशिक्षण, ड्रोण प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा, अभियांत्रिकी व वैद्यकीय क्षेत्रातील विविध अभ्यासक्रम, संगणक, टंकलेखन, लघुलेखन, किशोरी विकास प्रकल्प, वैयक्तिक कर्ज, परशुराम गट, व्याज परतावा योजना साठी अमृत संस्था मदतीसाठी तयार आहे. महाराष्ट्रातील अमृत संस्थेचे अनेक लाभार्थी मोठ्या स्वाभिमानाने व्यवसाय करीत आहे. ज्यांना परशुराम गटामध्ये बचत गटामार्फत व्यवसाय करावयाचा असेल यांनाही अमृत संस्था मदत करण्यास तयार आहे.उद्योग व्यवसाय करताना आपल्याला बँकेमार्फत कर्ज घ्यावे लागणार असून त्याच्या परतफेडसाठी जे व्याज होईल.त्या व्याजाची रक्कम (१२% ) पर्यंत अमृत संस्था देणार आहे. या संस्थेच्या माध्यमातून लक्षित समाजाने जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे त्यांनी आवाहन केले. याप्रसंगी अमृत लक्षित गटातील गणमान्य व्यक्ती व लाभार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक दीपक जोशी यांनी केले सुत्रसंचालन व आभार अनंत जोगदंड यांनी केले

## गणेश काजळे यांनी घेतली मनोज जरांगे यांची भेट

**जिंतूर,/प्रतिनिधी-** मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण मागणीवर ठाम असलेले मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारने सगेसोयरे अध्यादेश काढला नाही तर उमेदवार उभे करण्याची भूमिका घेतली आहे म्हणून काँग्रेसचे तालुका अध्यक्ष गणेश काजळे यांनी मनोज जरांगे पाटील यांची दिनांक १८ ऑगष्ट रोजी अंतरवाली सराटी येथे भेट घेऊन उमेदवारीची मागणीसाठी आपला अहवाल दिला आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देऊन सगेसोयरे अद्यादेश काढण्याच्या मागणीसाठी आपल्या भूमिकेवर ठाम असलेले संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी येत्याा २९ ऑगष्ट पर्यंत अध्यादेश काढला नाही तर आगामी काळात विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभे करणार असल्याची घोषणा केली होती यासाठी महाराष्ट्रातही इच्छुक उमेदवारांचे अहवाल मागवण्यात येत आहेत त्या अनुषंगाने गणेश काजळे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह मनोज जरांगे पाटील यांची अंतरवाली



सराटी येथे भेट घेऊन सेलू जिंतूर विधानसभेच्या उमेदवारीसाठी आपला अहवाल दिला आहे म्हणून आगामी काळात मनोज जरांगे पाटील उमेदवार देणार की दुसरा काही निर्णय घेतात याकडे तालुक्यातील मराठा समाजाचे लक्ष लागले आहे भेटीच्या वेळी प्रदीप काजळे,बालाजी शिंदे,राम पाटील,गुलाबराव ठोंबरे, राजेभाऊ शिंदे,अक्षय काकडे, छत्रपती शिंदे,कल्याणराव हिंजे दामोदर घुगे, प्रकाश थिटे, सुभाष काजळे, अनिल गाडेकर,अँड माधव दाभाडे,शिवाजी लिपणे भागवत कापुरे, नितीन ढवळे, राजू जोरगेवार,केशव देशमुख, कृष्णा राऊत, मारोती मगर,बळीराम गटकळ पाटील, रामभाऊ तारडे, सचिन घोगरे, गणेश वाघ,शिवाजी लिपने, रामप्रसाद बोराडे,महेश कोंडके गणेश परखंड,माणिक ढवळे,विजू पोळ,किसन आवरगंड,कैलास मस्के यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते आपणही समाजाचे काही देणे लागतो या भावनेतून नेहमी मराठा समाजाला मदत करण्याचा प्रामाणिक प्रयत केलेले आहेत.

### नव मतदारांनी नाव नोंदणी करावी- शेळके

**परभणी,/प्रतिनिधी-** महाविद्यालयातील १८ वर्षे पूर्ण झालेल्या मतदारांनी व भविष्यातील नवं मतदारांनीही मतदार यादीत नाव नोंदणी करावी, असे आवाहन प्राचार्य पी.बी. शेळके यांनी केले.

परभणी तालुक्यातील पोखर्णी येथील नृसिंह उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आयोजित नवं मतदार विशेष नोंदणी कार्यक्रमात ते बोलत होते.

## इंडिया पोहचला चंद्रावर पण, सहज पोहोचता येत नाही आरोग्य केंद्रावर

**सेलू,/प्रतिनिधी:** येथील कै. अण्णासाहेब काकडे सेवाभावी संस्थेच्या वतीने पद्मश्री नारायण सुर्वे यांच्या स्मृतिप्रीत्यार्थ कै. रा.ब. गिल्डा सभागृहात रविवार ( दि. १८ ) रोजी आयोजित काव्य मैफिलीत शहरातील कवी-कवयित्रींनी आपल्या कविता सादरीकरणातून श्रोत्याांना मंत्रमुग्ध केले. माधव गव्हाणे यांनी इंडिया सहज जाऊन पोहोचला मंगळा सहित चंद्रावर, आम्हाला ईतक्या सहज पोहचता येत नाही आरोग्य केंद्रावर या आपल्या कवितेतून वास्तव जाणिव करुन दिली.

गौतम सूर्यवंशी यांनी धर्म,पंथ ,अन भेद नको , समानता ही हवी एकसंघ या




भारताची ,ओळख देऊ नवी, भेद सारे विसरूनी ,आता समरस होऊ चला आपल्या या रचनेतून समताभाव जागविला. अश्विनी - संजय विटेकर या गझलकार दाम्पत्याच्या जुगलबंदीने रसिक श्रोत्याांच्या चेहऱ्यावर हास्यफुलले. अश्विनी विटेकर यांनी, तुझ्या आठवांचा पहारा वगैरे, किती गोड हा कोंडमारा वगैरे. तर संजय विटेकर यांनी , घेवून टाक आता वापस मिठी तुझी तू , ठेवून मी कुणाचे उपकार घेत नाही. ही गझल सादर केली. डॉ. शरद ठाकर यांनी तुझ्या रुपाने पडल माझ्या नशिबी चांदण. , डॉ.

### बहारदार काव्य मैफिलीने जिंकली रसिकांची मने

जयश्री सोन्नेकर यांनी पंथ माझा जातही माहीत नाही, फक्त मी माणूस, याचे भान आहे. संध्या फुलपगार यांनी मी कशाला बरे कुणाची चाकरी करावी म्हणते, अर्धीच पण हक्काची भाकरी करावी म्हणते. प्रभू शिंदे यांनी, काल आपल्या गावातलं पोरगं मोबाईल खेळत होतं , भलं मोठं आजगर, त्याच्या मांडीवर बसलं होतं. सुमिता सबनिस यांनी, पोरावानी जपतोया ,जसं पोटचाच पोर, बाप मव्हा रातदिस ,कापसाच्या मागम्होर. ही कविता सादर केली. तर हरिष कवडे यांनी, मंत्र्याचा लाल दिवा, गाव सार पेटवून गेला, बाप - लेक, चुलते - पुतने, अशी रक्ताची नाती गोठवुन गेला. या कवितेतून राजकीय वास्तव मांडले. कवी डॉ. अशोक पाठक, दिलीप डासाळकर, मुख्याध्यापक सर्जेराव लहाने, शैलजा वसेकर, करूणा बागले, डॉ. राजाराम झोडगे, संभाजी रोडगे, शुक्राचार्य शिंदे, दिलीप दौड, डॉ. निर्मला पद्मावत, राम गायकवाड यांनी आपल्या कविता सादरीकरणातून रसिकांच्या काळजाचा ठाव घेतला. सेलूकर रसिकांनी काव्य मैफिलीस उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्रा.के. डी. वाघमारे हे होते. काव्य मैफिलीचे उद्घाटन प्रेक्षाताई भांबळे यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक काव्य मैफिलीचे आयोजक कै. अण्णासाहेब काकडे सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष अशोक काकडे यांनी केले. काव्य मैफिलीचे बहारदार सुत्रसंचालन कवी सुरेश हिवाळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन कॉ. अशोक उफाडे यांनी केले. काव्य मैफिल यशस्वीतेसाठी संतोष कुलकर्णी, मोहन बोराडे,किशोर कटारे, संदीप काष्टे, अरविंद लहाने, शिवाजी गजमल यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी पुढाकार घेतला.

## बी अलर्ट

प्रा. विजया मारोतकर/ ८३२९५८७६००

# अशाही मैत्रिणी...



‘सकाळी कॉलेजच्या नावाने घराबाहेर पडायचं, अभ्यास वगैरे नावालाच! भटक भवानी नुसती भटकत असते. उद्यापासून अजिबात कॉलेजला जायचं नाही,’बाबांचा रुद्रावतार झाला होता. ते अश्विनीला रागवत होते. आईलाही सांगून गेले. ‘या पोट्टीवर लक्ष ठेव. हिला बिलकुल घराबाहेर जाऊ द्यायचं नाही. मागील काही दिवसांपासून मला माझा तो रमेश वानखडे मित्र सांगतो आहे. परंतु, मी लक्ष दिलं नाही. जेव्हा त्याने विथ प्रूफ मला सगळं दाखवलं. हिचा व्हिडिओही दाखवला. तेव्हा खरं मानावंच लागलं. त्यामध्ये दिसते आहे ही! चक्क एका लॉजमधून त्या बावळटासोबत बाहेर पडताना! माझा मित्र म्हणाला, मला ही पंधरा दिवसांपूर्वीसुद्धा दिसली. पण, मला वाटलं की, माझाच गैरसमज झाला असेल. तोंडाला दुपट्टा बांधला असल्यामुळे माझ्या विशेष लक्षात आले नाही. परंतु त्या दिवशी तिने बांधले नसल्यामुळे मी स्पष्ट ओळखले. तसाच लांबून व्हिडिओ बनवला आणि तुला पाठवत आहे. तो व्हिडिओ त्याने मला दाखवला. तेव्हा माझी ही खात्री पटली. आपण यांच्यासाठी मरमर करून, कष्ट करायचे. यांनी छान शिकून मोठ्या पदावर गेलं पाहिजे, अशी आशा करायची आणि यांनी अशी थेरं करायची. दहावीला बऱ्यापैकी मार्क्स मिळाले म्हणून बारावीला सायन्स दिलं पण, तेव्हा ही वेगळ्याच मार्गाला लागली होती. तिथून कसंबसं बाहेर काढून, सायन्स जमत नाही म्हणून आता कॉमर्स दिलं. तर कॉमर्सला सोपे समजून दिवसभर भटकत राहते. परीक्षेच्या दोन दिवस आधी थातूरमातूर अभ्यास करायचा आणि कसंतरी पास व्हायचं, काय अर्थ आहे अशा शिक्षणाला आणि त्या डिग्रीला...’ संतापलेले बाबा ऑफिसला निघून गेले. अश्विनी आईजवळ रडत सांगायला लागली,‘आई, माझी या मुलासोबत अजिबात ओळख नव्हती. माझी मैत्रीण रागिणीनेच मला या तिच्या बॉयफ्रेंडचा मित्र असलेल्या या मुलासोबत ओळख करून दिली. मागे कॉलेजच्या पिकनिकला जातो म्हणून सांगून, आम्ही कॉलेजच्या पिकनिकला न जाता स्वतंत्रीत्या गाडी करून जबलपूर-भेडाघाटला गेलो होतो. हॉटेल मध्ये राहिलो आणि आई, तिथे नको ते घडलं. आता मी वेगळ्याच प्रॉब्लेममध्ये अडकले आहे.’ असं म्हणून ती रडू लागली. आईने पुन्हा दोन झापडा तिच्या श्रीमुखात दिल्या. ‘काय गोंधळ करून बसलीस? वर तोंड करून सांगायला काही लाज वाटत नाही का?’ अश्विनी नुसती रडत होती. ‘आई, आता अशी स्थिती झाली आहे की, त्याला भेटल्याशिवाय उपाय नाही. त्याला मी म्हटलं की, आता हे कोण निस्तरणार? तर मला म्हणतो की, आपण डॉक्टरकडे जाऊ या! आई, मला डॉक्टरकडे जाणे खूप आवश्यक आहे.’

‘अश्विनी, तू हे काय बोलते? माझ्या अंगावर काटा आलाय. आम्हाला विष खायला भाग पाडणार आहे का तू? आई, मी काय करू ? मला कळतच नाही. हे सारं कसं काय घडत गेलं? अश्विनीच्या बाबतीत हा सारा प्रकार घडला होता. कोंडीत सापडल्यामुळे त्याला पुन्हा भेटणे आवश्यक होते. त्यामुळे तो बोलवेल तिथे ती जात होती. चुकीच्या मैत्रिणीमुळे तिने आपले आयुष्य असे पणाला लावले होते. आज हॉस्टेलवर राहणाऱ्या मुलींचे भविष्य धोक्यात आले आहे. मुलीच मुलींना वेगळ्या मार्गाने घेऊन जातात. एका खोलीमध्ये तीन मुली राहत असतील त्यापैकी दोन मुलींना बॉयफ्रेंड असतील तर त्या तिसरीला पण बॉयफ्रेंड मिळवून देतात. तो या दोन मुलींच्या बॉयफ्रेंडचाच मित्र असतो. ही मुले बाहेरची, रस्त्यावर फिरणारी, पानठेल्यावर रेंगाळणारी, बहुतेक बेरोजगार...अशी असतात. ती ना यांच्या अभ्यासक्रमात सोबत असतात ना नोकरीमध्ये ! तर ही इकडतिकडचीच अशी रस्त्यावर फिरणारी टवाळखोर मुलं, नाव-गाव-पत्ता सारं खोटं सांगून मुलींना अक्षरशः फसवतात. मैत्रीण सांगते आहे म्हणून मुली फसतात. आज मुलींनाच मुलींपासून धोका निर्माण झालेला आहे. हे सत्य आहे त्यामुळे अशा प्रकारांमध्ये घडणाऱ्या मैत्रिणींपासून सावध रहाणे फार गरजेचे आहे.

आज अशा प्रकारांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. आईवडिलांनी काबाडकष्ट करून आपल्याला शिकवायला पाठवलं आहे. आपण त्यांच्या कष्टांची जाणीव ठेवून केवळ अभ्यासाकडेच लक्ष दिलं पाहिजे. हे सारं समजत असूनही उमजत नाही. असं अश्विनीसारख्या मुलींच्या बाबतीत घडत आहे. कितीही ठरवलं तरी या वातावरणाने निर्माण केलेल्या जाळ्यांमध्ये कुठेतरी अडकून जातात आणि नको ते घडतं जातं. ते घडलेलं इतकं भयंकर असतं की, ते जीवावरच उठतं म्हणून मुलींनी स्वतःच्या मनावर ताबा ठेवणं नितांत गरजेचे आहे. आपण सावध व्हायला पाहिजे. ती तिच्या बॉयफ्रेंडचा मित्र असलेल्या मुलासोबत मैत्री करायला सांगते म्हणजे ती योग्य मार्गाने चालायला सांगत नाही, एवढं साधंसं आपल्याला का कळू नये?

जसे तिच्या मैत्रिणीने अश्विनीला सांगितलं,‘अश्विनी, तू नाही का त्या राकेशला खूप आवडते. तो म्हणतो की, माझी एकदा फक्त एकदा तिच्यासोबत भेट घालून दे. बाकीचं मी बघेन. अगं, तुझ्या बारीकसारीक गोष्टी त्याला माहिती आहेत. तू खूप छान गाते, छान बोलते याचं त्याला भारी कौतुक आहे.’ अशा प्रकारे राकेशबद्दल बरंच काही सांगून मैत्रिणीने राकेशसोबत ओळख करून दिली आणि मग काय राकेशने ठरवल्यानुसार आपोआपच अश्विनी त्याच्यामध्ये गुंतत गेली. अवतीभवती नियमित घडणाऱ्या किती घटनांबाबत मुलींना सांगावं, कळत नाही. कालपरवाची उरणमध्ये घडलेली घटना किती भयावह आणि दुर्दैवी आहे. त्या मुलीच्या बॉयफ्रेंडने तिच्या शरीराचे तुकडे केले. मुलींना कळत नाही आणि त्या मुलांमध्ये गुंतत जातात. काही दिवसांतच त्यांच्या लक्षात येतं की, हा बॉयफ्रेंड चुकीचा आहे, आपल्या योग्यतेचा नाही. मग ती त्याला भेटायचं टाळते. त्यावेळेला तो तिचे जुने फोटो, माहिती, चॅट, व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देतो. या धमकीमुळे मुली पुन्हा त्या चिखलात फसत जातात. आपली ही चूक झाली. त्यामुळे आपण आता त्याचं ऐकायलाचं हवं. काय करावे? तिला सुचत नाही.

तारुण्यात अनेकदा चुकीची वळण येतात. त्या वळणांवर थांबून योग्य निर्णय घेता आलाच पाहिजे. एक वळण चुकलं की, पुढचा रस्ता गुंतागुंतीचा होतो. जो मुलीचे, तिच्या आईवडिलांचे आयुष्य उध्वस्त करतो. समाज त्या घराकडे वेगळ्या नजरेने बघतो. पुढचे जीवन जगणे कठीण होते. काहीही चूक नसताना हा समाज दंड भोगावा लागतो. तेव्हा कुठे पोरीला वाटते की, काही चूक नसताना माझ्या आईबाबांना सारं सहन करावं लागलं. कशाला जन्माला आली ही कुलटा म्हणून मला दोष देत होते. त्यांच्यावर अशी वेळ आणली कोणी? तर मी!

रात्री उशिरापर्यंत मित्रमैत्रिणींसोबत पार्ट्या, तोकडे कपडे घालून, सिगारेट फुंकणाऱ्या मद्यधुंद मुली! त्यांच्या व्यसनाधीन अवस्थेचा गैरफायदा घेणारे ‘बॉयफ्रेंड’! या सगळ्यांचा परिणाम होऊन सामाजिक स्वास्थ्य बिघडलं आहे. आता याच सर्व वर्तुळात आपल्याला जगायचंय. तेव्हा आपला मार्ग आपल्यालाच शोधावा लागेल. आजूबाजूला काटे आहेत मग, आपण चालायचंच नाही का? नक्कीच चालायचं. नव्हे तर या वाटेवर कसं चालावं? असा विचार करावा लागेल. संस्कारांची,स्वनियंत्रणाची आपल्याकडे असलेली कवचं पायामध्ये घालून आपण आपल्या वाटेवरून बिनधास्त ध्येयापर्यंत चालत जायचं. परंतु, आपण पादत्राणं काढून ठेवली तर हे काटे पायाला रक्तबंबाळ करणारच. हे इतकं सरळ सोपं आहे. म्हणून गं लेकींनो पावलोपावली बी अलर्ट...!

> रात्री उशिरापर्यंत मित्रमैत्रिणींसोबत पार्ट्या, तोकडे कपडे घालून, सिगारेट फुंकणाऱ्या मद्यधुंद मुली! त्यांच्या व्यसनाधीन अवस्थेचा गैरफायदा घेणारे ‘बॉयफ्रेंड’! या सगळ्यांचा परिणाम होऊन सामाजिक स्वास्थ्य बिघडलं आहे. आता याच सर्व वर्तुळात आपल्याला जगायचंय. तेव्हा आपला मार्ग आपल्यालाच शोधावा लागेल. आजूबाजूला काटे आहेत मग, आपण चालायचंच नाही का? नक्कीच चालायचं. नव्हे तर या वाटेवर कसं चालावं? असा विचार करावा लागेल.

## ती

जयश्री दाणी/ ८२७५४८८११४

# बँडिट क्वीन फुलनदेवी!



ऑगस्ट महिन्यात पाऊस असला तरी विविधरंगी फुलं सृष्टीविभ्रमात भर घालतात. म्हणूनच एका गरीब नावाड्याच्या घरी १० ऑगस्ट रोजी जन्मलेल्या मुलीचे नाव फुलन ठेवण्यात येते. फुलांसारखं कोमल मन असणारी ही मुलगी पुढे, कुख्यात डाकू फुलनदेवी होईल, असं त्यावेळी कुणालाही खरं वाटलं नसतं. फुलनचं आयुष्य केवळ दरोडे-खून यावरच भाष्य करत नसून, समाजातील भेदभाव, यौनशोषण, अशिक्षितपणा, हुंडा, जातीव्यवस्थेतील विद्रुपतेवर परखड बोट उचलते.

साध्या स्वभावाचे वडील आणि कडक स्वभावाची आई असणाऱ्या या अश्राप मुलीला अचानक हातात बंदूक का घ्यावी लागली? या प्रश्नाचे उत्तर काळीज चिरणारे आहे. तीन बहिणी आणि एक भाऊ असणाऱ्या फुलनच्या वडिलांची सारी शेती चुलत्याने कपटाने हडपली. तो त्यांना नेहमी मारझोड करीत धमकावत असे. दुसऱ्यांच्या शेतात राबणं, गवंडी कामाला जाणं अशी काम फुलन आणि तिची भावंडं करीत. बरेचदा अर्धपोटी, उपाशी रहात. अकराव्या वर्षी फुलनचं लग्न तिच्या वडीलांच्या वयाएवढ्या दुष्ट इसमाशी झालं. फुलन वयात येण्याआधीच त्याने तिचे यौनशोषण केले. त्या नराधमाला कंटाळून फुलन वारंवार माहेरी पळून यायची पण, तिथे तिच्या पदरी पडायच्या त्या अवहेलनाच! एके दिवशी तिचा नवराच पळून गेला, त्याने दुसरे लग्न केले. तर, नवरा नसणारी बाई म्हणून गावातील टारगट लोकांसोबतच सरपंच, पाटील तिच्याकडे वाकड्या नजरेने बघू लागले.

क्षुल्लकशा चुकीसाठी सरपंचाच्या मुलाने पंधरा वर्षाच्या फुलनवर तिच्या आईवडीलांदेखत बलात्कार केला. फुलनने पोलिसांकडे दाद मागितली. पण, उलट तिच्यावरच आरोप करीत तिला आणि तिच्या वडीलांना तुरुंगात टाकण्यात आलं. जेलमधून सुटून गावी आल्यावर, सरपंचाने बाबू गुज्जर या डाकूला तिची सुपारी दिली. बाबू गुज्जरने तिच्यावर बलात्कार केला. पण, ते बघून त्याच्याच गँगमधला डाकू विक्रम मल्लाह याने बाबू गुज्जरला ठार करून फुलनला वाचवलं. तो फुलनच्याच जातीचा असल्यामुळे त्याने हा गुन्हा केला.

आता फुलन डाकूंच्या टोळीमध्ये सहभागी झाली. गावोगावी दरोडे टाकायचे, श्रीमंतांना लुटून गरीबांना मदत करायची. डाकू फुलनने तिच्यावर अत्याचार करणाऱ्या सरपंच पाटलाला बडवलं. फुलनचा बदला घेण्यासाठी तिची निर्वस्त्र धिंड काढली गेली आणि तिच्यावर अनेकजणांनी अमानुष बळजबरी केली. यातून फुलन कशीबशी सुटका करून पळाली व या क्रूर कृतीचा जबरदस्त वचपा काढण्याचं ठरवलं. फुलनने तिच्यावर अत्याचार करणाऱ्या श्रीरामला लपविण्यासाठी मदत करणाऱ्या ठाकूरांना एका रांगेत उभे करून गोळ्या घातल्या. वाऱ्याच्या वेगाने देशभर पसरलेल्या या बातमीने एक सामान्य मुलगी फुलन भारतातील मोस्ट वॉन्टेड डाकू बनली.

१९७६ ते ८३ असा काळ चंबळच्या दऱ्याखोऱ्यांत डाकू म्हणून गाजवल्यावर फुलनने १२ फेब्रुवारी १९८२ रोजी मध्य प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांसमोर आत्मसमर्पण केलं. बारा वर्षे तुरुंगात घालवल्यानंतर १९९४ मध्ये तिच्यावरील सर्व आरोप माफ होऊन ती जेलमुक्त झाली. वर्ष १९९६ मध्ये ती समाजवादी पक्षाकडून मिर्झापूरची खासदार होऊन संसदेवर गेली.

२५ जुलै २००१ रोजी दिल्लीतील शासकीय निवासस्थानाबाहेर तिची गोळ्या मारून हत्या करण्यात आली. एक अल्लड, निरागस बालिका ते प्रलयंकारी डाकू असा हा फुलनचा प्रवास थरकाप उडविणारा आहे.

## साप्ताहिकी

अपर्णा विचोरे-आठल्ये/ ९८२२७०१०६२

# मनमोहिनी ‘मृगनयनी’

**संगीताचा आस्वाद घेतानासुद्धा पडदापद्धती सुटत नव्हती. अशा परिवारात मुक्त निन्नी बैजूकडून संगीताचे धडे घेते, हे तर कल्पनेपलीकडचे होते.**

**काल** यु ट्युबवर ग्वाल्हेरच्या आसपासची पर्यटन स्थळे शोधत असताना राजा मानसिंग तोमरचा महाल बघायला मिळाला. राणीवशातील स्त्रियांसाठी खूप बारकाईने विचार करून महाल घडवलेला जाणवलं. राण्यांची सुरक्षितता, सोय आणि मनोरंजनाचा विचार करून बांधलेल्या, आजही मजबूत असलेल्या वास्तूला बघताना आपले स्थापत्यशास्त्र तेव्हाही किती प्रगत होते ते कळतं.



राणीवशाची माहिती देताना गाईडच्या तोंडून राजाच्या नऊ राण्यांचा उल्लेख झाला पण, राणीवसा मात्र आठ राण्यांचे अस्तित्व दर्शवत होता. नववी राणी तिथे रहात नव्हती आणि मला जाणवलं ही तर आपल्या ‘मृगनयनी’ची कथा! तोमरवंशीय शूर राजा मानसिंग हा तेव्हाच्या रिवाजानुसार पाठराख्यांची संख्या वाढवण्यासाठी आठवेळा विवाहबद्ध झाला होता पण, तो राजकारणाचा भाग होता. त्याच्या मनात प्रणय भावना फुलवली ती वनकन्या निन्नीने! निन्नीच्या सर्व अटी मान्य करून तिला सोबत घेऊन मानसिंग राजवाड्यात परतला आणि खळबळ माजली. राजाचं नववं लग्न ही काही अनपेक्षित बाब नव्हती. समाज आणि कुटुंब (पक्षी: राणीवसा) मानसिकदृष्ट्या त्यासाठी अनुकूलच होता. पण, अनागर संस्कृतीतील, राजघराण्यातील नसलेली मुलगी सवत म्हणून किंवा राणी म्हणून स्वीकारणं अवघडच होतं. त्यातून, निन्नी स्वतःच्या अटींवर राजधानीत आली होती, हे तर प्रस्थापितांकडून सर्वस्वी अस्विकृत होतं. मग, घडलेला इतिहास कादंबरी रुपात आजच्या समाजापुढे सादर केला. प्रसिद्ध हिंदी साहित्यिक वृंदावनलाल शर्मा यांनी ‘मृगनयनी’ या कादंबरीद्वारे आणि दूरदर्शनच्या प्रेक्षकांपर्यंत ती पोहचली अमोल पालेकर निर्मित ‘मृगनयनी’ या मालिकेद्वारे!

‘मृगनयनी’ त्या कालखंडातील लक्षवेधी मालिका ठरली. मुख्य भूमिकेत होते राजबिंडे मोहन भंडारी आणि आपल्या अभिनयाने अल्पावधीतच लोकप्रिय झालेली अभिनेत्री पल्लवी जोशी! याशिवाय रेखा सहाय, स्मिता जयकर यांनी मालिकेतील भूमिकांना योग्य न्याय दिला.

खरंतर, निन्नी गुज्जरी, जिचं पुढे ‘मृगनयनी’ असं नामकरण झालं. ही तत्कालीन समाजावर प्रभाव टाकणारी वीरमाता होती. त्याचबरोबर, ती आपल्या सांस्कृतिक मुळांना जपणारी होती म्हणूनच, मानसिंग तिच्याकडे आकर्षित झाला. कादंबरीतील हे पैलू मालिकेत दाखवले गेलेच नाहीत. निन्नीचं राजासोबतच साहचर्य प्रेमिकेचं होतं, एकमेकांसाठीची आंतरिक ओढ हा त्याचा पाया होता. पती-पत्नी संबंधातही राजकारण, आपापल्या कुळमर्यादा, दर्जा यांचं अस्तित्व जोपासणाऱ्या राणीवशात पतीच्या आयुष्यात राजकारणातला मोहरा हेच स्थान असलेल्या राण्यांच्या मनात निन्नीबद्दल पराकोटीचा सवती मत्सर आणि स्वतःबद्दल न्यूनगंड उपजला नसता तरच नवल होतं. याचं चित्रण मात्र दिग्दर्शकाने छानच केलं. संगीताचा आस्वाद घेतानासुद्धा पडदापद्धती सुटत नव्हती. अशा परिवारात मुक्त निन्नी बैजूकडून संगीताचे धडे घेते, हे तर कल्पनेपलिकडचे होते. निन्नीचे नागर सामाजिक संकेत धुडकावणे, त्यातून उद्भवणारा पारिवारिक आणि सामाजिक रोष, निन्नीच्या तथाकथित गैरवर्तणुकीला राजाने प्रेमापोटी पाठीशी घालणं, बैजू-निन्नी- मानसिंग यांच्या काल्पनिक प्रेम त्रिकोणाला दिलेले अवास्तव महत्त्व असे अनेक दोष असले तरी अभिनय, कथावस्तू या मुद्द्यांमुळे ‘मृगनयनी’ प्रेक्षकांच्या कायम स्मरणात राहिली.

## रानभाज्यांच्या जगात

संगीता ठलाल / ७८२१८१६४८५

# आरोग्यवर्धक, गुणकारी अरतफरी

रानात मिळणारी फळं, भाज्या, कंदमुळं या सर्वच गुणकारी असतात. सोबतच, ते आरोग्यासाठी लाभदायक असतात. आजकालची खाद्यपद्धती काळानुसार बदलत चालली आहे. विविध आजारांना तोंड देत, आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी रानातील भाज्यांचा आहारात समावेश असणं आवश्यक आहे. अशीच एक गुणकारी भाजी म्हणजे ‘अरतफरी’! ही जास्त करून रानात सापडते किंवा रस्त्याच्या कडेला दिसते. तिचे झुडूप असते सोबतच, मोहाच्या वृक्षाखाली ती उगवलेली दिसते. कुंदाच्या मोठ्या वेलीसदृश झाडासारखी ती वाढते. अरतफरीची भाजी पचन आणि वातविकारांवर विशेष गुणकारी आहे. एवढेच नाही तर ती खूप गरम असते. ही भाजी जास्त किंवा वारंवार खाल्ल्यास पोटदुखी होण्याची शक्यता असते. म्हणून या भाजीला प्रमाणातच खायला हवे. अरतफरी भाजीची पानं थोडीफार कुंदाच्या पानांसारखी दिसतात. तिच्या बारीक आणि उंच गेलेल्या फांद्यांच्या टोकांवर कोवळी पाने येतात. त्यांना झाडीबोलीत कोवळे डीरे म्हणतात आणि तेच खाल्लेही जातात. या भाजीला लहान पिवळसर रंगाची फळंसुद्धा लागतात पण, ही फळं खाल्ली जात नाहीत. भाजीला एक वेगळा गंध असून, गरमागरम भाजी खूपच चविष्ट लागते. विदर्भातील अनेक रानात या भाजीचे झुडूप बघायला मिळते. ही भाजी बनविण्याची पद्धत फार सोपी आहे. आधी त्या कोवळ्या डिऱ्यांना बारीक चिरून घ्या. नंतर, त्यांना धुवून एखाद्या चाळणीत पंधरा मिनिटे ठेवावं जेणेकरून सर्व पाणी सुकून जाईल. नंतर कढईत तेल तापवून घ्यावे. या भाजीला भरपूर कांदे लागतात त्यामुळे बारीक चिरलेले कांदे घालून कडक फोडणी द्यावी. त्यात सुकलेल्या लाल मिरच्या, मीठ आणि हळद घालून छान एकजीव करून घ्यायचं. कढईवर झाकण ठेवून कमी आचेवर शिजवलं की, पाच मिनिटांनी धुतलेली भाजी त्यात घालून चांगली परतून घ्यावी. पाण्याचा एक थेंबही न टाकता भाजी शिजते. या खमंग भाजीचा सुगंध हातांतून तासभर तरी जात नाही. गरम भाकऱ्या किंवा चपातीसोबत ही भाजी खाल्ली जाते. बाजारात सहज मिळणारी ही अरतफरीची भाजी निसर्गाच्या सान्निध्यात वाढलेली आणि आरोग्याला लाभदायक असते. वर्षभरात जेव्हा संधी मिळेल तेव्हा ही भाजी आवर्जून खाल्लीच पाहिजे.



# याद करो कुर्बानी!

पंकज पाटील/९८५०४३०५७९

**ऑगस्ट महिना भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील क्रांती पर्व मानला जातो. जगाला शांततेचा संदेश देणाऱ्या राष्ट्रपिता महात्मा गांधींनी ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत काँग्रेसच्या सभेत भारत छोडो, चले जाव हा ठराव पास करून घेतला. नंतर, गोवालिया टँक येथील सभेत तत्कालीन ब्रिटिश सरकारला ‘भारत छोडो, चले जाव’ असा खणखणीत इशारा दिला. ९ ऑगस्टपासून महात्मा गांधींच्या आव्हानाचे उग्र पडसाद पूर्ण भारतभर उमटले. जशा सागराच्या एका पाठोपाठ एक लाटा उसळतात तशा ब्रिटिश शासनावर जनलाटा आदळू लागल्या. महात्मा गांधींच्या अहिंसक मार्गाने ब्रिटिश सरकारच्या विरोधात ‘करो या मरो’ चा लढा लोक जिद्दीने ऑगस्ट क्रांती लढा म्हणून लढवू लागले.**



यालढ्याचे रणशिंग वाजल्यावर सबंध देशभर एक अभूतपूर्व जागृती झाली. आंदोलन मोठ्या प्रमाणावर भडकण्याचा रंग दिसत होता. ब्रिटीश सरकारने महात्मा गांधी, पंडीत जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल अशा दिग्गजांना ताब्यात घेत अटकसत्रच राबविलं. इंग्रज सरकारच्या या कारवाईचे तीव्र पडसाद देशभरात गावोगावी दिसू लागले. नेत्यांची दुसरी फळी पुढे सरसावली आणि त्यांनी ‘करेंगे या मरेंगे’ अशी घोषणा देऊन चळवळीचा आगडोंब उसळू दिला. सामान्य जनतेने केलेल्या सत्याग्रह, नि:शस्त्र प्रतिकार त्यांच्याबरोबर सशस्त्र आंदोलनालाही उधाण आलं. सर्वत्र हरताळ, बहिष्कार, मोर्चे यांची धुमश्चक्री उडाली. अनेक समाजवादी नेत्यांनीसुद्धा सरकारला दे माय धरणी ठाय करून टाकले.

भारतभर तारायंत्रे तोडणे, रेल्वे स्टेशन व पोस्ट ऑफिस लुटणे, सरकारी कार्यालय जाळणे, युरोपियन व्यक्तींवर हल्ले चढवणे इत्यादी कृत्यांना ऊत आला. ही क्रांती दडपण्यासाठी ब्रिटिशांनी जनतेविरुध्द दमन व अटक सत्र सुरू केले. भारतभर चलेजाव चळवळ दिवसेंदिवस उग्र रूप धारण करू लागली. भारतातील प्रमुख तुरुंग क्रांतिकारकांच्या कारावासाने तुडुंब भरले. सरकारने दडपशाहीचा कहर करूनही चळवळ रोखली जाईना. तिकडे युरोपातील युद्धात इंग्रज सरकारला हिटलरी सैन्यापुढे जबरदस्त मार खावा लागला. सुभाषबाबू तर जपानी सैन्याच्या सहकार्याने भारताच्या पूर्व द्वारापर्यंत येऊन ठेपले होते. त्यांनी आपल्या सेनेला दिल्लीवर हल्ला चढवण्याचा आदेशही दिला. आझाद सैनिकांची भारताच्या दिशेने आगेकूच सुरू झाली. दुर्दैवानं यावेळी युरोपातील युद्धात दोस्त राष्ट्रांना म्हणजे अमेरिका, इंग्लंड व फ्रान्सचा विजय झाला. त्यामुळे इंग्रजांना दम घेण्यास वेळ मिळाला. तथापि, त्यांची मुजोरी ओसरली. वाट्टेल त्या स्थितीत भारताला स्वातंत्र्य दिलंच पाहिजे, अशी वेळ आली.

स्वातंत्र्य संग्रामात राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, रंगो बापूजी, अझीमुल्ला, मंगल पांडे, वासुदेव फडके, दादाभाई नौरोजी, लोकमान्य टिळक, दामोदरपंत व बाळकृष्ण चापेकर, अरविंद व बारींद्र घोष, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, बिपीनचंद्र पाल, खुदिराम बोस, सेनापती बापट, सत्येंद्र बसू, कन्हैयालाल, विनायकराव व गणेशपंत सावरकर, लाला हरदयाळ, रासबिहारी बोस, चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्यासह अनेक अज्ञात राष्ट्रभक्तांनी आपापल्या परीने योगदान दिलं. फाशी, जन्मठेप, तुरुंगवास आणि तुरुंगातील अनन्वित छळ अशा शिक्षा त्यांनी भोगल्या.

क्रांतीदिन ९ ऑगस्ट हा देशासाठी प्राणपणाने लढलेल्या सर्व महान सुपुत्रांचा स्मरण दिवस मानला जातो. भारत छोडो आंदोलनाच्या माध्यमातून क्रांतीची मशाल पेटवून, सर्वस्व राष्ट्रार्पण करत भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या सर्व महान क्रांतिकारकांची कृतज्ञतापूर्वक आठवण काढून त्यांना त्रिवार वंदन करू या!

CMYK

# लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

## ‘किलबिल’च्या जान्हवी जाधवची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. २१ ऑगस्ट-**

१६ ते १८ ऑगस्ट दरम्यान मुंबई येथे पार पडलेल्या १७ वर्षीय कॅडेट राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत किलबिल नॅशनल स्कूल शाळेची खेळाडू जान्हवी जाधव हिने इप्पी सांघिक प्रकारात सुवर्णपदक पटकावले.

तर सेबर प्रकारातही सुवर्णपदक पटकावले. या खेळाडूंना शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्रा .दत्ता गलाले यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. या राज्यस्तरीय स्पर्धेत घवघवीत यश संपादन करीत तिची पुढे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे त्याबद्दल जान्हवी व तिचे वडील गणपतराव जाधव यांचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात




आला त्यापसंगी संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले, प्राचार्य संतोष पाटील, कार्यालयीन अधीक्षक सचिन जगताप, धर्मेंद्र शिराळे यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त



### उबाठा शिवसेनेच्या उपतालुकाप्रमुखपदी अमोल ढोरसिंगे यांची नियुक्ती

**निलंगा, दि. २१ ऑगस्ट-**

निलंगा तालुक्यातील अनेक दिवसांपासून रखडलेल्या नियुक्तीला वेग देत आज अमोल ढोरसिंगे यांची निलंगा तालुक्यातील उपतालुकाप्रमुख व औराद शहाजानी शहरप्रमुख म्हणून लखन बोंडगे यांच्या नियुक्ती करण्यात आल्या. पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे व शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांच्या आदेशावरून शिवसेना नेते आ. सुनील प्रभु, लातूर जिल्हा संपर्क प्रमुख आ.रोहिदास चव्हाण, लातूर जिल्हा प्रमुख दिनकरराव माने यांच्या सुचनेनुसार नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी तालुकाप्रमुख अविनाश दादा रेशमे, निलंगा शहरप्रमुख सुनिल नाईकवाडे, शिवसैनिक गोविंद मोरे, विशाल सांडवे, राहुल डावरगावे व इतर शिवसैनिक उपस्थित होते.



### जिल्हास्तरीय रायफल शुटिंग स्पर्धेमध्ये महाराष्ट्र महाविद्यालयाचे यश

**निलंगा, दि. २१ ऑगस्ट-**

महाराष्ट्र कनिष्ठ महाविद्यालयाचा लातूर येथे झालेल्या जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेमध्ये महाराष्ट्र कनिष्ठ महाविद्यालयाचे मुले विजयी झाले. त्यामध्ये ओपन साईट एअर रायफल जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्र महाविद्यालयाच्या किरवले नंदकिशोर गणपती, पवार चंद्रशेखर पुरुषोत्तम, गिरी ऋषिकेश राजगिरा तीन विद्यार्थ्यांची विभागासाठी निवड झाली. त्याबद्दल यशस्वी खेळाडूंचे महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर, समन्वयक दिलीप धुमाळ, प्राचार्य माधव कोलपुके, उपप्राचार्य प्रशांत गायकवाड यांनी कौतुक करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या सर्व खेळाडूंना क्रीडा समन्वयक प्रा. एस.आर. वाघमारे व यशोदा पाटील यांनी मार्गदर्शन केले. तसेच या स्पर्धेसाठी प्रा. श्रीकृष्ण दिवे, प्रा. दत्ता गोसलवाड, प्रा. प्रदीप घोडके यांनी सहकार्य केले.



### हिप्पळगाव येथील मुस्लिम बांधवांनी केला भारतीय जनता पक्षात प्रवेश

**शिरूर अनंतपाळ, दि. २१ ऑगस्ट-**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील हिप्पळगाव येथील आज अनेक मुस्लिम कार्यकर्त्यांनी निलंगा येथील माजी पालकमंत्री तथा विद्यमान आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्या निवासस्थानी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर यांच्या साक्षीने भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला. यावेळी अरविंद पाटील निलंगेकर हे या पक्षप्रवेशाच्या कार्यक्रमास उपस्थित राहून या सर्वांचे पक्षामध्ये स्वागत केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. पक्ष प्रवेश केलेले मान्यवर: सय्यदजी सत्तार, जहीरजी शेख, रहेमान शेख, सद्दामजी शेख, मौलाजी शेख, समीरजी शेख, मेहराज शेख, हबीबजी शेख, मुजावर सोहेल, जामूजी शेख, दाऊत शेख, मन्सूरजी शेख यांच्यासह सहकार्यांनी यावेळी पक्षप्रवेश केला. याप्रसंगी तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, तालुका चिटणीस महेश लुल्ले,अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष अजीमजी मुल्ला, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष प्रसाद पाटील, सरचिटणीस सागर मुरुडकर आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

### चंद्रकलाबाई पेंटमशेटे यांचे निधन

**शिरुर अनंतपाळ, दि. २१ ऑगस्ट-**



चंद्रकलाबाई मारुती पेंटमशेटे यांचे दि. २१ ऑगस्ट रोजी दुपारी तीन वाजता वयाच्या ८५ वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले. यांच्यावरती दिनांक २२ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात दोन मुली, एक मुलगा आहे. ज्ञानोबा पेंटमशेट्टे यांच्या मातोश्री आहेत.

### मारुती धोत्रे यांचे निधन

**लातूर, दि. २१ ऑगस्ट-**



वडारवाडा सावेवाडी येथील रहिवाशी मारुती लालू धोत्रे यांचे अल्पशा आजाराने बुधवारी सकाळी निधन झाले. ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे प्रभारक (सेवानिवृत्त कर्मचारी)होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सूना, नातवंडे असा परिवार आहे. भाजपचे पप्पू धोत्रे यांचे ते वडील होत.

# ‘निळकंठेश्वर’च्या विकासासाठी निधी कमी पडणार नाही

## आ. अभिमन्यू पवार; किल्लारीतील ११ दिवसीय निळकंठेश्वर यात्रा महोत्सवास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**औसा दि. २१ आगस्ट-**

गेल्या चार वर्षात अनुशेष भरुन काढत किल्लारीच्या विकासासाठी भरघोस निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच तालुका निर्मितीसाठी प्रयत्न सुरू आहेत. बंद पडलेला किल्लारी शेतकरी साखर कारखाना सुरू करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना हक्काचा कारखाना तर मजुरांच्या हाताला काम दिले आहे. याचा मनस्वी आनंद सर्वांनाच मिळत आहे. येथील कुलदैवतांच्या आशिर्वादामुळे आमदार झालो असून असाच आशिर्वाद कायम राहवा. यासाठी निळकंठेश्वर देवस्थान च्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही. लागेल तेवढा निधी उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाही आमदार अभिमन्यू पवार यांनी दिली आहे.

औसा तालुक्यातील नवीन किल्लारी निळकंठेश्वर मंदीरापासून पालखी सोहळा चालू झाला. ढोल ताशा, टाळ मृदंगाच्या निनादात भक्तांनी हाती पताका घेऊन ॐ नमः शिवाय, हरहर महादेव, शिव शिव संब सदाशीव या मंत्रोपचाराचा जयघोष करीत किल्लारी पाटी मार्गे जुने गावात प्रदिक्षिणा केली. निळकंठेश्वर मंदीरापासून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या ईश्वर दोह येथील शिवलींग पिंडीस भेट दिली. परत निळकंठेश्वर मंदीरात येऊन महापूजा भजन आरती करण्यात आली. यानंतर माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, आ.अभिमन्यू पवार यांच्या हस्ते पूजा करुन यात्रा मूर्ती स्थापना व यात्रेस सुरवात झाली. याप्रसंगी आ. अभिमन्यू पवार बोलत होते.

याप्रसंगी निळकंठेश्वरांची महापूजा करुन यात्रा मूर्तीची स्थापना माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी



शोभा पवार, अर्चना पाटील, कर्नाटकचे आमदार शिध्दू पाटील उपस्थित होते.सर्व पाहुण्याचा सत्कार मंदीर ट्रस्टच्या वतीने करण्यात आला. जवळपास दहा किलोमीटर पालखी सोहळा झाला. पालखी सोहळ्यात हजाराच्या संखेत भाविक पुरुष व महिलांनी सहभाग घेतला होता. या यात्रेच्या व्यवस्थापनाची देवस्थान समितीने जय्यत तयारी केली आहे. सपोनी विशाल शहाने यांनी पालखी सोबत पोलिस उपनिरिक्षक अशोक ढोणे, प्रशांत राजपुत, गोपाळ शिंदे आबासाहेब ईगळे, बीट जमादार किसनराव मरडे, आर.जी माळी, मुरली दन्तराव, बालाजी कांबळे ,धनराज कांबळे बापू मुळे, ट्राफिक पोलीस दत्ता जाधव जाधव,कृष्णा गायकवाड , कमाल शेख,महीला पोलीस याना घेऊन चोख बेदोबस्त सोबत ठेवला होता. यात्रा अकरा दिवस चालणार असून दररोज प्रवचन, भजन, रोज रात्री नऊ ते बारा पर्यंत नामांकीत कर्तनकाराचे कीर्तन, रात्रभर भजन तसेच मोफत नेत्र तपासणी,शस्त्रक्रिया, रक्तदान, समाज प्रबोधन आदी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## अन्न पुरवठा विभाग जिल्हा दक्षता समिती अशासकीय सदस्यपदी अभिजीत औटे

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २१ ऑगस्ट-**



महाराष्ट्र राज्य क्रिडा युवक कल्याण व बंदरे मंत्री संजय बनसोडे यांच्या शिफारस व ग्राम विकास मंत्री पालकमंत्री लातूर गिरीश महाजन यांच्या शिफारस नुसार लातूर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर खुगे यांनी निवड केली. या निवडीबद्दल आमदार विक्रम काळे, आमदार बाबासाहेब पाटील, अफसर शेख, पंडित धुमाळ, दिपाली औटे, ॲड. व्यंकट बेद्रे, समीर शेख, खाजा तांबोळी, शफी हाशमी, प्रदिप जोधंळे, सुलेमान शेख, प्रविण भोळे, बालाजी भोसले, वसंत पाटील, शहर अध्यक्ष सय्यद जानी, कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, महिला शहर कार्याध्यक्ष वैशाली कांबळे, युवती शहराध्यक्ष काजल मिरजगावे, कार्याध्यक्ष सुनिता तेलंगे, राजकुमार चव्हाण, महात्मा पब्लिक स्कूल संचालिका संगीता नेत्रगावे आदींनी अभिनंदन केले आहे.

## उदगीर ते देगलूर महामार्गासाठी ८१० कोटी मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २१ ऑगस्ट-**

उदगीर मतदार संघाला जोडणारे सर्व रस्ते पूर्ण झाले असून त्यातच आणखी एका रस्त्याची भर म्हणून उदगीर ते रवी मार्गे देगलूर हा महत्वाचा रस्ता मंजूर करावा म्हणून केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीनजी गडकरी यांच्याकडे क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी वेळोवेळी मागणी केली होती. त्यांच्या मागणीचा विचार करून केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांनी उदगीर - रावी - देगलूर या रस्त्यासाठी ८१० कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी दिली आहे.

दोन जिल्ह्याला जोडणारा हा अत्यंत महत्वाचा रस्ता मंजूर करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षापासून होती. उदगीर शहर हे तीन राज्याच्या सीमेवर असल्याने या भागात मोठी रहदारी व वाहतूक असते. या भागातील मोठ्या बाजारपेठेमुळे येथे देगलूर, निजामाबाद, मुक्रमबाद, करडखेल, मरखेल, बिलोली, मुखेड, रावी, हाळणी व इतर भागातुन नागरिकांची वर्दळ असायची मात्र देगलूरहुन उदगीरला ये - जा करण्यासाठी एक पदरी रस्ता असल्याने वाहनधारकांना मोठी अडचण निर्माण होत होती. म्हणून नागरिकांची गैरसोय लक्षात घेवुन उदगीरचे आमदार व राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केंद्रीय मंत्री नितिन गडकरी यांच्याकडे उदगीर ते देगलूर हा रस्ता करुन द्यावा म्हणून वेळोवेळी दिल्ली येथे ना.नितीन गडकरी यांची भेट घेवुन मागणी केली होती. त्यांच्या मागणीला यश आले असुन सदर रस्ता ना.गडकरी यांनी मंजूर केला आहे. राष्ट्रीय महामार्गावर - ६३ हा उदगीर ते रावी मार्गे देगलुर सगरोळी हा रस्ता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नव्याने मंजूर केल्याने ना.नितीन गडकरी व या रस्त्याच्या कामासाठी उदगीर तालुक्याचे भुमीपुत्र अमोल पाटील कौळखेडकर यांचे देखील सहकार्य लाभल्याने क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## मंगेशकर महाविद्यालयात अ विभागीय क्रॉस कंट्री स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २१ ऑगस्ट-**

तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२० ऑगस्ट रोजी अ विभागीय क्रॉस कंट्री स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत विभागांतर्गत विविध महाविद्यालयातील ३९ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उदघाटन औराद शहाजानी येथील लाईफ लाईन मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. ज्ञानेश्वर कदम व शारदोपासक शिक्षण संस्थेचे उपसचिव पंकज बियाणी यांनी केले. याप्रसंगी डॉ.महेश बेंबडे, सिनेट सदस्य स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटनपर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विजयकुमार पवार यांनी केले. स्पर्धेनंतर आयोजित पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी शारदोपासक शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बगदुरे होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी डॉ. कैलास पाळणे अध्यक्ष, क्रीडा अभ्यास मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, डॉ. नितेश स्वामी सचिव अ विभागीय क्रीडा स्पर्धा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, माजी प्रा.व्यंकटराव चिंते, संस्थेचे संचालक अनिल डोईजोडे, गोपाळ भिंगोले, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.प्रदीप पाटील, शारीरिक शिक्षण संचालक प्रा.विजयकुमार हंडे इत्यादी उपस्थित होते.

प्रस्तुत अ विभागीय क्रॉस कंट्री स्पर्धेत दयानंद कला महाविद्यालय लातूर यांनी प्रथम क्रमांक, जयक्रांती महाविद्यालय लातूर यांनी द्वितीय क्रमांक व महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा



यांनी तृतीय क्रमांक संपादन केला. याप्रसंगी डॉ. कैलास पाळणे व डॉ.महेश बेंबडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. महेश बेंबडे यांनी खेळाडूंच्या टिए डीए मध्ये विद्यापीठाने वाढ केली आहे आणि रोखीने देण्याचा निर्णय घेतला असल्याचे सांगितले. तसेच खेळाडूंना देण्यात येणाऱ्या विविध सवलतीबाबत माहिती दिली. अध्यक्षीय समारोप रमेश बगदुरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शंकर कल्याणे यांनी केले. यावेळी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांसह विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व खेळाडू उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी गठित करण्यात आलेल्या विविध समित्यांमधून महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसह प्रा. विजयकुमार हंडे, मियाँसाब सय्यद व प्रसाद रेड्डी यांनी परिश्रम घेतले.

## महायुती सरकारमुळेच ‘मार्टी’ ची स्थापना

### भविष्यात उदगीर येथे विमानतळ, मेडिकल कॉलेज उभारणार

### क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २१ ऑगस्ट-**

गेल्या अनेक वर्षापासून मुस्लीम समाजाची मागणी होती की मुस्लीम समाजातील विद्यार्थ्यांना देशात व परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी मार्टी योजना लागू करावी त्यांच्या या मागणीची दखल महायुती सरकारने घेवून मार्टी योजनेची स्थापणा केली असल्याचे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केले.

ते उदगीर येथील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अल्पसंख्यांक विभाग प्रमुख कार्यकर्ता बैठकीस मार्गदर्शन मेळाव्यात बोलत होते. यावेळी अहमदपूरचे आमदार बाबासाहेब पाटील, प्रदेश अध्यक्ष इद्रीस नायकवाडी, महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष वसीम बु-हाण, शफी शेख, मोबीन सिद्दीकी, जिल्हाध्यक्ष अफसर शेख, प्रदेश सरचिटणीस ॲड.व्यंकट बेद्रे, प्रदेश सरचिटणीस समीर शेख, खाजा तांबोळी, अल्पसंख्यांकचे



जिल्हाध्यक्ष शफी हाशमी, श्याम डावळे, प्रविण भोळे, तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, समद शेख, नजीर हाशमी, फय्याज शेख, चंद्रशेखर पाटील, इब्राहिम देवर्जनकर, दत्ता पाटील, वैशाली कांबळे, औटे, अभिजित औटे, अझहर मोमीन, इब्राहिम पटेल, फेरोज पठाण, अशदुल्ला बेग, रऊफ शेख, मधुमती कनशेट्टे, काजल मिरजगावे, खाजा पटेल, अतिक शेख, श्याम ढोबळे, युसुफसाब वाडीवाले, ईस्माईल बागवान, शेख मेहताब, आयुब टप्पेवाले, मुक्तार शेख, बाबर बनशेळकीकर, पाशा बेग, अबरार पठाण, सोनु हाशमी, आझम पटेल, इमरोज पटवेघर, अशरफ देशमुख, जावेद शेख आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना ना.संजय बनसोडे म्हणाले, लाडकी बहिण योजनेचे तालुक्यात ६० हजार फार्म भरले गेले. भविष्यात उदगीर येथे विमानतळ, मेडिकल कॉलेज उभारणार असून उदागिर बाबांच्या नावाने 'वंदे भारत' रेल्वे सुरु करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ना.बनसोडे यांनी सांगितले. यावेळी उदगीर शहर परिसरातील समाजबांधव व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रमुख नेते व अल्पसंख्यांक सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## अजनीच्या ग्रामस्थांतर्फे आदर्श शिक्षक उमाकांत काळे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**शिरुर अनंतपाळ, दि. २१ ऑगस्ट-**

तालुक्यातील अजनी (बु) येथे स्वातंत्र्य दिनांच्या निमित्ताने संपूर्ण देशभर हरघर तिरंगा उपक्रम घेण्यात आला. गावोगावी आदर्श शिक्षक, माजी, आजी सैनिक, स्टार माता, गुणवंत विद्यार्थी यांचे सत्कार झाले.

अजनी बु. जि. प. शाळेत ही ग्रामपंचायत व शिक्षणप्रेमी नागरिक यांच्या वतीने शाळेतील गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारेआदर्श शिक्षक यांचा सन्मान सोहळा नुकताच पार पडला. यात खऱ्या अर्थाने विद्यार्थी घडवणारे वर्गातले आदर्श, विद्यार्थीप्रिय शिक्षक, अभ्यासू, अध्यात्मिक वारसा जोपासणारे म्हणून गावकर्ते यांनी उमाकांत विठोबा काळे यांची निवड केली. व स्वातंत्र्यदिनी त्याचा सन्मान व सत्कार गावकऱ्याचा समक्ष प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांच्या हस्ते केला. शासनस्तरावरून वा कोठूनही केलेल्या सन्मानापेक्षा गावकरी पालकांनी केलेला सन्मान हा अविस्मरणीय असतो. या सन्मान सोहळ्यांच्या अध्यक्षस्थानी अध्यक्ष मन्मथ तडकले तर प्रमूख पाहूणे, उपसरपंच रमेश तडकले, अजनी गावचे माजी उपसरपंच रामेश्वर मोहनराव पाटील, प्रेमराज स्वामी आदी उपस्थित होते.